
# प्रबुद्धतरुण

दिवाळी अंक
ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१
किंमत १० रुपये



# NEXGEN SMILES

## DENTAL CARE

## DR. SNEHA SUNIL KOTHARE

**BDS, MDS (PAEDIATRIC & PREVENTIVE DENTISTRY)**

***We Specialise in:***

Children's dentistry (age 0-18 years)
Sedation dentistry
Orthodontic treatment (Invisalign, Ceramic, etc)
Minimally invasive restorations
Preventive dentistry
Dental implants
Aesthetic procedures

***Address:***
Shop no.7, Ground floor, Ketayun mansion, Near Thakkar bakery, Shahji Raje Road, Vile Parle East, Mumbai-400057

Clinic timings: Mon- Sat 9am- 1pm ; 5.30 pm- 9pm
Sun 10am- 2pm

For appointments, contact: +91-9833750115

# प्रभुतरुण दिवाळी अंक २०२१

## अंतरंग


संपादकीय : सुहासिनी कीर्तिकर ........ (४)
संजना कोठारे : भरारी... भावनांची (विस्तारीत संपादकीय) ........ (५)
बन्सी धुरंधर : बदलती क्षितीजे (लेख) ........ (९)
सुहासिनी कीर्तिकर : बोळकं (लेख) ........ (११)
डॉ. सुमन नवलकर : तात्पर्य (कथा) ........ (१३)
शौनक जयकर : Entry (लेख) ........ (१७)
सौ. प्रणिता प्रभाकर ! निगराणी (लेख) ........ (२२)
सौ. गीता आंबवणे : शिक्षकाचा ज्ञानमार्गी अनुभव (लेख)(स्वाती जयकर यांचा अनुभव) ........ (२५)
सौ. कल्पना कोठारे : प्रथमच (कथा) ........ (२७)
नंदकुमार विजयकर : पट्या (कथा) ........ (३२)
डॉ. अंबुजा प्रदीप नवलकर : Introspection (लेख) ........ (३४)

**व्यक्तीविशेष :**

अनारकली वेलकर : माझे मधूभाऊजी आणि शीला मावशी (लेख) (मान्यवरांचे अनुभव) ........ (३५)
मिलींद कोठारे : Comrade Jaywant Gajanan Kothare (लेख) ........ (४९)
मृदुला जोशी : माझ्या आयुष्यातील काही विलक्षण योगायोग (लेख) ........ (५३)
विनय त्रिलोकेकर : आमची आई (लेख) ........ (५७)
अजित इंद्रसेन नवलकर : बाबू भटजी (लेख) ........ (६१)

मिहिका नवलकर : Mind Full Parenting (लेख) ........ (६५)
जयमती तळपदे : मी. एक गोंधळेकर (कथा) ........ (६७)
मोनिका राणे अय्यर : How did I get so lucky (लेख) ........ (६९)
आरती कोठारे : शंकरपाळी (लेख) ........ (७१)
हेमंत तळपदे : चिनूमुंगी (बालकथा) ........ (७५)
आदिती तळपदे : लहानपण राहू दे देवा...! (लेख) ........ (७७)
आशिष कीर्तिकर : How to Fail??!! (लेख) ........ (७९)
कै. उज्ज्वला ब्रह्मांडकर : चॅटरूम (कालाय तस्मै नम:) (कथा) ........ (८१)
मुकुला राणे नवलकर : दार उघड बये, दार उघड (लेख) ........ (८६)
दीपक माधव धैर्यवान : माझा संगीताचा अनुभव ........ (९०)
अरमान कोठारे : Red-Violet (लेख) ........ (९५)

**: कविता :**

नलिनी तळपदे, सौ. सुजाता तुषार कीर्तिकर, सौ. गीता आंबवणे, हेमंत तळपदे, कल्पना कोठारे,
सौ. स्वागता प्रियेश विजयकर, विहान कोठारे, सौ. निकेता प्रशांत राणे, नेहा दळवी

वात्रटिका : डॉ. सुमन नवलकर
हास्यचित्रे : सुहासिनी कीर्तिकर
**मुखपृष्ठ : मोनिका राणे अय्यर**
मुद्रित शोधन : सुहासिनी कीर्तिकर
प्रतिक्रिया, अभिनंदन, प्रभुतरुणास देणगी, प्रभुतरुणाची डायरी इत्यादी

तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?

# प्रभुतरुण

दिवाळी अंक

मूल्य रुपये दहा

( स्थापना : तारीख २५ ऑगस्ट १९२३ )

संपादिका : सुहासिनी कीर्तिकर

कार्यकारी संपादक मंडळ:
मिनाक्षी जयकर, मयुरा नायक,
संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर

www.prabhutarun.com

वर्ष ५५ वे) १६ ऑक्टोबर, १६ नोव्हेंबर २०२१ (अंक २

## संपादकीय

-सुहासिनी कीर्तिकर

झिग् झिग्यार या कदाचित तुम्ही न ऐकलेल्या महान माणसाने एक फार छान संदेश दिला आहे मित्रांनो. तो म्हणतो - ''सुरुवात करताना आपण महान असायलाच पाहिजे असं नाही. पण हां, महान बनायला सुरुवात मात्र केलीच पाहिजे.'' हे वचन आत्ताच आठवायचं कारण? वाचकहो, सांगायलाच हवं का? आम्ही - म्हणजे मी, आमच्या कार्यकारी संपादकांनी 'प्रभुतरुणा'ला महान बनवण्याची सुरुवात तर केलीच आहे. ऑन लाईन कार्यक्रमाची चंगळ, 'वेबसाईट'चे 'रीलाँचिंग', 'सिंगर्स क्लब' आठवतायत ना? त्याबरोबर नेहमीचा अंक असतोच. पण वाचनाची भूक भागत नाही. मग त्याला पर्याय म्हणजे दिवाळी अंक. जऽऽरा मोठ्ठा! अनेकांना सामावून घेणारा. ऐन दिवाळीत आनंदाची आतषबाजी करणारा. साहित्याचा तऱ्हेतऱ्हेचा फराळ देणारा.

या वर्षी या फराळात दोन वेगळी वैशिष्ट्ये आहेत. एक म्हणजे व्यक्तीविशेष सांगणारे खास लेख आहेत; अन् दुसरे म्हणजे कै. उज्ज्वला ब्रम्हांडकरची कथा! का? तर त्यांनी तशी अपेक्षा व्यक्त केली होती. कृतज्ञता म्हणून 'ये तो होनाही था!' शिवाय नेहमीचे तुमचे आवडते लेखक आहेत, वात्रटिका आहेत. हो! बऱ्याच वर्षांनी मी यंदा व्यंगचित्रे/हास्यचित्रे दिली आहेत. (हसा बरे का! मला नव्हे; चित्रातील गंमतीला!) आणखी एक राहिलेच. मुखपृष्ठावर भाऊबीजेचे छाऽऽन रेखाटन आहे मोनिका राणे अय्यर हिचे. अमेरिकेत वास्तव्य असूनही 'तरुणा'चा बंधुभाव जपणारेच हे चित्र वाटते मला. सदिच्छा शुभेच्छुक, जाहिरातदार नेहमीच पाठीशी असतात. वाचकहो, तुमचे पाठबळ सर्वात महत्त्वाचे.

ते पाठीशी घेऊनच तुम्हाला दिवाळीच्या आणि नववर्षाच्या शुभेच्छा देते. आमची ही दिवाळी अंकाची भेट कशी वाटली; ते कळवा बरं का. त्यामुळे आमचा पाडवा खऱ्या अर्थी सण ठरेल.

*विस्तारीत संपादकीय*

# भरारी... भावनांची

**⁎ संजना दीपक कोठारे ⁎**

कधीतरी ना, बरेच विचार मनात असतात. विचारांचा कोंडमारा होत असतो. बरंच काही स्पष्ट बोलायचं असतं आणि बरंच काही सांगायचं असतं. परंतु शब्दच साथ देत नाहीत. काय बोलावं आणि काय सांगावं, काहीच सुचत नाही. ह्या विचारांचा भडिमार चालू असतानाच, अजून काही विचार मनात येतात. आपल्या बोलण्याचं कोणाला वाईट तर नाही ना वाटणार अथवा कुणी आपल्या बोलण्याचा अर्थ वेगळा तर नाही ना लावणार? आपण जर स्पष्ट होऊन आपले मन मोकळे केले तर समोरची व्यक्ती आपल्यावर चिडली तर, किंवा त्या व्यक्तीने आपल्याशी वाद घातला तर? मनात ही भीती निर्माण होते आणि मग वाटतं, ''नको हे सगळं. वाद नकोत, विवाद नकोत.'' ह्या विचारातच गुंतून राहिलेले मन शेवटी गप्प राहणं पसंत करतं.

परंतु आपले विचार स्वत:पाशीच जोपासून त्यांना आपण एका कैदेत ठेवतो, असं नाही का वाटत? कवी चन्द्रशेखर गोखले यांनी ह्या चार ओळीत तसेच काहीसे म्हटले आहे. ते म्हणतात, ''मुकं मुकं राहून तुझं, नुसतच पाहत राहणं, जसं गोठलेल्या नदीचं, बर्फाखालून वाहणं.'' अर्थ लावावा तसा लागतो. एक अर्थ असाही घेऊ शकतो की शब्दातून काहीच व्यक्त न करता नुसतं पाहत राहण्यात काय हाशील होतं कुणास ठाऊक. त्या भावनांचा त्या नदीसारखा कसा कोंडमारा होत असेल कारण वरून बर्फ गारठून गेला आहे आणि त्या उसळत्या भावना त्या बर्फाखाली दडल्या गेल्या आहेत. त्यांची इच्छा असूनही त्या बाहेर येऊ शकत नाहीत.

एखादा कैदी जेव्हा जन्मठेपेची शिक्षा भोगत असतो, तेव्हा त्याचे मन निष्ठुर होत जातं, त्याच्या जखमा नासुर बनतात आणि तो नको ते तर्क लावत बसतो. विचार आणि भावनांचेही तसेच आहे. त्यांना जितके मनात कोंडून ठेऊ तेवढा त्यांचा कोंडमारा स्वाभाविक आहे. त्यांना मोकळीक द्यायला हवी. त्यांना व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य मिळायला हवे. दोनच गोष्टी होतील. ते विचार स्वीकार तरी होतील नाहीतर नामंजूर होतील. ५० टक्के आशा तर राहील की आपल्या भावनांचा स्वीकार होऊ शकतो. मनाच्या कैदेतून त्या विचारांची आणि भावनांची सुटका तर होईल.

काही म्हणतात, ''मला गरज नाही माझ्या मनातलं व्यक्त करण्याची किंवा कोणाला काही सांगायची.'' काहींना तर वेळच नसतो. पण खरे म्हटले तर ती वेळ त्यांना द्यायचीच नसते. त्यांच्या आयुष्याचा प्राधान्यक्रम वेगळा असतो आणि जेव्हा त्यांना दुसऱ्यांसाठी वेळ नसतो तेव्हा समजून जावं की तुमचं त्यांच्या आयुष्यात काहीच अस्तित्व नाही. कारण माणूस कितीही त्याच्या कामात किंवा इतर गोष्टीत व्यस्त असला तरी त्याच्या आयुष्यातल्या महत्त्वाच्या माणसांसाठी कसेही करून वेळ काढतोच. वेळ नसल्याची कारणं देत नाही, वेळ काढला जातो!

परंतु ह्याच माणसांना तेव्हा पश्चाताप होतो जेव्हा समोरची व्यक्ती कायमची त्यांच्या आयुष्यातून निघून जाते. मग त्यांना वाटतं, ''मी तेव्हा बोललो असतो तर...?'' पण तोपर्यंत वेळ निघून गेलेली असते.

अशी बरीच उदाहरणं माझ्यासमोर आहेत ज्यांना आयुष्यभर पश्चाताप होत आहे. ह्या परिस्थितीला अपवाद एकच आणि तो म्हणजे, कोणी आयुष्यभराच्या जखमा दिल्या असतील तर अशा व्यक्तीच्या गुन्ह्याला माफी नाही. विषारी संबंध जोपासण्यापेक्षा अशा व्यक्तीपासून कसलाच संबंध न ठेवलेला बरा. अशा वेळेस त्या व्यक्तिला आपल्या मनातल्या भावना व्यक्त करणे घातक ठरू शकतं. त्यामुळे तेव्हा गप्प राहिलेले बरे असेच वाटायला लागते.

ह्या झाल्या नकारात्मक गोष्टी. परंतु भावना व्यक्त केल्यामुळे आयुष्य किती सुंदर होऊ शकतं ह्याची बरीच उदाहरणंसुद्धा आहेत माझ्यासमोर. ज्या-त्या वेळेला भावना व्यक्त केल्याने काहींचा संसार सुरू झाला तर काहींचे मतभेद मिटले. काहींचे गैरसमज दूर झाले तर काहींना केवळ आपल्या भावना व्यक्त करून निव्वळ मन:शांती मिळाली. काहींना आपल्या भावना व्यक्त केल्यामुळे इतरांचा आनंद पाहून निर्मळ आनंद मिळाला. आपल्याला जाणवत नाही, परंतु केवळ एकमेकांशी मनसोक्त संवाद साधूनसुद्धा बऱ्याच गोष्टी स्पष्ट दिसायला लागतात. संशयाचा चश्मा डोळ्यावरून सरकला की गृहीत धरलेल्या काही गोष्टी स्पष्ट होतात आणि धुरकट दिसत असलेलं जग सुंदर आणि आनंदी दिसायला लागतं.

परंतु पुढाकार घेणार कोण? कोणाला वाटतं मी का बोलावं, तो कुठे बोलतोय माझ्याशी? इथे अहंकार मध्ये येतो. माझे एक प्रामाणिक मत आहे की, आपल्या मनात जे येतं ते आपण करावं. समोरची व्यक्ती भले प्रतिसाद देवो अथवा ना देवो. प्रत्येक माणूस वेगळा असतो आणि प्रत्येकाची विचारशक्ती वेगवेगळी. कोणी आपल्यासारखेच वागले पाहिजे ही अपेक्षाच मुळात चुकीची आहे. मुख्य म्हणजे कसलीच अपेक्षा बाळगणे चुकीचे आहे. कारण जर ती अपेक्षा पूर्ण झाली नाही तर त्रास आपल्यालाच होतो असा माझा समज आहे. त्यापेक्षा अपेक्षाच बाळगू नये आणि आपण आपला स्वभाव कायम प्रामाणिक आणि सच्चा ठेवावा. आपल्याला वाटले तर बोलावे, व्यक्त व्हावे, आपले मन कुढत राहत नाही. मनसोक्त बोलावे, मनावरचा भार कमी होतो तेव्हा एखाद्या पक्ष्याच्या भरारीची जाणीव होते.

काही व्यक्ती मूळत: अबोल असतात. त्यांना व्यक्त व्हायचे नाही असे नाही परंतु मुळात कमी बोलत असल्याने त्यांना शब्द उच्चारून व्यक्त होणे कठीण जाते. अशी माणसं बरेचदा त्यांचे विचार एका वहीत उतरवतात आणि लिहून व्यक्त होतात. अशा माणसांची व्यथा कवी चंद्रशेखर गोखलेंनी ह्या चार ओळीत छान मांडली आहे. कवी म्हणतात, ''मी कमी बोलतो म्हणून, शब्द कागदावर उतरतात. बोलायला गेलो तर वेडे, ओठातूनच परततात.'' अशारीतीने व्यक्त झाले तरी काय वाईट? शेवटी, भावना व्यक्त करणे, हे महत्त्वाचे! तर तो कोणताही पर्याय घेऊन का असेना. बरीच माणसं आपल्या लिखाणातून जास्त स्पष्ट आणि प्रभावीपणे आपल्या भावना व्यक्त करू शकतात.

काहीसे बदल आपल्या सगळ्यांच्या आयुष्यात गेल्या दीड वर्षात कदाचित सारखेच घडले असावे. प्रत्येक नाण्याला दोन बाजू असतात. त्याचप्रमाणे, गेल्या दीड वर्षाच्या ह्या pandemic च्या कालावधीत बऱ्याच वाईट गोष्टी घडल्या असल्या तरी एक गोष्ट मला प्रचंड सकारात्मक वाटली आणि ती म्हणजे प्रत्येक कुटुंब, बऱ्याच कालावधीने शब्दश: एका 'कुटुंबासारखे' वाटायला लागले. आईवडील दोघेही कामावर गेल्यावर, मुलांसकट प्रत्येकाचे एक स्वतंत्र वेगळे विश्व तयार झालेले. कुटुंब एकत्र असूनही प्रत्येकजण आपापल्यातच बुडालेला. ह्या pandemic नी सर्वांना एकत्र आणले. एक कमी होती ती पूर्ण केली. घराच्याप्रती प्रत्येकाच्या काय जबाबदाऱ्या आहेत ह्याची त्यांना जाणीव करून दिली. कुटुंबाचा प्रत्येक सदस्य आपल्या जबाबदाऱ्या जाणून हौसेने आणि प्रेमाने सगळी कामे करायला शिकला. आणि हे सगळं घडलं एकमेकांशी झालेल्या संवादामुळे.

कुटुंब एकत्र आलं आणि मुख्यत: आई, वडील आणि मुलांमधला जो संवाद तुटत चालला होता तो पुन्हा एकदा जुळून आला. 'Lockdown' ची गरज होतीच, सगळ्यांना समजायला, एकत्र आणायला.

एकत्र बसून बोलणे अथवा जेवणे तर केवळ रविवार पुरते मर्यादित असायचे. तर ह्या गेल्या दीड वर्षात रोजच दिवाळी दसरा असल्यासारखा रोज 'रविवार' असल्याचा भास झाला. कधी नव्हे ते पूर्ण कुटुंब एकत्र जेवायलाच नाही तर जेवण बनवायला शिकले. रोजची घरकामे वाटून घेतली गेली आणि इतर वेळ गप्पागोष्टींमध्ये मजेत घालवता आला. महत्त्वाची गोष्ट म्हणजे आईवडील मुलांशी मनसोक्त बोलू शकले आणि मुलांबरोबर उत्तम वेळ घालवू शकले. राहिलेले काहीसे अपुरे ते पूर्ण झाले. नात्यांचे नूतनीकरण झाले. बऱ्याच गोष्टी उलगडल्या, गवसलेल्या संवादामुळे झालेली पोकळी भरून निघाली. ह्या दुर्दैवी pandemic ची हीच 'silver lining of the dark cloud' म्हणायला काहीच हरकत नाही.

आयुष्यातली प्रत्येक घटना आपल्याला काहीतरी शिकवून जाते. त्या शिकवणींचा सराव केला तरच त्याचे सार्थक होईल. भावना व्यक्त करणे कितपत गरजेचे आहे हे प्रत्येकाच्या मानण्यावर अवलंबून आहे. एखाद्या व्यक्तीचे आपल्या आयुष्यात काय आणि किती महत्त्व आहे आणि त्या व्यक्तिशी आपले नाते कसे आहे ह्याची ग्वाही आपलाच स्वभाव ठरवू शकतो. आपण त्या व्यक्तीवर किती विश्वास ठेवतो ते आपल्या स्वत:च्या व्यक्त होण्यावर अवलंबून आहे. बऱ्याच जणांना व्यक्त होणे म्हणजे दुर्बळता वाटते. परंतु व्यक्त होणे हे एक प्रकारचे स्वातंत्र्य अनुभवल्यासारखे आहे हे प्रत्येकाने प्रत्यक्षात अनुभवल्याशिवाय विश्वास बसणार नाही. हा अनुभव, एक प्रयोग समजून, येणाऱ्या नूतन वर्षी हा ठराव करायला हरकत नाही. भावनांना मोकळं करून तर पहा, त्यांच्या कैदेतून त्यांना बाहेर काढल्यावर त्या कशी भरारी घेतात आणि तुम्हालाही एक वेगळंच स्वातंत्र्य देतात. ह्या नूतन वर्षी तुम्हा सर्वांना हे नवीन स्वातंत्र्य मिळो आणि तुमचं आयुष्य निरोगी, सुखद, सकारात्मक आणि आनंदी जावो हीच सदिच्छा.

*


!! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!



श्री. प्रणव शिवनाथ देसाई

# THE PATHARE PRABHU CHARITIES

P.P. Dnyati Bhuvan No.3, Jagannath Shankarseth Road, Mumbai – 400002

## IMPORTANT CIRCULAR

## AWARD OF EDUCATIONAL MERIT PRIZES FOR THE YEAR 2021

The Pathare Prabhu Charities have been awarding Educational Merit Prizes every year to students of our community passing various examinations with merit.

Students passing any examination SSC/CBSE/ICSE/IGCSE onwards from a recognized university/educational institution during this year are earnestly requested to submit the photo copies of their mark sheets in the office of the Pathare Prabhu Charities,Thakurdwar, between 11:00 a.m. and 5:30 p.m. or through email : ppcharities@mtnl.net.in after the result of the examination is declared but not later than **October 15 2021** to enable the trustees to award the prizes to the eligible students. The students and parents concerned should note that the merit prizes will be awarded by the Trust only on the basis of the results/mark sheets received by the Trust before the dead line.

The mode and date of conducting Merit Award Function will be communicated later.

Students are requested to furnish the following requirements along with the examination results/ mark sheet.

1. Full Name of the Student (Married Female to give maiden name also)
2. Parents Name.
3. Education degree.
4. Educational Institution.
5. Contact number.
6. Alternative number
7. Photocopy/photo of cancelled Cheque of the Students bank account for NEFT details
8. Photocopy/photo of Certificate/marksheet to be submitted either
   A) Post to charities office.
   B) email@ppcharities@mtnl.net.in or
   C) Share on whatsapp channel
   (In case of online submission please submit digilocker copy of the marksheet/result)

FOR THE BOARD OF TRUSTEES

MUMBAI, AUGUST 22, 2021

THE PATHARE PRABHU CHARITIES

**UDAY S. MANKAR**

CHAIRMAN - TRUSTEE

लेख

# बदलती क्षितीजे

## ★ श्री. बन्सीधर सदाशिव धुरंधर ★

आचार व विचार यातील लक्षणीय तफावत दाखविणारा कमीत कमी कालावधी म्हणजे, ‘जनरेशन गॅप’. आमच्या तरुणपणी हा काळ सुमारे १५ ते २० वर्षांचा होता; तर सध्या तो केवळ २-३ वर्षांवर येऊन ठेपला आहे. ‘जागतिकीकरण’ (ग्लोबलायझेशन) म्हणजेच लहान होत चाललेल्या जगाच्या सीमा हे कदाचित त्यामागील मोठे कारण असावे. सुमारे ४०-४५ वर्षांपूर्वी पदवीधर होऊन कॉलेजमधून बाहेर पडलेली आमची पिढी उच्च शिक्षणाच्या निमित्ताने अमेरिकेसारख्या प्रगत देशाकडे आकर्षित झाली व तेथेच स्थायिक झाली. हुशार व तल्लख बुद्धिमत्ता असलेली ही तरुण मुलं-मुली अमेरिकेत सुखेनैव स्थिरावली. आमच्यासारखे निव्वळ काही हाताच्या बोटावर मोजण्याइतके योग्य संधी असूनही भारतात परत आले, परंतु बाकी सर्वजण अमेरिकेसारख्या लखलखत्या दुनियेमध्ये स्थिरावले. चाळ संस्कृती किंवा फार तर सोसायटी संस्कृती यामध्ये वाढलेल्या व मराठमोळ्या राहणीऐवजी सर्व प्रकारच्या ऐहिक, सुखसमृद्धीने भरलेल्या जीवनाचे आकर्षण त्यांच्यासाठी केव्हाही श्रेष्ठ ठरले. कॅनमधला कोकाकोला, तसेच पिझ्झा, बर्गर, या सर्व गोष्टी त्यांच्या आयुष्यातील अविभाज्य भाग बनल्या. साहजिकच आमच्या पिढीचे परतीचे दोर जवळ जवळ कापले गेले. तरी सुद्धा अमेरिकन जीवनशैली आत्मसात केलेल्या या पिढीचे भारतीय संस्कृतीची जपणूक करण्याचा प्रयत्न जारी ठेवला. अमेरिकेत जन्मलेली त्यानंतरची पिढी मात्र दोन्ही संस्कृतीची सांगड घालण्याचा प्रयत्न करू लागली. अमेरिकन उच्चाराने का होईना परंतु मराठी भाषेतून बोलण्याचा प्रयत्न करणाऱ्या तसेच सर्व सणवार साजरे करून मराठी संस्कृती अमेरिकेत जीवंत ठेवण्याचा त्यांचा प्रयत्न जरी उल्लेखनीय व प्रशंसनीय असला तरीही ‘इंडियाला जाणे’ हा वाक्प्रचार प्रवासापुरताच उरला.

इ.स.२००० नंतर मात्र काळ झपाट्याने बदलला. विलेपार्ल्यातील चाळी तर इतिहासजमा झाल्याच; पण सोसायटीच्या जागेवर देखील उंच टॉवर्स उभे राहिले. बेसमेंट पार्किंगसहित ‘पेंटहाऊस’ मिळू लागले आणि पिझ्झा, बर्गर, फास्ट फूट सेंटर्स यांचे पेव फुटले. सर्व ऐहिक सुख, तसेच सुखसमृद्धी चक्क पारल्यात उपलब्ध झाली. तल्लख बुद्धीच्या तरुण पिढीला तांत्रिक शिक्षणासहित आयआयएम, आयआयटी-सारख्या संस्थांची जोड मिळाली. आर्थिक संदर्भ बदलले. आमच्या पिढीतील मुले जेव्हा शिक्षणासाठी परदेशात गेली, ती प्रथम परत घरी येऊ शकली ती संपूर्ण शिक्षण पूर्ण करूनच! पण, आता अमेरिकेत शिक्षणासाठी गेलेली मुलं-मुली प्रत्येक सुट्टी आनंदाने पारल्यात घालवताना आढळून येतात. आर्थिक स्थैर्य, सुखसोयी, नितीमत्ता व जगाकडे बघण्याचा दृष्टीकोन याबाबत दोन पिढ्यांमध्ये जरासुद्धा तफावत दिसत नसल्यामुळे ‘जनरेशन गॅप’ ही जवळ जवळ उरलेलीच दिसत नाही.

एकीकडे सर्व संपन्न बनलेली मुंबईतील जीवनशैली आणि त्याची संपूर्ण सवय झालेली वडीलधारी मंडळी या दोन्ही गोष्टी परदेशी शिक्षण पूर्ण करून परत भारतात स्थायिक होण्याचा निर्णय घेताना निर्णायक ठरतात. तसेच नवनवीन आय बी स्कूल्स, उच्च जागतिक दर्जा असलेल्या आयआयटी, आयआएमसारख्या शैक्षणिक संस्था, कॉम्प्युटर्स, स्मार्ट फोन्स व लठ्ठ पगाराच्या नोकऱ्या या सर्व गोष्टी,

मायदेशी परत येऊ घातलेल्या तरुण पिढीला परत परदेशी जाण्यापासून परावृत्त करू शकतात. त्या सर्वांची जाणीव त्यांना करून देणे ही एक मोठी जबाबदारी आपल्यावर आहे व त्याकरता काही पथ्य, तसेच काही बदल आपल्यामध्ये घडवून आणणे जरुरीचे आहे. एकत्र कुटुंबात त्यांना सामावून घेण्याकरिता त्यांच्या गरजा ओळखणे, स्वच्छता, शिस्त, व्यक्तिस्वातंत्र्य तसेच कायदा व सुव्यवस्था याचे महत्त्व जास्तीत जास्त त्यांच्या मनावर बिंबवण्याची व त्याचा पाठपुरावा करण्याची गरज आहे. प्रत्येक व्यक्तीच्या मनात देशप्रेम हे उपजतच असते. देशातील चांगल्या घडामोडींचा परामर्श करून त्यांच्या मनात देशाबद्दल आदर निर्माण करणे हे आपले महत्त्वाचे कर्तव्य आहे.

२१ व्या शतकात भारताला, 'सुपर पॉवर' करण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही. आत्तापर्यंत बदलाचे वारे येणार, येणार असं म्हणत होतो. परंतु कोविड आणि तत्सम आपत्तीमुळे बदल उंबरठा ओलांडून चक्क आपल्या घरात शिरलाय देखील!'' पार्ले टिळक विद्यालय' ह्या शताब्दी गाठलेल्या संस्थेमध्ये काम करताना पावलागणिक ह्या बदलाची जाणीव प्रकर्षाने होत आहे. भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक वारसा जपण्याचे श्रेय गेली १०० वर्षे मिळणाऱ्या संस्थेला देखील ह्या बदलाची जाणीव व दखल होण्याची वेळ आलेली आहे. मुलांच्या जडणघडणीत कौटुंबिक जबाबदारी आणि शाळेचा सहभाग हे गणित पूर्णपणे बदललेले आहे. 'नॅशनल एज्युकेशन पॉलिसी' ही इ.स. २०२२ पासून अमलात येणार आहे; जेणेकरून शिक्षणपद्धतीमध्ये अमूलाग्र बदल होतील व ते नक्कीच स्वागतार्ह असतील.

इ. ५ वी पर्यंत मातृभाषेत शिक्षण, गोष्टीरूप इतिहास, मानसिक स्वास्थ्य व उत्कर्ष, शारीरिक शिक्षण व खेळाचे महत्त्व, ऐच्छिक विषयांची निवड, आभासी शिक्षण, अशा आणि इतर अनेक सुधारीत अभ्यासक्रमांचा अंतर्भाव मुलांची क्षितीजे पूर्णपणे बदलणार आहेत. ह्या क्रांतीचा आपल्या सर्वांना लवकरच अनुभव येणार आहे हे भविष्य नसून वर्तमान आहे.

*

***हास्यचित्र***



लेख

# बोळकं

## * सुहासिनी कीर्तिकर *

नंदनचा काल दात पडला बरं का. लगेच त्याचा तिथून व्हिडीयोकॉल आला. त्यातलं ते त्याचं बोळकं बघून मला हसायलाच आलं बापडं. तो म्हणाला, 'ममाऽजी, आता सी, यू अ‍ॅण्ड मी सेम, सेम.' म्हणजे आनंद कशाचा? तर, आजीचं बोळकं, तसं त्याचंही. हो! म्हणजे मी माझ्या उतारवयात नवीन दात लावतात ना: तसे दात नाही लावून घेतले. उगाच कशाला त्या ऑपरेशनच्या फंदात पडा? शिवाय आता म्हातारपणी नाही पडणार दात; तर कधी पडणार? केस 'डाय' करा, सोन्याच्या वर्खानं फेशियल करा, खोटे दात खऱ्या दातांसारखे बसवून घ्या... अनेक जणींना असा 'म्हातारचळ' असतो! मी म्हणते बापडी; की आपण आहोत तसे 'प्रोजेक्ट' करण्यात 'ग्रेस' आहे. माझ्या आईबाबांनी कधी हे चोचले केले नाहीत. तेव्हा 'ब्युटीपार्लरं' तरी कुठे होती म्हणा? नारळाच्या दुधानं केस भिजवले, शिकेकाईनं धुतले की मस्तच रहातात केस. कुठे मंचावर (रंगमंचावर वगैरे) जायचे असले, शाळेच्या गॅदरिंगमध्ये हिंदमाता, वनराणी, फुलराणी वगैरे व्हायचे असेल की मग रिठ्यानं धुवायचे. मग केस असे भुरभुरे, फुलूऽऊन यायचे की आपणच वनराणी झाल्याचं अगदी खरंखुरं 'फील' यायचं. हो! कसले लांबच लांब, दाट असायचे ते केस. एक वेणी पाठीवर रुळली की आमचा धाकल्या म्हणायचा, 'जाडा बोबिलच. फक्त काळा. तेच त्वचेचं तत्त्व आणि दातांचंही. ऊस दातांनी सोलून खा, चिंबोरीचे फांगडे दातांनी फोडा, भाताच्या तूसाची जाळलेली राख दंतमंजन म्हणून घासा दात. सगळं कसं कट टू कट नॅचरल. नेचरोपथी नव्हती तेव्हा; पण सगळं कसं त्यातच बसणारं. मग नंदनएवढ्या वयात दात पडला तर त्याचं काय कौतुक करायचं? 'दुधाचा दात' तो. पडणारच. पडला की तुळशी वृंदावनात पुरून टाकायचा. पुरायचा म्हणजे 'माती असशी मातीत मिळसी' हे कुणी न सांगताच भिनायचे नकळत. आता पुरणे नाही तर दात पडला की परी येते चक्क. 'टूथ फेअरी'! नंदन तिच्यासाठी सुंदर चित्र (दाताचंच बरं का! अन् 'फेअरी'चं ही) काढून तिला पत्र लिहायला बसलाय. हेही किती कित्ती छान! दात पडला तर त्याचाही मस्त सोहळा. बालमन परीचं चित्र काढणार. परीच्या पंखाबरोबरच त्याच्या कल्पनेला पंख फुटणार. मग ती परी दात घेऊन जायला येणार त्याच्या स्वप्नात. स्वप्नं रात्रीच तर पडतात. (हो! दिवास्वप्नं रंगवायला ती काय त्याची ममाऽजी आहे?) मग स्वप्नांच्या दुलईत त्याचं इवलंसं कल्पनाविश्व रमलेलं असतानाच ती 'टूथ फेअरी' त्याला छाऽऽनसं 'गिफ्ट' देणार! 'सॅण्टा' ची बहीणच जशी ही 'टूथ फेअरी'!

मला फार बरं वाटलं विचार करताना. किती कोवळे सोहळे हे नैसर्गिक बदलांचे. निरागस मनाला आनंद देणारे. हे सोहळेच आहेत आजचे. 'इव्हेंट' नाहीत हं! आजचे 'बर्थ डे सेलिब्रेशन', 'फ्रेंडशिप डे', 'गेटटूगेदर' ही खरीखुरी गरज आहे जगण्यातली. मग ते 'इव्हेंट' कसे? सोहळेच. त्यासाठी सजणे तर त्याकाळीही होतेच की? मग ते आजही आहेत. फक्त या सोहळ्यांच्या जागा बदलल्यात. म्हणजे आता माजघरं नाहीत, वाडे नाहीत. म्हणून मग सोहळा भाड्याच्या हॉलमध्ये, मॉलमध्ये. सगळे निगुतीने सांभाळायला, सजाधजायला वेळ नाही; म्हणून ब्यूटीशिअन,

पार्लर, मेकपमन किंवा 'कन्या' इच्यातच. मग छाऽऽन दिसण्यासाठी काय काय वापरायचं, काय काय करायचं आणि आपणच आपली 'टूथ फेअरी!' व्हायचं. म्हणजे मग आयुष्य 'फेअर' होऊन जातं. इंटेंशन, इंटिलिजन्स, इंटिमसी, इंटरनल एनर्जी अशी चौकड जमली का दात पडण्याचासुद्धा सुंदर सोहळा होतो मग असा. पडलेल्या दातांचं बोळकं घेऊन नंदन हसला तेव्हा कान्हाच्या तोंडात यशोदेला विश्वदर्शन का झालं; त्याचं कोडं सुटलंच की! मग मी त्याला माझ्याही नकळत 'बोळके महाराज' करून टाकलं. या माझ्या 'महाराजां'नी मला मोठ्ठं भान दिलं की, मग मी व्हिडियोतच माझे 'बोळके' पसरून दिलखुलास दाद दिली. अगदी चित्रातल्या गांधीबाबांसारखी!

*

---

*हास्यचित्र*



कथा

# तात्पर्य

**★ डॉ. सुमन नवलकर ★**

'आज मी तुम्हाला गोष्ट सांगून गप्प बसणार नाही. गोष्ट संपल्यावर गोष्टीचं तात्पर्य विचारणार आहे.' आजीने जाहीर केलं. होतं काय की रवी आणि ओवी गोष्ट ऐकायसाठी येऊन बसतात तर खरे. पण मधे-मधे भलतेच प्रश्न विचारून अगदी भंडावून सोडतात. मग गोष्ट अगदी भरकटत जाते, कचाट झालेल्या पतंगासारखी. म्हणजे मूळ गोष्ट बाजूलाच राहाते आणि भलत्या-सलत्या गोष्टींमुळे दहा मिनिटांच्या गोष्टीला अर्धा तासच काय, कधी-कधी आख्खा तासही लागतो. गोष्ट कोणाची सांगतोय, काय सांगतोय, सारं विसरून एक जोराची डुलकी रवीच्या खांद्यावर, किंवा एक जोराची डुलकी ओवीच्या खांद्यावर. मुलं आडवी होऊन गोष्ट ऐकत असली, तर दोघांपैकी एक झोपतो. दोघंही झोपली तर छानच ना! आजीही झोपायला मोकळी.पण एक जागा असला, तर गोष्ट सांगावीच लागते. शिवाय जो झोपला असेल, त्याला दुसऱ्या दिवशी ती गोष्ट सांगून पूर्ण करायची आणि शिवाय नवी एक गोष्ट तर सांगायचीच. म्हणून तर आजीने ते दुप्पट श्रम टाळण्यासाठी 'तात्पर्य विचारणार' सांगून मुलांची झोपच उडवून टाकली.

'तात्पर्य म्हणजेकाय गं आजी?' रवीने विचारलं आणि ओवीने मीही तेच विचारणार होते, अशा अर्थाची मान डोलावली.

'अरे, तात्पर्य म्हणजे, त्या गोष्टीतून तुम्ही काय शिकलात? कोणता संदेश मिळाला तुम्हाला ती गोष्ट ऐकून.'

'शीआजी,सारखं जर डोक्यात तेच असलं ना, की काय शिकतोय आपण यातून, काय शिकतोय ते सांगायचंय नंतर, तर गोष्ट ऐकायला मजाच येणार नाही.' ओवी म्हणाली. 'शाळेचा धडाच वाचून दाखवतेयस, असं वाटायला लागेल.'

'होना आजी. धडा वाचताना कसं, धड्याखालच्या प्रश्नांची उत्तरं लिहायचीत, या विचारानेच वाचतो ना आपण धडा? तसंच वाटेल.' रवीनेही म्हटलं.

'अरे मुलांनो, गोष्ट ऐकताना असले काही विचार मनात आणू नका.'तात्पर्य सांगायचंय'असा विचार मनात ठेवून गोष्ट ऐकलीत, तर कशी मजा येईल? गोष्ट इतकी सोप्पी सांगणार आहे, की तात्पर्य आपोआपच लक्षात येईल तुमच्या.' आजीने समजावल्यावर मुलांनी माना तर डोलावल्या, पण आडवं व्हायचा धीर मात्र कोणालाही झाला नाही.

'आज ना मी तुम्हाला आपल्या घरातल्या माणसांचीच गोष्ट सांगणार आहे.गोष्ट तेव्हाची आहे, जेव्हा तुमचे बाबा रवीएवढे होते आणि तुमची आत्या ओवीएवढी.' मुलं खुदुखुदु हसली. 'आणि तुम्ही जशी मस्ती करता ना,तशीच मस्ती करायची दोघंजणं. मी काही तुमच्या आईसारखी नोकरी करत नव्हते. घरातच असायचे त्यांच्या पाठी. पण कधीतरी कुठेतरी जायची वेळ येतेच ना रे? तशी एकदा तुमच्या आजोबांबरोबर कसल्याशा कामासाठी गेले होते बाहेर. आधीच दोघं मस्तीखोर; त्यात आई-बाबा घरात नाहीत, म्हणजे मग काय विचारायलाच नको. दोघांच्या मर्कटलीलांना ऊत आला असणार.'

'मर्कटलीला म्हणजे काय आजी?' ओवीने विचारलंच.

'आता असे मधे-मधे प्रश्न विचारत राहिलात, तर कसं होणार रे?' आजीला प्रश्न पडला.

'अगं, पण तू ते ततपप असं काहीतरी विचारणार आहेस ना?'

'ततपप कसलं रे? तात्पर्य-तात्पर्य.'

'हं, तेच ते. मग ते सांगता यायला नको का?'

'बरं-बरं. सांगते. मर्कट म्हणजे माकड आणि लीला म्हणजे चाळे. म्हणजे आम्ही दोघंही घरी नव्हतो म्हटल्यावर उड्या-बिड्या मारल्या असणार. म्हणजे ना तुमच्या बाबाचा तर आवडीचा खेळ. खिडकीच्या गजांवर वरपर्यंत चढायचं. आता न विचारताच सांगते, गज म्हणजे खिडकीला आडव्या बसवलेल्या सळ्या किंवा नळ्या. आतासारखं तेव्हा वेलबुट्टीचं ग्रिल नसायचं. त्यामुळे शिडीसारखं त्या गजांना पकडत-पकडत वरच्या शेवटच्या गजापर्यंत चढायचं आणि तिथून खाली कोचावर धडामकन उडी मारायची. तर आम्ही नसल्यामुळे मारलेल्या उड्या महागात पडल्या असणार. कोचाला एक छानसं भोक पडलं.'

'आजी, एक तर बिचाऱ्या कोचाला भोक आणि तू छानसं काय म्हणतेस?'

'छानसं नको म्हणू, तर काय म्हणू? अरे, तेव्हा तुझ्या आजोबाना काही मोठ्ठा पगार नव्हता. गावी तुझ्या पणजी-पणजोबांकडेही, म्हणजे त्यांच्या आई-वडिलांकडेही ते पैसे पाठवत असत. त्यामुळे छानसा पण फार महाग नसलेला कोच होता आमच्याकडे. मी फार जपून वापरत असे कोच. दुपारी जरा झोपावंसं वाटलं, तरी पलंगावरच झोपायचं. नाहीतर जमिनीवर चटई किंवा सतरंजी घालून झोपायचं. पण कोचावर आडवं व्हायचं नाही. तो फक्त बसायसाठीच वापरायचा. पण ह्या दोघांना कितीही सांगितलं, तरी ऐकतंय कोण? जास्ती मस्तीखोर तो तुमचा बाबाच.'

'मग आजी, तू ओरडलीस की नाही त्यांना?'

'मीनाही रे, पण तुमचे आजोबा कमालीचे तापट.'

'कायआजी, आजोबा कधी 'हूं'देखिल बोलत नाहीत. उगीच त्याना बोलतेस तू. तूच ओरडली असणार.'

'नाही रे बाबा, मी ओरडायची वेळच आली नाही. तुझ्या बाबाने आणि आत्याने हळूच एक पलंगावरची उशी आणून त्या भोक पडलेल्या जागेवर ठेवली आणि धडधडत्या मनाने आई-बाबांच्या येण्याची वाट पाहू लागली. घरात सर्व वस्तू जागच्या जागीच ठेवल्या पाहिजेत अशी तुमच्या आजोबांची शिस्त ना? त्यामुळे पलंगावरची उशी येऊन कोचावर बसलेली पाहून खपवून घेणार का ते?'

'मग गं आजी?'

'मग काय? ओरडले ना जोरात!'

'ही' पलंगावरची उशी इथे कशी आली? ठेवा ती उशी जागेवर. मग काय, आजोबांची आज्ञा. पाळावी तरी वाट, न पाळावी तरी वाट. तुमचे बाबा आणि तुमची आत्या जागच्या जागीच उभे. मग आजोबा परत गरजले. मग तरी 'आम्ही केलं', असं म्हणून चूक कबूल करायची ना? तर तुझा बाबा म्हणाला, 'घर एवढं लहान आहे ना? मग इथेच खेळलो आम्ही. मोठं घर असतं, तर खेळायला जागा तरी मिळाली असती. एखाद्या रिकाम्या कोपऱ्यात खेळलो असतो ना आम्ही?' मग मात्र तुमच्या आजोबाना राग अनावर झाला. 'एक तर कोचाला भोक पाडून ठेवलंय आणि वर तोंड करून बोलतोय.'

'मग गं?'

'मग काय? आजोबांनी सांगितलंच दोघांनाही - म्हणजे तुमच्या बाबा आणि आत्याला- 'छोटं तर छोटं, पण मी माझ्या कष्टांनी उभं केलंय हे माझं घर. तुम्ही एवढं घेऊन दाखवा आणि मग बोला.' मग गप्प झाला तुझा बाबा. आत्याही काही बोलली नाही. चुपचाप जाऊन दोघंही अभ्यासाला बसली. मला मात्र खूप वाईट वाटलं. आजोबाना वाईट वाटलं, त्यांचंही वाईट वाटलं आणि मुलाना हैदोस घालायला मोठं घर नाही, त्याचंही वाईट वाटलं. नवराही माझाच आणि मुलंही माझीच. हो ना रे?' आजी गोष्ट सांगता-सांगता थांबली. जुन्या आठवणींनी दाटून आलं तिला. बाजूला ठेवलेल्या तांब्यातलं पाणी पेल्यात ओतून घेऊन आजी प्यायली. आजीने घसा साफ केला आणि ती पुढची गोष्ट सांगणार, तेवढ्यात बाजूच्या खोलीतून आजोबा आले आणि म्हणाले, 'पुढची गोष्ट मी सांगतो रवी आणि ओवी.'

'नको-नको आजोबा. तुम्हाला नाही येणार गोष्ट

सांगता. आजीलाच सांगू दे.' ओवी म्हणाली.

'हो, माहितीय तुझी आजी गोष्टी सांगण्यात किती पटाईत आहे ते. पण ही गोष्ट मीच सांगीन आजीपेक्षा चांगली.'

मग रवी-ओवी गप्पच बसली. उगीच आजोबांच्या जुन्या तापटपणाने पुन्हा मान वर काढली तर?

'अरे, मीच तर म्हणालो होतो ना तुमच्या बाबाला आणि आत्याला, की एवढं तरी घर घेऊन दाखवा. तर दोघांनीही मनावरच घेतलं माझं बोलणं.'

'मनावर कसलं, मनाला लावून घेतलं. आणि बोलणं नव्हे, ओरडणं.' आजीने आजोबांच्या बोलण्यातल्या चुकांची दुरुस्ती केली.

'तेच ते. तेव्हापासून त्यांनी ज्या अभ्यासाच्या पुस्तकांत माना खुपसल्या त्या खुपसल्याच. दोघंही खूप शिकली. नोकरीला लागली, नोकरीत चमकली आणि वर-वर चढत गेली. दोघांनीही आपल्या कष्टांनी आपापली घरं घेतली. माझ्या छोट्याशा घरापेक्षा खूप मोठं घर. माझं घर होतं छोटंसं. पण आता तुमच्या बाबाचं आणि तुमच्या आत्याचं, दोन्ही घरं किती मोठी-मोठी आहेत ना? त्यावेळी मी त्यांना ओरडलो, पण त्यांनी माझं ओरडणं मनावर घेतलं. त्यातून स्वत:ला शिस्त लावली. स्वत:मधे प्रगती घडवून आणली आणि माझ्यावर रागावून चिड-चिड करत न बसता स्वत:ला सिध्द केलं.' या वेळी आजोबांनीही चश्मा उतरवून डोळे पुसले, चश्मा पुसला आणि मग हसून म्हणाले, 'तुझ्या बाबाच्या या घरात आणि तुझ्या आत्याच्या त्या घरात गेलो, की घरं पाहून खूप अभिमान वाटतो मला दोघांचाही.'

'वा आजोबा, तुम्हालाही छान गोष्ट येते की सांगता. आता यापुढे कधी आजी दमलेली असली, आजीला झोप आलेली असली, आजी कामात असली, तर तुम्हीच सांगायची आम्हाला गोष्ट.' ओवीने असं म्हणायची खोटी, की रवीने लगेच म्हटलंच, 'पण आजोबा, तुम्ही ना अशा घरगुती गोष्टी नका सांगू. तुम्ही ना, सुपरमॅन, साहसकथा, लढाईच्या गोष्टी असं काहीतरी साहसी सांगा.'

'अरे, ते सगळं पुढचं. आधी मला माझी गोष्ट तर पुरी करू दे.'

आईचं बोलणं ऐकून मुलांना आठवण झाली, की गोष्टीचा शेवट जरी आजोबांनी सांगितला असला, तरी मुख्य गोष्ट तर आजीनेच सांगितलीय ना? पण गोष्ट तर पूर्ण झाल्यासारखी वाटतेय आणि आजोबांना पण वाटत असणार तसंच.

'पण आजी, तुझी गोष्ट तर पूर्ण झाली ना?' रवीने विचारलं.

'वारे वा!' आजीने इतक्या जोरात म्हटलं, की न सांगताही मुलाना आठवलंच.

'अरे हो! ते तात्पर्य की काय ते राहिलंय ना?' ओवीने जीभ बाहेर काढली.

'होना, ते तात्पर्य सांगायचं राहिलंय. सांग ना आजी तात्पर्य.' रवीनेही म्हटलं.

'वारे वा! तात्पर्य मी सांगायचं की तुम्ही? सांगितली ती गोष्ट आठवतेय ना, तुमच्या बाबा आणि आत्याची? मग सांगा आता तात्पर्य.'

'तात्पर्य म्हणजे संदेश ना आजी?' ओवीने विचारून खात्री करून घेतली.

'होगं बाई,' आजीने मान डोलावायच्या आधीच रवी म्हणाला, 'शिकवण-शिकवण! काय शिकलो आपण ही गोष्ट ऐकून, ते सांगायचं. तू सांगतेस की मी सांगू?' रवीने विचारलं.

'तू सांग.' ओवीने उदार मनाने रवीला संधी दिली. म्हणजे कसं, चुकलं तात्पर्य रवीचं, तर आपल्याला 'चूक काय' ते तरी कळेल आणि 'बरोबर काय' ते कळणं सोपं जाईल.

'आजी, सोप्पं आहे तात्पर्य. ते असं, की मोठं

## (वात्रटिका)

### निद्रानाश

म्हणतो झालाय निद्रानाश मारतोय म्हणे थापा,
दिवसा बनून कुंभकर्ण,मस्त काढतोय झोपा.
बायको म्हणते, 'नोकरी कर, बन जा वॉचमन,
आजू-बाजूना असंच मिळतंय मोफत संरक्षण.

-डॉ. सुमन नवलकर

**कविता**

# सुख म्हणजे नक्की काय असतं?

**-नलिनी तळपदे**

मावळताना सूर्य म्हणाला,
'उगवेन उद्या मी पुन्हा।
हलका झोका देऊन गेला
वारा पिकल्या पाना।।
चंद्राने तर टिपूर चांदणे
दिले सोबतीला।
आनंदाचे गात तराणे
पहाटवारा आला।।
उन्हे कोवळी पडती
येती रिमझिम रेशीम सरी।
चमकून जाई थेंब दंवाचा
पिकल्या पानावरी।।
फुले उमलती वेलीवरती
किलबिलती पाखरे।
एकाकीपण यात आपुले
पान पूर्ण विसरे।।
पानालाही भावभावना
होते हळवे मन।
आपुलकीच्या ओलाव्याने
गेले चिंब भिजून।।
विचार करता करता झाले
पान ते अंतर्मुख।
आजवरी जे अनुभवले मी
नक्की होते ना ते सुख?
मनी म्हणाले फुलपाखरू
पाहूनि ते पान।
''पिकूनी गेले पान
आणखी सुकून गेली फांदी।
कधी पहावे तेव्हा दिसती
दोघे आनंदी।।
झुकल्या फांदीला सांभाळी
पिकल्या पानाचा देठ
सांगा सुख म्हणजे
नक्की काय असतं?''

होऊन मोठं घर घ्यायचं असेल, तर लहानपणी खिडकीवरून उड्या मारून कोचाला भोक पाडलं पाहिजे.' रवीने झटक्यात उत्तर दिलं. तेही अगदी व्यवस्थित. एकही मुद्दा न वगळता.

आजी-आजोबा क्षणभर अवाकच झाले. पाठ थोपटावी, की पाठीत धपाटा घालावा अशा संभ्रमात असल्यासारखे. तोपर्यंत रवी खिडकीपाशी गेलाही होता. आपण इतकं छान उत्तर दिलंय, ते बरोबरच असणार, याबद्दल खात्रीच होती त्याची.

'पण आजी, एक अडथळा आहे. आपल्या खिडक्यांना गज नाहीयेत. हे ग्रिल आहे नक्षीदार. याच्यावर चढायचं कसं? आणि कोचपण पलीकडच्या बाजूला आहे. समजा चढलोच या ग्रिलवर, तरी कोचापर्यंत उडी पोहोचणं अशक्यच आहे.'

'कप्पाळ!' आजी म्हणाली, 'गाढवांनो, इतक्या गोष्टी मी सांगते तुम्हाला छान-छान. त्यातून हेच शिकता का रे तुम्ही?'

ओवीला रवीचं उत्तर चूक आहे हे कळल्यावर धिटाईने ती म्हणाली, 'मी सांगते तात्पर्य काय ते. खिडकीचं ग्रिल बदलून गज लावून घेतले पाहिजेत आणि कोच सरकवून खिडकीपाशी आणला पाहिजे. शिवाय आई-बाबा एकदमच कुठेतरी बाहेर गेले पाहिजेत. पुढचं सगळं सोप्पंय.'

'उद्यापासून तुम्हालागोष्टी सांगणं बंद. गोष्टी सांगून काही फायदा नाही तुम्हाला.' आजी गरजली.

'नको सांगूस. आजोबा सांगतील उद्यापासून. त्यांनाही छान येतं गोष्टी सांगायला. सांगाल ना आजोबा?' बघते तर आजोबा आहेत कुठे? त्यांनी लगेच काढता पाय घेतला होता. आपल्या हुश्शार नातवंडांना गोष्टी सांगितल्याचं तात्पर्य त्याना कळलं होतं ना?

इमेल- suman.navalkar@gmail.com

*

लेख

# Quit India Spook

**⁎ Shaunak Jayakar ⁎**

**Synopsis**

Have you ever wondered why the Movement was a failure? Was it because of the lack of efforts? No. Was it because of lack of unity? No. Was it because there wasn't enough haunting? I guess so. Wait, what? Yes, you read that right. It's not always what it seems like, eh? You probably wouldn't know this, and the Government too don't want you to know this, as of course its for your own safety, but certain things don't just fit well in the stomach. But hey, you got to digest it!

This book has some instances portrayed making you to grab your seat tight. So, beans might be spilled along the way, telling some never-heard before stories that took place in the country during the Underground and Quit India Movement.

I hope you enjoy this read!

PS: this book has been written for reader entertainment purpose only. All incidents mentioned are purely fictional and has absolutely no relevance with History of our country. I would also like to apologize to all those, whose knowingly or unknowingly, sentiments have been hurt by me because of this writeup. Thank you.

**Chapter 1**

Wind was blowing faster than usual. The world was caught in a battle, a fierce one than usual. Nations against nations. In all this turmoil, was a country fighting for its own Independence. India had now been ruled for more than a century by the Crown rule, who was at the major forefront in the World War. So, amidst all this war, England was now losing the grip-hold over India. Strike when the Iron is Hot, they say is what exactly our countrymen were trying to do. The fight was tough, but so were our ways.

People started forming societies to make their plans on kicking out the rule. Since such an act was illegal, it had to be formed in secret without letting others, for that matter not even neighbours, to know that such an operation was been conducted. It came to be known as the Underground movement. Not in its literal sense underground, but since it was a top secret, and messages were transmitted through code language over radio, it was an off the charts activity going on. The message coders were all spread out across the country, some hiding in remote places, while some would stay low key in the main city. The activity log for operations would be passed by then, informing the members of the society to carry on what task they needed to be followed. One step at a time, the operation was in full swing.

On the Eastern part in a remote village of Maharashtra, called Bhatkuli was one of the transmission places were a person named Dinoba Khave, who was a regular primary school teacher by profession. But secretly, he would work towards the mission right under the Britishers noses. Everything was going on smoothly until this one night time when a drunk villager was returning home, struggling to even walk straight. He fell off on the side of the road into the jungle. Unconsciously drizzy, he opened his eyes to see a female in all white saree, lending a hand to grab and get up. Seeing a female, the man excitedly grabbed her hand and got up, dusted himself and was about to say "hello" when he noticed there was no one around. At first a bit puzzled, but the alcohol was already hitting and he just explained himself that it was the whisky that played in his head. He walked home that night, all forgotten

that something did happen.

The following night, three men were sitting by under a shed smoking a joint. It was their regular spot though, and as usual, after a day's hard work they were all tired and had come to release off their stress. A woman from nowhere suddenly appears walking in the shadows. One of the three men in-between their puffs happen to spot her. He tells the other two pointing at her. All three of them gasp before speaking any word as though they were at their usual spot, the woman they spotted wasn't their regular sight. Moreover, she at this hour was walking in a white draped saree and dog from nowhere starts howling.

Ofcourse, they become a little alert sensing something isn't right. But one of them picks up enough courage to ask her if she needed any help. The walking women stops on hearing the man, and stands still. Without turning, she replies, "Do you know where the famous teacher Dinoba Khave lives?" The men guide her without taking a step further. The women thanks them and starts walking and disappears in the fog which arose from nowhere. The men were sensing something was wrong, and so returned back to their houses without wasting another second there.

Next morning, talks of this spread like wildfire with the superstitious crowd claiming a spiritual presence in the village while the others offering prayer service to their respective Gods to protect their families. The three men took the courage to confirm with Dinoba Khave if anyone did show up at his place at night or during the daytime, but unfortunately, he wasn't aware too. This was indeed a matter of concern. There were some over-optimistic people in the crowd too who had only one thing to say, "there's no such things as ghost." Whether anyone in the village has to believe it or not believe, those three men were sure it was something mysterious and not in a good way.

The next few days went by cold without any paranormal activity and soon the villagers forgot about the incident. Until one late evening, in the weekly market place where all shops were ready to be shut, a baby's crying voice could be heard. Everyone looked around if they could see anything or if they could find the baby from the direction of the voice, but it was untraceable. The voice could be heard from everywhere, but of just one baby and there was absolutely no baby in there as far as anyone's vision could see. People became a little alert and scared and it is but obvious strange to hear a baby crying and there is no baby around. The all just hurriedly wrapped up their shops and left the place as early as they could. The customers who were there, they too ran home without buying what they had come to buy.

Tension started growing everywhere. Talk of the town would be about the spirit. And not just this village, the neighboring villages and towns too were now aware of the news. People would stay in their houses and would come out only if needed. They'd now wander only in groups, never individually. Workers working in the coal mine stopped going to work. This is what grabbed the British officials' attention. Two police officials were sent to investigate the cause of the chaos and fear in the village. Meanwhile, all underground operations were at halt in the Eastern region as Maharashtra was now facing a supernatural enemy. Though the 'supernation' wasn't confirmed, it was sure by now among the people that it wasn't something human that was doing this.

The two officials first went in the spot where the supposed spirit was first seen, by the three men. They inquired around, talked to a few people around and then headed to the market. There was no crying sound now, but the place was deserted by people as even the shopkeepers now feared to linger around in that area. It was nearing night as the two officials lit their oil lamps and continued looking for any clues. Night fell faster that day than the apple from the tree. The two officials were searching in opposite directions now, and this was something they should've had avoided. As one heard some footsteps and went in the direction of the noise, walking behind the tree, he saw nothing there. And then he turned back to see that his companion had disappeared. He called out his name but no response. It was pitch dark and

(वात्रटिका)

**भविष्य**

पोहे नको, शिरा नको, खावा पिझ्झा-पास्ता,
चरबी वाढलीय, त्रास होतोय उठता-बसता.
दीक्षित-दिवेकर, दोनच आता उरले साथी,
म्हणतो, 'आता भविष्य माझं तुमच्या हाती.'

-डॉ. सुमन नवलकर

pin drop silence. The only noise he could hear was his own heart beat which was now beating faster than usual.

Suddenly he heard some noise from the bushes back there and he turned to see where it was coming from. To his shock, he saw something he shouldn't be seeing and fainted there and there. Next morning, there was absolutely no trace of those two officers. Back in the Police Headquarters, the department was waiting for their men to report of any finding and to throw some light on the situation. But to their surprise, there was no sign of them anywhere and no response. They further sent two more men to inquire of their colleagues and find out the ghost-situation. The two officers discussed with the locals if they had seen the two police men a day before and all they got back in answer was that they hadn't seen them since they last went to the marketplace. This was a bit of concern for these two officials too as they doubted the villagers were playing a nasty trick and the stories of the spirit were a hoax. They too went to the marketplace to see any traces of their colleagues in there, but nothing. On the contrary, they too didn't return.

The Police Headquarters were now agitated. They sent a team of police officers to whip up every villager to speak up the truth and tell them where they had hidden their men. The poor villagers were tired of explaining the truth as the Britishers wouldn't believe any paranormal activity took place. They were

almost beaten to death with their body and faces turning all black and blue, yet the Britishers didn't show any mercy and thoroughly investigated each one to find the truths.

Since the people had only believed it to be spirit of some sorts, they weren't even aware if at all there was anyone behind it. The sightings and experiences they had all summed up to just one conclusion for them, the one that the Britishers refused to believe and after almost a week's torture, with no useful information in hand, they gave up on the villagers and released them. Intelligence of the event happening was sent to England and the Crown was notified. The Britishers were now more alert as they had sensed that the people here in India were upto something which might not turn out good if ignored. Since England was already at war with the world, it was not possible for them to deploy more officers to look after India, so the team looking after India's proceedings had to be on their own. A smart plan had to be derived to counter attack any secret operation run by India against the Crown. So, while England was gearing up in the world war, the officials here were gearing up to face all challenges thrown at them.

**Chapter 2**

The spirit sightings though started in a remote village in Maharashtra, were now slowly spreading out all across the country. More than the Britishers, people now feared the hauntings taking place, as there was no escape and a sudden emergence which would leave them total helpless.

In the Kasai town near Agra, a group of kids were playing their usual game Gilli-danda when another kid of about their age asked them if he could join them in playing. The kids being young and innocent, allowed him to play with them. While hitting the gilli with the danda, the kid deliberately hits in to the side where there are bushes and the kids run for the gilli in the bushes. They find there is a dead crow with no head and when they look back, the kid who asked them if he could join and then hits the gilli hard suddenly disappears. No one had seen him before this, and no one ever saw him after this. The kids petrified, all rushed back home.

Similar instance occurred in Calcutta, where

## प्रभुतरुणाच्या वाढदिवसाबद्दल प्रतिक्रिया

My dear Sanjana,

This is right from my heart -

'प्रभू तरूण ९८ वर्षांचा वृद्ध नाही; पण ९८ वर्षांचा तरूण झाला असं म्हणावं लागेल . त्याचा वाढदिवस अशा आगळ्यावेगळ्या पद्धतीने साजरा होणे ही एक अत्यंत गर्वाची व कौतुकाची बाब आहे हे सांगायलाच नको. सर्वप्रथम संजना कोठारे व मोनिका राणे-अय्यर या दोघींना मन:पूर्वक सलाम, कारण माझ्या आठवणीप्रमाणे प्रभू तरुणाचा वाढदिवस अशा प्रकारे याच्या अगोदर कधी साजरा झाला नव्हता. हल्लीच्या राहणीमानामुळे कुटुंब लहान होत चालले आहे, पण त्यांना जवळ आणण्याचं काम प्रभू तरुणाने केलं. जगभर कित्येक सोकाजी आईवडिल आपल्या मुलामुलींचं घरबसल्या कौतुक 'बघून भारावून गेले असतील. ही सर्व तरूण व जेष्ठ पाठारे प्रभू स्वत:च्या गाण्याचं व नाचण्याचं कौतुक बघून नक्कीच प्रभावीत झाले असतील ही किती अभिमानाची गोष्ट आहे. पाठारे प्रभू ही कितीतरी लहान जमात असून, जगाच्या कानाकोपऱ्यात त्यांचे तरूण व जेष्ठ कुठे ना कुठे चांगल्या हुद्यावर सापडतात. अशीच सर्व पाठारे प्रभूंची प्रगती व्हावी ही ईश्वर चरणी प्रार्थना.'

-सुजन राणे

(USA - Email: panditsujanrane@gmail. com)

---

there were a few women who went by the river to wash clothes. They were busy talking amongst themselves while washing when out of nowhere a female popped up in all white carrying with her all-white clothes. She sat close to them, but her face wasn't visible to them. She started washing off from her basket of clothes, without uttering a single word. They other women stopped washing to look at who this woman was. One of them asked her if she was new to this locality. The women in white replied, in a very heavy voice, "I've been here forever" and then she jumps into the water and disappears. Looking at this, the women panicked and ran helter-skelter crying for help.

Although everywhere it started with scaring off the people and invoking fear, it escalated further to instances of disappearances of British Officers. Just like not two days ago, in Vishakhapatnam, there was a British officer of a good designation, on his regular commute to office saw something unusual on the way. He stopped by to look deep into the matter, and followed the trail where he found himself in an isolated and rusty building, with all cobwebs everywhere and that was the last of him what his family had seen. Poof! He just disappeared into there. No one knows where he is now.

Another one in Gulbarga, where a platoon of officers was practicing their march-pass, no one was around on the ground. They took a break wherein a few went to take a leak while the others grabbed water. The ones gone to the washroom didn't return. This made the others alert, and hence went in to check as it was long since they were inside. And that was the last of those too. The whole platoon disappeared, in thin air.

This was fuming the Britishers a lot now. Their men disappearing more and more each day, they had to take strict actions. There were direct orders from England in this regard to take the call needed to control the situation as now it was slipping away. England couldn't afford this, definitely not under the ghosting reason provided. They had to investigate this matter and put an end to this. But with such an act spread out across the huge sub-continent, they had to devise a plan. A strategy was needed to be implemented with immediate action as each day was now costing them with lives of their own men.

But the main question remained was how? The people of India believed in superstitions and ghost stories and were all carried away by the belief that the happenings were all part of a supernatural paranormal activity and that there was no human involved. Moreover, since they have been ruling over a country who is fighting for its own freedom, why would the people of the same country want to betray their own people? But there was a solution to the second question. Reward. A huge lumpsum rewards in

gold, silver and currency is always a way to shake away a person's morals. Exactly how the East India Company set foot on the soil of the country, the same tactics were to be used now. With a slight difference, that instead of posting a public reward to capture the ghost, they selectively picked up people based on their history and patriotism and made deals to provide them with huge rewards if they were able to get hold of any important information about the mastermind or even perhaps the members involved.

**Chapter 3**

Now with a few people in the crowd who made a deal with the devil, those who once feared the sightings were now taking up the courage to find out the matter that was going on. So, the next time when any paranormal activity was sensed, these people, though still with a lot of fear in them, managed to get to the root cause of it. Like in Satna, Madhya Pradesh, just when an man in all white acting blind was spotted at night crossing a road in a silent jungle, these men grabbed hold of him and tied him to the nearest tree. The stunts of capturing were performed after taking a huge breath and praying Hanuman Chalisa in mind, but the reward was playing like an instrument in from of their eyes and money was the only object they could see. Many places across the country, these Now the so-called ghosts/spirits had to be unmasked as to find out who was in there. Turns out, their own people, the localities who stayed in the same villages would dress up as spirits to invoke a sense of fear among the people. But the question was "Why?"

During the Quit India movement, a lot many underground movements came into action. But all of these underground movements followed this one major principle of non-violence. This is a slow process, which might turn effective,

but given the chances that by creating some form of violence, if it is possible to get rid of the Crown rule, then why not take that option. Freeing the country should be the main aim and not freeing the country by means of non-violence. This secret society was formed to create fear in the minds of the Britishers, and upon getting even a slight opportunity, should kill as many Britishers as they can so that a direct battle is averted at the same time their existence is also ceased. Though pure intentions, their approach was very different that the rest and would have been not acceptable to most. This was the main reason why it had to be kept as a secret even with the local public as this would create fear among them and the fear would be natural and not forced.

Now, the main concern was for those sold souls. These patriots, who though formed the secret society, did everything for their own country. On the other hand, the ones who had made a deal to provide insider information were in big dilemma, money or patriotism. The decision was tough. While most chose to be a true patriot for the country, there were a few greedy who were just hungry for money and nothing else they cared for. They handed over the information along with names they knew who were a part of this secret society and soon the Britishers raided their house. Some managed to escape while some were captured and tortured for their actions.

Escaped or not escaped, that was the last of the society as the news of the unmasking had too, spread like wildfire. People no longer feared any such sightings and it was nearly impossible to make any Britisher officer disappear with this tactic. This was it. The end of it. The end of a secret society. A powerful initiative taken by some brave heroes who didn't think even twice before doing anything for their country. Long live their legacy.

*

**(वात्रटिका)**

**पियानो**

मित्राच्या बंगलीत पियानो पाहिला,
'मलाही हवा पियानो',मुलगा म्हणाला.
पियानोवर त्या सुकतात कपडे, ठेवतात सामान,
पियानोवर जेवतात जेवण, लिहितात लिखाण.

**-डॉ. सुमन नवलकर**

लेख

# निगराणी

*** सौ. प्रणिता प्रभाकर ***

निगराणी या शब्दाचा अर्थ आहे 'लक्ष्य ठेवणे किंवा निगा राखणे' ज्याला आपण इंग्रजीत Nurturing or Caring म्हणतो. मग ते बाळ असू देत, रोपटे असू देत किंवा एखाद्या पाळीव प्राण्याचे पिल्लू असू देत. ह्या सर्वांची निगराणी ही करावीच लागते. निगराणी म्हणजे निगा राखणे होय. निगा राखायची झाली तर मग कधी लोण्याहून मऊ व्हावे लागते तर कधी दगडासारखे कठीण किंवा कठोर व्हावे लागते. अगदी डोळ्यात तेल घालून जपावे लागते. आपल्याकडून थोडे जरी दुर्लक्ष झाले की समजावे काहीतरी विपरीत घडून येणार, आणि खरोखरच 'पेरावे तसे उगवते' ह्या म्हणीनुसार आपल्या वागणुकीची पडछाया आपल्या मुलांमध्ये दिसून येते. मुलात थोडा जरी फरक आढळून आला तर नक्कीच समजावे की त्याच्यावर एकतर संगतीचा परिणाम झालेला आहे किंवा नकळत विपरीत गोष्टींच्या आहारी गेलेला आहे. त्याकरिता पालक म्हणून स्वत:चा स्वत:ने अभ्यास नीट केला पाहिजे. मुलांना त्यांच्या शब्दात समजावून सांगण्याची क्षमता असली पाहिजे. फक्त हे करू नकोस, तसे वागू नकोस म्हणून चालत नाही; तर असे न करण्यामागचे सोदाहरण कारण द्यावे लागेल. नाहीतर ही मुले जुमानणार नाहीत. हे असे करण्यासाठी ठराविक वयाची अपेक्षा नसते. अगदी लहानपणापासून म्हणजे शाळेत जाण्याच्या वयापासून ते अगदी वयात येईपर्यंत म्हणजे कॉलेजशिक्षण पूर्ण होऊन नोकरी लागेपर्यंत. जास्त कारणमीमांसा न करता आपण काही उदाहरणे बघूयात.

साधारणपणे वयाच्या तिसऱ्या वर्षी मूल शाळेत जाऊ लागते. शाळा हे एक त्याच्यासाठी नवीन जग असते. त्याच वयोमानाची परंतु वेगवेगळ्या पार्श्वभूमीतील (different background) मुले एकत्र येतात व ३ ते ४ तास एकसंगतीने त्यांचा कार्यभाग करीत असतात. ह्या वेगवेगळ्या पार्श्वभूमीमुळे प्रत्येकाची बोलण्याची, वागण्याची पद्धत वेगवेगळी असते. परंतु लहान मूल मातीचा गोळा असल्याकारणाने त्याला जसा आकार द्यावा तसे ते घडत जाते. त्यात त्याचा काहीही दोष नसतो. घरातील वातावरणाची प्रतिकृती/पडछाया शाळेत दिसून येते. मुले नेहमी आपल्या आईवडिलांची व इतर घरातील मंडळींची सहज नक्कल करत असतात. ह्या कोवळ्या वयात चांगल्या-वाईटाची, खऱ्या-खोट्याची जाण नसते. त्यामुळे ही मुले सर्व गोष्टी पटकन् आत्मसात करतात व आपल्या सवंगड्यांसोबत तसे वागतात. परिणामी शाळेतील नक्कल घरी होत असते.ही मुले जेव्हा वाईट-साईट बोलू लागतात तेव्हा सुजाण पालकांच्या ते पटकन् लक्षात येते व मुलांना न दटावता लीलया त्यांच्याकडून समजून घेऊन तसेच त्यांना समजावून सांगणे योग्य आहे. उदाहरण देऊन सांगायचे झालेच तर you stupid , you dustbin, वगैरे शब्दप्रयोग घरी जर होत नसतील तर नक्कीच शाळेत कुणीतरी त्याचा वापर करीत असेल. तेव्हा चाणाक्ष पालकांनी ते लक्षात घेऊन आपल्या पाल्यास समजावून सांगून त्याची शहानिशा करावी.

कुठल्याही दोन व्यक्ती एकसारख्या नसतात. ज्याला इंग्रजीत आपण 'No two individuals are alike' असे म्हणतो. ही म्हण एकाच आईवडिलांच्या दोन मुलांनाही लागू पडते. ह्याचा अर्थ असा की दोन भावंडांमध्ये फरक असतोच. आईवडील दोन्ही

मुलांना सारखेच संस्कार देतात तसेच शिक्षणही सारखेच देतात. परंतु त्या दोन मुलांमधील एक हुशार व दुसरा साधारण निघाला / निघाली तर अलबतच त्या आईवडिलांना आपले साधारण अपत्य हुशार अपत्यासारखे व्हावे असे वाटणार व त्यासाठी वेळोवेळी हुशार अपत्याचे उदाहरण देऊ लागतात; जेणेकरून दोनही अपत्ये हुशार असल्याचे मनोमन समाधान मिळावे . असे केल्याने नकळतपणे साधारण अपत्याच्या मनात तो किंवा ती मोठे होत असताना हीन भावना म्हणजे न्यूनगंड निर्माण होऊ लागतो व परिणामी त्या अपत्याचे खच्चीकरण होऊ लागते आणि Good for nothing ची भावना बळावू लागते. स्वत:मध्ये सकारात्मक गोष्टींची न्यूनता असल्याची भावना निर्माण होते.

उदाहरणदाखल; एक मुलगा असाच न्यूनगंडाचा बळी झाला. मुलगा मोठा व मुलगी लहान. मुलाची बुद्धिमत्ता साधारण; तर मुलीची बुद्धिमत्ता तेज. वडीलही हुशार असल्याने नेहमीप्रमाणे ते आपल्या मुलामध्ये स्वत:ला शोधत होते. परंतु तो शोध पूर्ण होत नसल्याने साहजिकच दोन मुलांमध्ये वडील स्वत: तरतमभाव करू लागले व मुलाच्या मनात Good for Nothing ची भावना बळावली. त्यामुळे मुलाचे वर्गात लक्ष लागेना. तो स्वत:च्याच जगात असायचा. एकदा तो मुलगा माझ्याकडे समुपदेशनासाठी आला असता, त्याने सहजच आपले दोन्ही हात टेबलावर ठेवले असता माझ्या लक्षात आले की त्याची नखे गुलाबी रंगाची होती व तसे कौतुकास्पद त्याला मी म्हणालेही. परंतु त्याच्या उत्तराने मी अवाक्‌च झाले.तो म्हणाला, 'नाही मॅडम, तुमच्या गुलाबी साडीच्या रंगाची छटा सूर्यकिरणांमुळे माझ्या नखांवर पडली आहे'. आता बोला! त्याच्यात न्यूनगंडाची भावना किती बळावली होती ती! तेंव्हा त्या मुलासोबत वडिलांनाही समुपदेशनाची अत्यंत गरज होती हे माझ्या लक्षात आले व तसे मी कृतीतही उतरवले.

एका चौकोनी कुटुंबात वडिलांचा मोठा मुलगा लाडका; तर धाकटा आईचा लाडका. पहिला मुलगा झाल्यावर दुसऱ्या वेळेस मुलगी व्हावी ही वडिलांची अपेक्षा; परंतु त्यांची अपेक्षापूर्ती झाली नाही आणि

कविता

# पणजी ग पणजी

पणजी गं पणजी , सांग ना मला।
एवढा उत्साह तुझ्यात आला कसा? ।।१।।

बोलतानाही तू कैवढी हसतमुख असतेस।
जगावे कसे ते अलगद शिकवून जातेस ।।२।।

कवयित्री म्हणून तुझा काय तो दरारा ।
समाजाचा कार्यक्रम तुझ्या काव्या विना अधुरा ।।३।।

काव्य हि तुझे इतके लाघवी असते ।
कसे जमते तुला हे गुपित सांग बरे? ।।४।।

पणजी गं पणजी , तू अशीच रहा हसत ।
शंभरी गाठ , असाच सुवास दरवळत ।।५।।

-श्वेत

(सौ.स्वागता प्रियेश विजयकर )

नलिनी तळपदे यांनी श्वेतवर कविता केल्यावर त्यांच्याच शब्दात दिलेले हे काव्यमय उत्तर.

---

साहजिकच उघडपणे दोन मुलांमध्ये दुजाभाव करण्यास वडिलांनी सुरुवात केली. वडिलांचा स्वभाव हट्टी आणि तापट असल्याने त्यांच्यापुढे आईचे म्हणजे त्यांच्या बायकोचेही काही चालत नसे. त्या नावडत्या मुलाने मागितलेली कुठलीही गोष्ट किंवा वस्तू वडील त्याला आणून देत नसत व त्याच्याशी तुच्छतेने वागत. मुलात-वडिलांमध्ये कधीच संभाषण नव्हते. परिणामी मुलगा वाममार्गाला लागून एक दिवस तो गजाआड झाला.

म्हणून पुन्हा एकदा सांगावेसे वाटते की, आईवडिलांनी आत्मपरीक्षण करणे जरुरीचे आहे. दोघांमध्ये सुसंवाद असणेही तितकेच जरुरीचे आणि महत्त्वपूर्ण आहे. तसेच मुलांना अती लाडाकोडात किंवा अती शिस्तीने वागवल्याने परिणाम नक्कीच गंभीर होतात.

तसेच एकल पालकत्वाचे उदाहरण द्यावयाचे झाल्यास, पती-पत्नीमध्ये लग्नाच्या एका वर्षातच बेबनाव होऊ लागला व त्याच वेळेस ती गरोदर होती. परिणामी मुलाचा जन्म झाल्यावर ती जी माहेरी आली

### (वात्रटिका)

### एक करता दोन

काऱ्र्यांची भाजी, भरली कार्ली, कार्ली-भात
मधुमेह काय झाला,त्याची लागलीय वाट.
दूरच राहिलं,कमी-बिमी होणं शुगर,
डोकं फिरून-फिरून वाढलं ब्लडप्रेशर.

**-डॉ. सुमन नवलकर**

ते कायमची. त्या नवजात बालकाने आपल्या वडिलांचा चेहरा आजतागायत कधीच पाहिला नाही. विनावडिलांचा मुलगा आपल्या आजोळी वाढत होता. दरम्यान फारकतीचा न्यायालयात दावा चालू होता. त्यामुळे आजोळच्या लोकांनी त्याच्या बाबतीत अती सावधगिरी बाळगली. काळजीपोटी त्याला त्याच्या समवयीन मुलांमध्ये मिसळू देत नसत. त्याला वाचनाची आवड निर्माण झाल्याने तो शाळेव्यतिरिक्त घरात एकटाच पुस्तके वाचत बसायचा. पुस्तक जरी माणसाचा खरा मित्र असला तरी ही त्याला समाजात राहण्यासाठी व वावरण्यासाठी इत्तर माणसांची गरज असते. त्यांच्याशी व्यवहार करणे, नाते संबंध ठेवणे हे ओघाओघाने प्राप्तच आहे. ह्या सर्व गोष्टींची त्याच्या आयुष्यात वानवा असल्याने त्याचा सामाजिक स्तर (Social Quotient) हा त्याच्या बौद्धिक स्तराच्या मानाने खूपच कमी असतो. नव्हे; तो वाढण्यास वाव दिला जात नाही. परिणामी त्याचा समाजाला सामोरे जाण्यासाठी लागणारा आत्मविश्वास कमकुवत झाला आणि कुचकामी ठरला. परंतु त्याची आई खूपच धीराची व सुशिक्षित असल्याने स्वत:च्या पायावर उभी राहून, मुलाला चांगले शिक्षण देऊन त्याला मोठा केला. मुलगा जात्याच हुशार असल्याने तो शिक्षणात तर चमकलाच व स्वत:च्या हुशारीवर चांगली नोकरीही मिळवली. पण दुर्दैवाने बिनबापाचा मुलगा म्हणून आजोळच्या लोकांनी लाडाकोडात व अती सावधगिरीने वाढवल्याने त्याच्यातील समाजाभिमुख आत्मविश्वास कुचकामी ठरला.

आता एखादे सकारात्मक उदाहरण बघुयात. आईवडिलांचा एकुलता एक मुलगा. पहिल्यापासून खिलाडूवृत्ती; आणि अभ्यासातही तितकाच हुशार. आईवडील दोघेही नोकरी करणारे; पण एकत्र कुटुंबपद्धतीत राहणारे. सर्वसाधारणपणे प्रत्येक घरात जे चित्र दिसते तसेच चित्र ह्यांच्याही घरात होते. म्हणजे असे की लहान मुलांचा अभ्यास नेहमी आईच घेत असते तसे ह्या मुलाची आईसुद्धा त्याचा अभ्यास घ्यायची. वेळोवेळी शाळेत जाऊन म्हणजे पालक सभा वगैरेना हजर राहून मुलाच्या प्रगतीच्या आलेखाची नोंद ठेवत असे. त्या मुलात खिलाडूवृत्ती असल्याने त्याला ऐन परीक्षेच्या दिवसातसुद्धा रोज अर्धा तास खेळायला मुभा देत असे. हे असे केल्याने त्या माउलीला माहीत होते की तिचा मुलगा दुसऱ्या दिवसाच्या परीक्षेच्या अभ्यासाला १०० टक्के झुकते माप देणार. आता परीक्षेच्या दरम्यान आपल्यासारख्या पालकांना सवय असते ती अशी की, झालेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्न कसे सोडवले ते आपल्या पाल्याला विचारणे व चूक केल्यास त्याची खरडपट्टी काढणे. असे केल्याने मुलाचे खच्चीकरण होते व आत्मविश्वास डगमगून दुसऱ्या दिवसाच्या परीक्षेच्या विषयाचा अभ्यास करताना त्याचे लक्ष विचलीत होते. पण तो हे कोणाला सांगू शकत नाही. कारण आईचा ओरडा मिळेल म्हणून. असे आपल्या मुलाच्या बाबतीत होऊ नये म्हणून तिने कधीच तिच्या मुलाला झालेल्या विषयाच्या प्रश्नपत्रिकेविषयी विचारणा केली नाही. उलटपक्षी त्याला प्रोत्साहित करीत असे. जेणेकरून आपला मुलगा नीट लक्ष देऊन अभ्यास करेल. अशाप्रकारे त्या मुलाच्या प्रगतीचा आलेख वर्षागणिक वरवर चढत गेला. इतकेच नव्हे तर महाविद्यालयातसुद्धा त्याने विद्यापीठीय स्तरावरील विविध क्रीडास्पर्धात भाग घेऊन बक्षिसे मिळवली. तसेच इतर स्पर्धांमध्येही त्याने नाव कमावले व आज तो उच्च विद्याविभूषित असून परदेशातील एका नामांकित कंपनीत नोकरी करीत आहे.

हे सांगण्याचे तात्पर्य म्हणजे प्रत्येक पालकाने आपल्या पाल्यातील सुप्तगुणांची पारख करून त्याला त्याप्रमाणे तालीम दिल्यास आपल्या निगराणीच्या समाधानाची कल्पना करणेच बरे.

लेख

# शिक्षकाचा ज्ञानमार्गी अनुभव

**✶ गीता आंबवणे ✶**

### वसा ज्ञानार्जनाचा!

सेवासदन ट्रेनिंग कॉलेजातून रीतसर २ वर्षांचा टीचर्स ट्रेनिंगचा डिप्लोमा घेऊन मी १९६१ ला बाहेर पडले. माझे नशीब थोर म्हणून माझी गिरगावातील एका नामवंत शाळेत प्राथमिक शिक्षिका म्हणून जून १९६२ मध्ये नेमणूक झाली. खूप आनंद झाला; पण नातेवाईक मित्रमंडळीने मात्र या नेमणुकीस नाके मुरडली. का? तर मराठी मिडीयम व प्राथमिक शाळा म्हणून! मातृभाषेतून छोट्यांना शिकवणे मला मात्र भाग्याचे वाटले. छोट्या-छोट्या निष्पाप मुलांना देव समजून शिकवणे यासारखे भाग्य नाही. एकप्रकारे देवपूजाच म्हणावी लागेल.

'उतू नको, मातू नको - घेतला वसा टाकू नको?' ही माझ्या आत्याची शिकवण लक्षात ठेऊन मी कामाला लागले. सकाळ अधिवेशनात तिसरी-चौथीसाठी माझी नेमणूक होती. मुख्याध्यापक - सहकारी शिक्षक यांच्या मार्गदर्शनामुळे माझी गाडी पुढे सरकू लागली. 'जे जे आपणास ठावे, ते ते बालकांशी द्यावे' या उक्तीनुसार मी ज्ञानार्जन करण्यास उभी ठाकले. कोणताही विषय रंगवून कसा शिकवावा याचे बाळकडू माझ्या आत्याकडून मिळाले होते. माझी चित्रकला चांगली होती. त्यामुळे इतिहास-भूगोलसारखे विषय मी फळ्यावर चित्र काढूनच शिकवत असे. त्यामुळे विषय मुलांना समजणे सुलभ होई. अशा रुक्ष विषयाचीही मुलांना गोडी वाटू लागली. भारत-महाराष्ट्र याचा नकाशा समोर ठेऊन त्यातील राज्ये, जिल्हे मार्ग शोधण्याचा खेळ मुलांच्याच साह्याने घेतला. माझी शिकवण्याची ही पद्धत आमच्या मुख्याध्यापकांना आवडली. त्यामुळे पुढील वर्षी त्यांनी माझ्या गळ्यात शिष्यवृत्ती वर्ग टाकला. ते आव्हानही मी स्वीकारले. थोडी गणिताची भीती वाटत होती. पण त्याच वर्षी महाराष्ट्र शासनातर्फे शिष्यवृत्ती मार्गदर्शनाचे शिबीर आयोजित केले. दहा दिवसांच्या शिबिरात मी व आमच्या उपमुख्याध्यापिका श्रीमती वालावलकरबाई या दाखल झालो. तेथे शिक्षणमहर्षी श्री. वा. ना. दांडेकर व श्रीमती विमल व्यास यांचे यथायोग्य मार्गदर्शन प्राप्त झाले. माझे गणिताविषयीचे भय पार पळाले. त्याशिवाय बालमोहन शाळेचे दादा रेगे - बापू रेगे यांचेही मार्गदर्शन घेऊन माझे शिष्यवृत्ती वर्गाचे काम सुरू केले. चौथी वर्गासाठी २ ते ३० पाढे उलट-सुलट म्हणण्याचा सराव दिला. शिवाय पावकी/निमकीही होतीच. परिमाण (विविध) प्रत्यक्ष दाखविली. हाताळण्यास दिली. या सर्वांचा उपयोग तोंडी उदाहरणे सोडविण्यास झाला.

१९७२ मध्ये मी उपमुख्याध्यापक व श्रीमती वालावलकर मुख्याध्यापिका झाल्या. आम्ही दोघींनी मिळून शिष्यवृत्ती वर्गाचा आलेख उंचावण्याचे ठरविले. त्यासाठी पहिलीतून दुसरीत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे गुणवत्तेनुसार वर्गीकरण करत शिष्यवृत्ती वर्ग तयार झाला. त्यामुळे जास्तीत जास्त वेळ वर्गासाठी देता आला. वालावलकरबाईंचे भाषेवर प्रभुत्व होते. त्या कविता चालीवर शिकवीत. मी गणित विषय सांभाळला. त्यासाठी मुलांना तोंडी हिशोबाचा भरपूर सराव दिला. मुलांच्यात चुरस लावण्यासाठी त्यांना गुण देण्यात आले. प्रथम उत्तर दाखविणाऱ्यास १००० गुण. त्यानंतर ७५० - ५०० - २५० व पुढील सर्वांस १०० गुण. शेवटी ज्याचे गुण जास्त त्याचे टाळ्या वाजवून कौतुक व बक्षीस म्हणून एक रंगीत खडू देण्यात येई. पूर्वी शिष्यवृत्तीला सामान्यज्ञान विषय होता. नंतर तो बुद्धिमापन झाला. हा विषय तर मला शिकविणे फारच गमतीशीर वाटू लागला. भरपूर सरावामुळे शिष्यवृत्ती वर्गाचा आलेख खरोखर वाढत

गेला. पूर्वी १-२, १-२ करता करता येणाऱ्या विद्यार्थ्यांचा आकडा १७ पर्यंत पोहोचला. त्यात बृहन्मुंबईतून प्रथम येण्याचा मानही आमच्या शाळेला प्राप्त झाला (अनेकवेळा) निकालही १०० टक्के लागत असे. वालावलकरबाई योजना आखीत - तर मी त्या कार्यान्वित करीत असे. संस्कारांसाठी सर्व सणही साजरे होत असत. दिव्यांची अमावास्या शिशुवर्गात विविध प्रकारचे दिवे मांडून त्याची पूजा करीत. आमचे विद्यार्थी ते पाहण्यास जात व विविध दिव्यांची ओळख करून घेत. त्याशिवाय दिंडी, गोविंदा, रक्षाबंधन, दसरा पाटी पूजन हेही दिमाखात साजरे होत. शाळेचे एक वार्षिक प्रदर्शन भरवीत असत. त्यावेळी मी विद्यार्थी व शिक्षक यांच्या मदतीने ऊसाचे शेत पासून कारखान्यातील साखर-मूळ बाहेर पडेपर्यंतचे मॉडेल केले होते. एकवर्षी कोंडाणा किल्ला, मावळे, तानाजी, घोरपड हेही मॉडेल केले होते. तसेच आंतरशालेय स्पर्धांचे आयोजनही केले आहे. (उदा. चित्रकला, हस्ताक्षर, वक्तृत्व यासारख्या) विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलीतून निसर्गाची ओळख देण्यात येई.

वर्गातून दोनवेळा पालक सभेचे आयोजन - त्यातून विषयाचे मार्गदर्शन, दप्तर, मधल्या सुट्टीचा डबा कसा असावा याबद्दल संवादरुपाने चर्चा होई. मुलांचे वाढदिवस मोठ्या प्रमाणात साजरे न करता प्रत्येकाने एक पुस्तक भेटीदाखल द्यावयाचे ठरले. बोल-बोलता आमचे वाचनालय पुस्तकाने समृद्ध झाले. अधिक सरावासाठी नवनीत-जीवनदीप प्रकाशकांचे व्यवसाय लावले. मिळणाऱ्या कमिशनमधून जेव्हा एखादा शिक्षक गैरहजर असतो- त्या जागी पालकांना वर्ग सांभाळण्यास बोलवत असू. त्याचा त्यांना मेहनताना त्या कमिशनमधून देण्यात येई. वर्षअखेर पैसे उरले तर वार्षिक शुक्रवार करून भेळ किंवा चणे देण्यात येत असत.

१९८९ ते १९९९ हा १० वर्षांचा काळ मी मुख्याध्यापक म्हणून सांभाळला. या काळात आकाशवाणीवरील शालेय कार्यक्रमात जाण्याची संधी मिळाली. विज्ञान-फळे या विषयावर नाटिका लिहून २ विद्यार्थ्यांच्या मदतीने कार्यक्रम सादर केला. तो कार्यक्रम शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना ऐकवला गेला. अक्षर सुधारण्यासाठी काही शिक्षक व लिपिक यांच्याकडून कित्ते गिरवून घेतले. इतर शाळांतून येणाऱ्या शिक्षकांस मार्गदर्शनही केले. याच कालावधीत संगमेश्वर तालुक्यातील धामणी गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत बुद्धीमापन विषयाचे मार्गदर्शन व पहिलीच्या वर्गावर आदर्शपाठ देण्याची संधी मला व माझी सहशिक्षिका पूनम सावंतला मिळाली. यासाठी एक महिन्यातील शनिवार-रविवार आम्ही त्या शाळेत जात असू. त्यामुळे त्या शाळेतून आम्हीही काही चांगल्या गोष्टी घेऊ शकलो. अर्थात ही संधी आम्हाला मिठीबाई कॉलेजचे प्राचार्य श्री. चंद्रकांत केळकर यांच्यामुळे प्राप्त झाली. त्यांनी ती शाळा दत्तक घेतली होती. तसेच गोरेगाव येथे श्रीमती मृणाल गोरे यांनी 'नागरी निवारा' येथे नव्याने सुरू केलेल्या शाळेत घ्यावयाच्या शिक्षकांच्या मुलाखती घेण्याचे कामही मला केळकरसरांमुळे मिळाले होते. माझ्या निवृत्तीनंतर मी त्या शाळेत सुपरवायझर म्हणून यावे ही त्यांची इच्छा मात्र मी पूर्ण करू शकले नाही याबद्दल खेद वाटतो. नवनीतचे गालासाहेब यांनीही व्यवसाय तयार करण्यासाठी त्यांच्या ऑफिसात येण्याची विनंती केली. पण कौटुंबिक अडचणीमुळे तेही मी नाकारले.

माझ्या उपमुख्याध्यापक ते मुख्याध्यापक या कालावधीत रोज शाळा भरताना व सुटताना शाळेच्या गेटवर उभे राहून मुलांचे स्वागत व निरोप देत असे. विद्यार्थ्यांना दिलेले ज्ञान, जिव्हाळा, प्रेम, लळा यामुळे मुले हायस्कूलात गेली तरी प्रायमरीच्या शिक्षकांना विसरत नाहीत हा माझा अनुभव आहे. मातृभाषेतून शिक्षण घेतलेले आमचे विद्यार्थी आज सर्व क्षेत्रांत आघाडीवरच आहेत. कोणी वैद्यकीय क्षेत्रात, कोणी इंजिनिअर, कोणी कारखानदार, कोणी अभिनयात, तर कोणी नोकरीत उच्चपदे भूषवीत आहेत. काही तर परदेशात वास्तव्य करून आहेत. हे पाहिल्यावर आम्हाला त्यांचा अभिमान वाटतो. आम्ही धन्य होतो. अजूनही कित्येक विद्यार्थी माझ्या संपर्कात आहेत. विद्यार्थ्यांचे विवाहसोहळे पाहिले - आता त्यांच्या मुलांच्या विवाहातसुद्धा माझी हजेरी लागते. हे सर्व पाहता शिक्षिका असल्याचा मला सार्थ अभिमान वाटतो. मी धन्यता मानते. एकंदर ३७ वर्षे मी विद्यादानाचे कार्य केले.

-श्रीमती स्वाती जयकर

कथा

# प्रथमच

## * कल्पना सुभाष कोठारे *

दूरदर्शनवर एक जाहिरात वारंवार दिसते. एक आई फोन हातात घेऊन बोलण्यात मग्न असते. ती वळून बघते, तो काय आश्चर्य! तिचे रांगते बाळ, भिंतीला धरून उभे राहते व हळूच हात सोडून, डगमगत्या चालीने, एकेक पाऊल उचलीत तिच्याकडे येऊ लागते. बाळाच्या चालण्याचा तो प्रथमाविष्कार ती लगेच गुडघ्यावर बसत, कॅमेरात टिपते. बाळाचा फोटो घेणारी आई, तिच्या चेहऱ्यावरील कौतुक, आणि तिच्या मिठीत झेपावणारे बाळ - हे सर्व आपण दूरदर्शनच्या पडद्यावर पाहत असतानाच, एका तेलाच्या बाटलीचे चित्र समोर येते व आपल्याला कळते की ही एका, बाळाच्या पायात शक्ती देणाऱ्या तेलाची जाहिरात होती.

जाहिरातीतील ते बाळ मोठे झाल्यावरही कदाचित ही जाहिरात बघू शकेल. त्याच्या आईच्या चेहऱ्यावरचा आनंद, ते मोठे बाळ बघू शकेल. सर्वांच्याच वाट्याला असे भाग्य येत नाही. मात्र कॅमेऱ्याप्रमाणे जेष्ठ लोकांच्या स्मृतीत बंद असलेल्या गोड आठवणी, तुम्हाला मोठेपणी ऐकता येऊ शकतात. अर्थात् वेळात वेळ काढून तुम्हाला त्यांच्याशी संवाद साधावा लागेल तरच तुमच्या बालपणीच्या स्मृतींचा अत्तरसुगंधी शिडकावा तुमच्यावर होईल.

अशीच एका छोटीची-मिकीची-ही गोष्ट आहे. त्याकाळी लोकप्रिय असलेल्या वॉल्ट डिस्नेच्या 'मिकी माऊस'वरून, घरातील शेंडेफळाला हे टोपणनाव लाभले असावे. जाहिरातीतील बाळाप्रमाणे पहिले पाऊल टाकून, मिकीने कधीच घरभर फिरण्यास सुरवात केलेली आहे. मात्र आई, बाबा, काका, दादा असे शब्दच फक्त ती बोलू शकते. सलग वाक्य बोलण्याचे वय, अजून मिकीने गाठलेले नाही. घरभर लुटूलुटू चालणाऱ्या मिकीला, हातात सापडेल ती वस्तू न्याहाळण्याची सवय आहे - क्वचित ती तोंडातही जाऊ शकते - त्यामुळे घरातील प्रत्येकजण, महत्त्वाच्या वस्तू शक्यतो उंचावर, मिकीचा हात न पोचेल, अशा ठिकाणी ठेवतो. तरीही क्वचित कुणाचे पेन हरवते तर; कधी चष्माच सापडत नाही. अशावेळी शोधाशोध असताना, मिकीच्या खेळण्यांची बास्केट हमखास उलथून पाहिली जाते. क्वचित हरवलेली वस्तू तिथे सापडतेही!

एकदा मिकीच्या तोंडाशी दुधाचा ग्लास धरून तिची आई उभी होती. 'आई, माझ्या सायकलची चावी पाहिलीस का? सापडतच नाहीय!' दादा म्हणाला. 'ड्रॉवरमध्ये बघ! नाहीतर मिकीच्या बास्केटमध्ये बघ, तिने खेळायला घेतली असेल!' आईचे हे बोल मिकीच्या कानावर पडले मात्र, तिने हाताने ग्लास दूर लोटला. दूध पिणे थांबले. गोबरे, गोबरे, गाल फुगले आणि पटकन मिकी बोलून गेली - 'छो ग्गंऽ मिकी!' तिची ताई थक्कच झाली अन् मग मोठ्याने हसू लागली. एवढुश्या नाकावर आलेल्या रागाचा तो पहिला वहिला अविष्कार ते दोन शब्द सांगून गेला. 'छोऽऽग्गं मिकी' म्हणजे 'सगळं मिकी!' असा अर्थ होता. ते दोन शब्द एकत्र बोलून, मिकीने प्रथमच एक सलग वाक्य उच्चारले होते. पुढच्या बालपणातील बडबडीचा, 'सगळं मिकी' - हा श्रीगणेशाच होता.

त्यावेळी ताईला जो आश्चर्यमिश्रित आनंद झाला

असेल तो टिपण्यास कॅमेरा नव्हता. अनेक वर्षांनी मोठ्या मिकीने ही 'प्रथम' वाक्याची गोष्ट ताईकडून ऐकली. तेव्हाही ताईचा चेहरा खुललेला दिसला व नकळत ती म्हणून गेली 'थँक्यू ताई!'

मिकी तीन वर्षांची झाली तेव्हा तिच्या हाती दगडी पाटी व दगडी पेन्सिल आली. तिला श्रीगणेशा गिरविण्यास बसविणे हे नवीन काम आईच्या मागे लागले होते. गॅलरीच्या कठड्यावर हनुवटी ठेवून, समोरच्या दुकानांच्या पाट्या वाचण्याचा प्रयत्न करण्याइतपत ती उंच झालेली आहे. मात्र जिना उतरून रस्त्यावर जाण्यास तिला बंदीच होती.

पाय उंच करून दरवाजाची कडी काढली की बाहेरचा दगडी जिना तिला खुणावतो. जिन्याला लाकडी कठडा आहे. परंतु भावंडे शाळेतून परतल्याशिवाय तिला कठड्यावरील 'घसरगुंडी'चा खेळ खेळता येणार नसतो. घसरगुंडीचा विचार ठेवून देऊन एका हातात पाटी, पेन्सिल धरून ती एकेक पायरी उतरत, शेवटच्या पायरीवर जाऊन बसते. आता ती 'खोट्या खोट्या' शाळेत असते. बराच वेळ पाटीवर रेघा ओढण्यात जातो. लवकरच तिला या 'शाळा, शाळा' खेळाचा कंटाळा येतो म्हणून ती जिना चढून घरात शिरते.

आईचे हातमशीनवर शिवण चालू असते. 'कात्रीला हात लावायचा नाही हं!' नेहमीप्रमाणे आई दटावते. पुढे झालेला छोटा हात कात्रीपासून मागे होतो. मशीनची खालीवर होणारी सुई बघण्यात मिकी दंग होते. थोड्याच वेळात आईने बाहुलीसाठी छोटासा फ्रॉक शिवून मिकीच्या हाती ठेवलेला असतो. आनंदात दुडक्या चालीने ती (दादाने मुंबईहून आणलेल्या) बाहुलीला आणायला जाते.

बघता बघता संध्याकाळ होते. आईने मशीनला झाकण घालून, स्वयंपाकघराकडे मोर्चा वळविलेला असतो. आई मागोमाग चाललेल्या मिकीला, शाळेतून परतलेली मधली ताई 'आईचं शेपूट' म्हणत उचलून कडेवर घेते. 'मी मोठ्ठी झाले नं' म्हणत, मिकी चुळबुळते. 'हो का? मग मोठी मिकी म्हणायचं का तुला आता?' 'अगं खरंच मोठी झालीय बरं का गं ती आता! आज मुळीच रडारड नाही केली तिने! एकटीच जिन्यावर 'शाळा, शाळा' खेळत होती बराच वेळ!' 'अरे वा! बक्षीस दिलंस नं आई तिला?' 'हो, नवीन फ्रॉक शिवला की तिच्या बाहुलीसाठी!' 'बक्षीस पायजे, बक्षीस पायजे' - गाल फुगवून भोंगा सुरू होण्याआधीच 'हे घे बक्षीस' म्हणत मधली ताई मिकीच्या हाती एक पुस्तक ठेवते.

पुरती अक्षर ओळखही न झालेल्या मिकीला पुस्तक बक्षीस? आईच्या चेहऱ्यावर उमटलेल्या प्रश्नचिन्हाकडे दोघींचेही लक्ष नसते. रंगीबेरंगी चित्रांचे पुस्तक पाहण्यात दोघी दंग होतात. त्यातील गोष्ट रात्री झोपताना मिकीचा मधला भाऊ तिला सांगतो. जॉन गिल्पिन नावाच्या माणसाची गोष्ट चित्रांबरोबर सांगण्यात आलेली असते व तीही कवितेतून ! जॉन गिल्पिन नावाचा एक माणूस, प्रथमच घोड्यावर बसून दुसऱ्या गावास जाणार असतो. तो घोड्यावर बसताच, घोडा जो धावत सुटतो तो न थांबता त्या गावापर्यंत जातो व उलट पावली, संध्याकाळी परत मूळ गावी परत येतो. गोष्टीतली गंमत मिकीला कितपत कळली देव जाणे! पण गोष्ट ऐकता, ऐकता ती झोपूनच गेली.

त्या रात्री झोपताना आई मिकीच्या बाबांना कौतुकाने जे सांगत होती ते इतर भावंडांच्याही कानी पडले. 'अहो, आज न मिकीने कमालच केली. पाय उंच करून दाराची कडी काढली अन् जिना उतरून गेली. शेवटच्या पायरीवर बसून पाटीवर रेघोट्या काढीत बसली होती बराच वेळ! 'कुठे गेली होतीस?' विचारलं तर म्हणे शाळेत!' घराबाहेर एकटीने प्रथमच पाऊल ठेवले होते. 'नशीब, रस्त्यावर नाही गेली!' काळजीयुक्त स्वरात बाबा बोलल्याचे भावंडांच्या कानी पडलेच!

मिकी मोठी झाल्यावर, ताईकडूनच तिला ही गोष्ट कळली होती. नकळतच तिच्या स्मृती कोशातून फुलपाखरू बाहेर पडून भिरभिरू लागले. मोठी मिकी नकळत तालावर गुणगुणू लागली, 'जॉन अ गिल्पिन वॉज अ सिटिझन ऑफ क्रेडिट अँन्ड रिनाऊन....'

ताईच्या चेहऱ्यावर आश्चर्यमिश्रित हर्ष बघून ती खूप, खूप सुखावली. प्रथमच शिकलेली इंग्रजी

कविता, मिकीला आठवत होती.

दगडी जिन्याची खोटी शाळा सोडून मोठ्या मिकीने खऱ्या शाळेत प्रवेश घेतला. वयाची पाच वर्षे पूर्ण झाली होती. पिकल्या फळाचे कवच गळून पडावे, तसेच काहीसे झाले. आता ती मिकी नव्हती. स्वत:चे नाव, वडिलांचे नाव, आडनाव आता ती पाटीवर लिहू शकत होती. या मोठ्या मिकीला, आठवणी सांगायला आता ताईची गरज उरली नव्हती. तिच्या बालपणच्या आठवणी आजही ताज्या आहेत.

फरशी नसलेला, धुळकट जमिनीचा पहिलीचा वर्ग, तेथील सतरंजीच्या पट्ट्या, मारकुट्या कानिटकरबाई आजही तिच्या चांगल्याच लक्षात आहेत. पांढरे नऊवारी नेसणाऱ्या, पांढरे कपाळ असलेल्या, गोऱ्या, सडसडीत बाई हातात फूटपट्टी घेऊन, पट्ट्यांमधून फेऱ्या घालीत. एकावर एक अकरा, एकावर दोन बाराऽऽ' असे म्हणत, म्हणत, सर्व पट्ट्यांवरील बसलेल्या मुलांकडून परवचा पाठ करून घेत. अंकमोजणी चुकल्यास छडीचा मार मिळत असे. तास संपल्याची घंटा होताच 'हुर्योऽऽ' करीत, धूळ उडवीत, सर्वजण वर्गाबाहेर पडण्यास धावत सुटत. 'आज पट्टीचा मार खावा लागला नाही' हा आनंद फार मोठा असे.

शाळेसमोरच मिकीच्या आईची मैत्रीण राहत असे. मधल्या सुट्टीत, पाणी पिण्याचे निमित्त करून मिकी या मावशीकडे जाई. मावशीचे छोटे बाळ, मांडीवर घेऊन खेळवण्यात ती रमत असे. 'दर्शन' असे वेगळेच नाव असलेले हे बाळ, तिला खूप आवडत होते. परंतु लवकरच तिचा हा आनंद संपुष्टात आला. भाड्याचे घर सोडून मावशी दूर, गावाबाहेरील बंगल्यात रहायला गेली. जाण्यापूर्वी ती मिकीच्या आईला भेटायला आली होती. शेंडेफळाला मिळालेले पहिले वहिले जीवंत खेळणे आता दुरावणार होते. मिकी रडकुंडीस आल्याचे पाहून आईने तिच्या हाती तिची आवडती कापडी बाहुली ठेवल्याचे आजही तिला स्मरते.

मारकुट्या पहिलीच्या बाईंच्या वर्गातून मिकीची अचानक सुटका झाली. मधल्या ताईला व भावाला गोरे मास्तरांची शिकवणी लावली होती. पांढरे शुभ्र धोतर, पांढऱ्या शर्टावर काळा कोट, आणि डोक्यावर काळी टोपी असा मास्तरांचा वेष असे. टेबलखुर्चीवर भावंडांची शिकवणी चालू असताना खाली सतरंजीवर बसलेल्या मिकीच्या पाटीकडेही, मास्तर लक्ष देत. आईबरोबर दाणेवाल्याकडे (म्हणजे वाण्याकडे) गेले की हेच मास्तर पुड्यांना दोरा बांधण्याचे काम करताना पाहिले की मिकीला खूप नवल वाटे. 'गरिबीमुळे काही लोकांना असं डबल काम करावं लागतं'' आईने केलेला हा खुलासा तिने ऐकला व घरी येऊन 'डब्बल' या इंग्रजी शब्दाचा पुनरुच्चार करण्यात ती रमली. पुढे

कविता

# 'मार्केटिंग'

-सुजाता तुषार कीर्तिकर

म्हणे हा आताचा जमाना, मार्केटिंगचा जमाना
आहे...
तुमच्या सफल आयुष्यासाठी ,
प्रत्येक श्वासाचे मार्केटिंग जरुरीचे आहे...
जन्म होण्याआधीपासून जन्माचे मार्केटिंग केलंस
का ??
नाही केलंस ते तर वेड्या ,
तुझा जन्म हा तरी, 'खरा जन्म' असेल का ??
'आयुष्याचं मार्केटिंग' हा इथला कळीचा शब्द
आहे...
भावनेपेक्षाही राजा, मार्केटिंग फार जरुरीचे आहे...
जन्माचं मार्केटिंग करताकरता,
यांनी तर मृत्यूलाही सोडलेलं नाही....
ब्रेकिंग न्यूजच्या वेडापोटी दु:ख करण्याला वेळ
नाही...
RIP अन् नमस्कार, किती मिळाले यावर मृत्यूचे
मोल आहे...
खऱ्या दु:खाच्या अश्रूंपेक्षाही या पोस्टस्‌चेच मोल
जास्त आहे..

*

या गोरेमास्तरांच्या तोंडून प्रथमच तिने 'डब्बल प्रमोशन' हा शब्द ऐकला. मास्तरांच्या सूचनेप्रमाणे तिला 'डब्बल प्रमोशन' देऊन दुसरीच्या वर्गात प्रवेश मिळाला.

बडबड्या मिकीला तिथे नवीन मैत्रिणी मिळाल्या. (त्यापैकी सुधा मंडलेकर, प्रभा थत्ते, सुमन भुरे, प्रभा सावंगीकर ही नावे आजही तिला स्मरतात हे विशेष!) दुसरीचे वर्गशिक्षक खुद्द गोरेमास्तरच होते. ते 'भूगोल' हा नवीन विषय शिकवीत. शेंदरी रंगाच्या कव्हरचे, आतमध्ये रंगीबेरंगी नकाशे असणारे भूगोलाचे पुस्तक तिला खूपच आवडले. वर्गाबाहेर एक उंबराचे झाड होते. तिथे फळे खाण्यास अनेक पक्षी येत. खिडकीतून दिसणाऱ्या त्या दृश्याला भाळून, ती मैत्रीणींशी कुजबूज करीत असतांना, मास्तरांनी तिला पाहिले आणि तिला प्रथमच शिक्षा झाली. गोरे मास्तरांनी तिला वर्गाबाहेर जाऊन उभे राहण्याची शिक्षा दिली. मिकीला मास्तरांचा खूप राग आला. थोड्या वेळाने मास्तरांनी तिला वर्गात येण्यास सांगितले. परंतु तिने ते ऐकूनही न ऐकल्यासारखे केले. तास संपल्याची घंटा होईपर्यंत, मास्तर निघून गेल्यावरच ती वर्गात परतली. 'अपमान' या शब्दाचा अर्थही त्या बालजीवास ठाऊक नव्हता, मात्र ती पहिलीवहिली शिक्षा आजही तिच्या लक्षात आहे.

पुढे तिसरीत वर्गशिक्षक म्हणून देशमुखबाई आल्या. त्या उदाहरणे घालून देऊन, डोळे बारीक करून खुर्चीवर बसून असत. या बाईही नऊवारी नेसत. त्यांचे कपाळही कुंकू विरहित होते परंतु त्यांच्या हातात पट्टी कधीच नसे. उलट एका परीक्षेनंतर त्यांनी सर्वांसमोर मिकीला उभे करून तिचे कौतुक केले होते.

बघता, बघता ती चौथीत येऊन पोचली. चौथीचे 'बोडके' मास्तर होते. या नावाची टिंगल तिची भावंडे करीत. परंतु मिकी मात्र या मास्तरांवर खूष होती. शिक्षा न करता ते तिचे क्वचित गालगुच्चे घेऊन कौतुकच करीत. गणितातील ल.सा.वि.चे नियम पाठ करून येण्यास त्यांनी एकदा सांगितले. एकेका विद्यार्थ्याजवळ जाऊन, त्याला उभे करून ते नियम म्हणून घेत होते. नियम बरोबर सांगणाऱ्या विद्यार्थ्याला ते खाली बसवत व न येणाऱ्याला उभे राहण्याची शिक्षा होई. मिकीसमोर येईपर्यंत, तीन नियम सांगणारे विद्यार्थी खाली बसलेले होते व काही उभे होते. एकच चौथा नियम शिल्लक होता तो अंदाजाने मिकीने बरोबर सांगितला व तिला गालगुच्च्यांची शाबासकी मिळून खाली बसण्यास सांगितले गेले. मिकीनंतरच्या मुलामुलींनी सुटकेचा निःश्वास सोडला. नियम संपत होते! मास्तर खुर्चीवर जाऊन बसले व पुढे शिकवू लागले. मात्र ही मिकीची हुशारी, वार्षिक परीक्षेच्या वेळी वायाच गेली. चौथीची बोर्डाची परीक्षा, दुसऱ्या शाळेत जाऊन द्यावी लागे. नेमकी त्या वेळेस मिकी आजारी पडली व तिची परीक्षा हुकली. 'डबल प्रमोशन' घेतल्याने ती वयाने चौथीच्या परीक्षेस लहानच

---

***हास्यचित्र***



होती. त्यामुळे घरी कोणास वाईट वाटले नाही तरी 'वर्ष बुडाल्याचे' ते पहिलेच दु:ख होते. पुढील प्रसांगाने मिकीच्या दु:खात आणखीच भर पडली.

पुढील वर्षी ती परत बोडकेमास्तरांच्या चौथीच्या वर्गात असतानाची गोष्ट! (तेव्हा बहुधा ती नऊ वर्षांची असावी.) विलास मंगरुळकर नावाचा एक मुलगा, चौथी पास झाल्याचे पेढे मास्तरांना देण्यास आला. त्याने तिच्याकडे पाहिले मात्र, मिकीला भयंकर लाज प्रथमच वाटली. 'मी आजारी होते- नापास नाही झालेय' - हे ओरडून ती कसे सांगणार? घरी गेल्यावर ताईला हे सांगताना ती भरपूर रडली मात्र! 'काय झालं हिला?' आईच्या प्रश्नाला ताईने भरपूर हसत उत्तर दिले; 'अगं तिच्या बॉयफ्रेन्डला वाटलं असेल की ती नापास झाली, म्हणून रडतेय ती!' 'बॉय फ्रेन्ड' म्हणजे 'मुलगा मित्र' असा 'समंजस' अर्थ त्या बालजीवाने लावला होता तेव्हा. त्या पहिल्या 'बॉय फ्रेन्डला' मागे टाकून ती इंग्रजी पाचवीत गेली.

चौथीपर्यंत मुलामुलींची असलेली शाळा आता फक्त मुलींची झाली होती. पाचवीला 'पांढरीपांडे' नावाच्या काळ्या बाई क्लासटीचर होत्या. इंग्रजी हा नवीन विषय त्या छान शिकवीत. मैत्रीण सुधाबरोबर इंग्रजी कविता म्हणताना नकळत प्रथमच मिकीने अभिनयाच्या क्षेत्रात पाऊल टाकले. 'पुसी कॅट् पुसी कॅट...' या कवितेत इंग्लंड बघायला गेलेली मांजर राणीकडे न बघता, उंदराच्याच मागे लागते. हा अभिनय ती करीत असताना संपूर्ण वर्गातील मुली खदखदून हसत.

सहावीत गायन, शिवण, ड्रॉईंग या नवीन विषयांशी तिची प्रथमच गाठ पडली. ड्रॉईंगचे जोशी मास्तर, गायनाचे वझेमास्तर, शिवणाच्या मुळेबाई, आजही तिच्या आठवणीत आहेत.

सातवी हा 'मिडल स्कूलचा' अखेरचा टप्पा असे. इथे इंग्रजी शिकविणाऱ्या दुसऱ्या गोऱ्या छान दिसणाऱ्या पांढरीपांडेबाई तिला मिळाल्या. एकदा आठवडी परीक्षेत जास्त मार्क्स मिळविणाऱ्या मुलीस 'बक्षीस देईन' असे बाईंनी जाहीर केले. मिकीला वीसपैकी अठरा गुण मिळाल्याने आनंद झाला. परंतु प्रभा नावाच्या तिच्या मैत्रिणीने, बाईंनी दिलेल्या गुणांची बेरीज चुकीची झाल्याचे दाखवून, एकोणवीस गुण मिळविले व पहिला नंबर पटकाविला. मात्र या 'गुलाबकळी' (त्यांना मिळालेला गॅदरिंगचा फिशर्पाँड) बाईंनी उदार मनाने, दोघींसाठीही बक्षीस आणले. 'प्लास्टिक' हा शब्द मुलींनी प्रथमच ऐकला. तो हा प्रसंग - बाईंनी इंग्रजीत विचारले, 'विच् कलर डु यू लाइक मोस्ट' ग्रीन ऑर व्हाईट?' मिकीचे उत्तर 'ग्रीन' व प्रभाचे उत्तर 'व्हाईट' असे आले. बाईंनी प्रथमच त्यांना पूर्ण इंग्रजी वाक्यात उत्तर कसे द्यायचे ते शिकविले. 'आय् लाइक ग्रीन कलर' असे उत्तर येताच, पिशवीतून त्यांनी प्लास्टिकची ग्रीन रंगाची फूटपट्टी काढून मिकीच्या हाती ठेवली. प्रभाची पांढरी फूटपट्टीही पिशवीतून बाहेर आली. संपूर्ण वर्गातून सामुहिक 'स् स् ऽ हा! हा!' - असा आश्चर्यमिश्रित सूर उमटला. त्या पहिल्या बक्षिसांबरोबरचा तो सगळ्यांचा आनंदी सूर आजही मिकी आठवणीतून परत, परत अनुभवते.

सातवीनंतर हायस्कूलसाठी मिकीला शहरातून गावी पाठविण्यात आले. किशोरीअवस्था, यौवनात पदार्पण, पुढे कॉलेजचा पहिला दिवस, अनेक 'प्रथम' अनुभवांना मिकीला सामोरे जावे लागले. पण आपण तिचे 'चरित्र' नक्कीच वाचणार नाही कारण संपादकबाईंनी दिवाळी अंकासाठी फक्त 'लघुकथा'च मागितलीय, तेव्हा हे 'प्रथमपुराण' इथेच थांबवते. आवडले तर कळवा मात्र!

संपर्क - ९८६७०४३६५०

✱

## (वात्रटिका)

### घर भयचकित

रोज उठून तिचे खाडे,हिने हातात घेतली झाडू,<br>
वाट पाहत राहाण्यापेक्षा,उठून सरळ कामाला भिडू.<br>
भांडी चकचकीत आता, जमीन लखलखीत,<br>
भूकंप की सुनामी ही , घर भयचकित!

-डॉ. सुमन नवलकर

कथा

# पटऱ्या

## ∗ नंदकुमार विजयकर ∗

काही लोकांशी आपली मैत्री का व कशी जुळते ही मोठी न कळणारी गोष्ट आहे. आता हा 'पटऱ्या'. बन्सी पटेल, मला पार्ल्याला भेटला. ह्याची आणि माझी एवढी जवळची मैत्री का व्हावी? बरं हे संबंध जुळण्यामागे माझा फारसा सहभाग नव्हता. माझी नव्यानेच विलेपार्ले शाखेमध्ये बदली झाली होती. मी जेव्हा शाखेत प्रवेश केला त्यावेळी पायरीवर एकजण सिगरेटचे फवारे फुंकताना नजरेस पडला. खरं सांगू का, सिगरेट फुंकणाऱ्या लोकांबद्दल मनात थोडी अढीच निर्माण होते. आत गेलो, सर्वांची ओळख झाली. कोणीतरी म्हणालं आणि हा पटऱ्या. मी पाहिलं तर हे सिगरेट फुंकणारे महाशय माझ्यासमोर उभे होते. त्याने हात पुढे केला पण सिगारेटने धुरकटल्या हातात हात मिळवणे जरा जडच गेलं. बन्सी पटेलची ही पहिली भेट.

पार्ल्याला येऊन एक दोन आठवडे झाले असतील. एक दिवस शंकर शिपाई कोणालातरी सांगत होता. 'पटेल खूप खोकतोय, बाहेर बसलाय.' 'अरे खोकणारच, सारखं सिगारेटी फुंकून आणखी काय होणार?' नेहमीचीच ही गोष्ट आहे म्हणून कोणी फारसं लक्ष दिलं नाही. मला मात्र राहवेना. मी शंकरला घेऊन बाहेर आलो. पटऱ्या पायरीवर बसून भयानकपणे खोकत होता. मी त्याच्या पाठीवरून हात फिरवला. त्याचा चेहरा काळानिळा पडला होता. शेजारीच आमच्या बँकेचे डॉक्टर होते. शंकरच्या मदतीने त्याला डॉक्टरकडे घेऊन गेलो. डॉक्टरांनी इलाज सुरू केले. आठवडाभर विश्रांती घ्यायला सांगितली.

महिनाभराने पटऱ्या उगवला. लंच टाईमला तो माझ्यामागे येऊन उभा राहिला. ''काय रे, बरा आहेस ना आता?'' माझ्या प्रश्नावर तो काहीच बोलला नाही. अचानक ''विजय तू उठ, मला माहीत आहे, लंचला तू घरी जातोस'' ''अरे पण काम संपवू दे'' ''ते मी बघतो.'' असं म्हणून त्याने जबरदस्तीने उठवलं. एक लक्षात आलं, पटऱ्याचं स्मोकिंग बरंच कमी झालं होतं. पण सारखा माझ्या अवतीभोवती असायचा. वेळ मिळेल तेव्हा मला मदत करायचा. मी त्याला म्हणत असे, 'अरे करीन मी. तू कशाला त्रास घेतोस?' तो उसळून म्हणायचा 'नाही रे, हे लोक चोर आहेत. तू नवीन आहेस. तुझ्यावर सगळे भार टाकतायत.'' पटऱ्या नेहमीच माझ्या बाजूने भांडायचा. युनियनच्या लोकांना बोलवायचा. मोठी बोंबाबोंब करायचा.

वर्षभरात माझी तिकडून बदली झाली. म्हणजे प्रमोशन होऊन मुंबई बाहेर माझं पोस्टिंग होणार होतं. माझ्यापेक्षा पटऱ्यालाच जास्त आनंद झाला. माझ्या निरोपसमारंभासाठी पटऱ्याने जंगी पार्टी आयोजित केली. माझी नाशिक विभागात बदली झाली होती पण पुण्याला राहण्याची सोय होणार होती. मी तसं पटऱ्याजवळ बोललो. तर म्हणाला, ''विजय काळजी करू नकोस मी सगळी व्यवस्था करतो.'' पटऱ्या मला हेडऑफिसला घेऊन गेला. त्याचा चुलत भाऊ तिकडे होता. युनियनची माणसं होती. सगळ्यांना भेटून दिवसाअखेरी माझा पुणे विभागाचा मेमो निघाला. पण तेवढ्याने भागणार नव्हते. खुद्द पुणे शहरात एखादी ब्रँच मिळाली तर शनिवार रविवार मुंबईला येता आलं असतं. ह्याचीही गुरुकिल्ली पटऱ्याकडे होती. म्हणाला, ''पुण्याला प्रभातरोडला रिजनल मॅनेजर

राहतात त्यांना जाऊन भेट. बाकीचं मी बघतो.'' मी तिकडे गेलो, त्यांना भेटलो आणि त्याचवेळी त्यांना कोणाचातरी फोन आला. माझ्याकडे बघून हसले. 'विजयकर ना तुम्ही? या तुम्ही. ऑफिसला भेटा. मी बघतो.'' आणि काम झालं. पुण्यातली ब्रँच मिळाली.

पुण्यातलं वास्तव्य संपलं आणि मी परत मुंबईला आलो. वडाळा शाखेत माझी नियुक्ती झाली. मी शाखेत शिरत होतो तर बाहेरच पट्याला पाहिलं. सिगारेट पीत होता. पार्ल्याचीच आठवण झाली. मला पाहाताच ''अरे वा: विजयसाहेब'' ''अरे साहेब काय?'' ''नाही नाही आता तू माझ्यासाठी साहेबच'' पट्या तेव्हापासून मला विजयसाहेब म्हणू लागला. ''काय रे, सिगारेट परत सुरू?'' ''अरे विजय साहेब आता ड्रिंक्स्पण वाढले आहे'' आणि याचा प्रत्यय मला लवकरच आला. क्लोजिंगच्या पार्टीत पट्याने खूपच धुमाकूळ घातला. वडाळ्यानंतर मुंबईत माझ्या चार पाच शाखा झाल्या. कसं काय कोण जाणे; पण दोन ठिकाणी पट्यानेदेखील आपली बदली करून घेतली होती. मला निवृत्त होण्यास दोन तीन वर्षे राहिली होती. पट्या मात्र स्वेच्छानिवृत्ती घेऊन अमेरिकेला जाण्याच्या बेतात होता. त्याचा मुलगा आणि इतर घरचे सर्वजण केव्हाच तिकडे स्थाईक झाले होते. जाण्यापूर्वी पट्या तिकडचा फोन नंबर देऊन गेला. कालांतराने मी निवृत्त झालो. माझी मुलगी अमेरिकेत कॅनसासला होती. आम्ही तिकडे जाण्याचा बेत केला. जाण्यापूर्वी मी पट्याला फोन केला. त्याला एवढा आनंद झाला. म्हणाला, ''अरे कमाल आहे. माझा मुलगा कॅनसास सिटीला आहे. तुम्ही जरूर तिकडे या.'' तिकडे एक दिवस जयेशचा, पट्याच्या मुलाचा फोन आला. ''अंकल संडेला तुम्ही सर्वजण आमच्याकडे लंचला येणार आहात.'' त्याने पत्ता दिला. आम्ही सर्वजण त्याच्याकडे गेलो. जयेश आणि त्याच्या पत्नीने आमचं स्वागत केलं. पट्या कोठे दिसला नाही. ''काय रे आमचा मित्र कुठे आहे?'' ''पपा काही दिवस शिकागोला आहेत. मोटेलच्या अकाऊंटस्चं काही काम होतं. पण तुम्ही काळजी करु नका. पपांनी तुमचा फेवरीट ब्रँड आणायला सांगितला होता. मनात

**(वात्रटिका)**

**सेवानिवृत्त**

सेवानिवृत्तीचा सुखाचा काळ,  
खा-प्या-झोपा तिन्ही त्रिकाळ.  
बायको म्हणते,'थोडी तरी मदत कर,  
काज-बटणांमधलं वाढतंय बघ अंतर.'

**-डॉ. सुमन नवलकर**

म्हटलं, 'माझा ब्रँड?' खरं म्हणजे तो पट्याचाच ब्रँड असणार. जयेशने माझा पेग भरला. मी म्हणालो 'मी एकटाच?'' ''हो, मी काय घेत नाही. पण काळजी करु नका'' असं म्हणून त्याने पट्याला फोन लावला. ''घ्या पपांशी गप्पा मारा. सावकाश चालू दे.'' पट्याने फोनवरून 'चिअर्स' केलं. ती एक अविस्मरणीय आठवण होती. बराच वेळ आम्ही बोलत होतो, हसत होतो. उत्साहीत होऊन ओरडत होतो. एकूण आम्ही दोघे 'हाय स्पिरीट' मध्ये होतो.

मी अमेरिकेहून परतून दोन दिवस झाले होते. आमचा राणे भेटला. म्हणाला, ''अरे पट्या गेला. अचानक. शिकागोला होता. काय झालं नीट कळलं नाही.'' बापरे! कमाल आहे. परवा परवा आम्ही बोलत होतो. हसत होतो. अजूनही त्याचा आवाज कानात घुमतोय. आता हा गेला? काही कळेनासं झालं. पट्याने मला एवढा जीव का लावावा? प्रत्येकवेळी माझ्या मदतीला का धावावं? माझ्याकडून त्याला काय मिळणार होतं? माझ्यावर भरभरून मैत्रीचा वर्षाव करणारा हा एक पट्या होता. माझ्या मैत्रीचं व्यसनच होतं म्हणा ना. त्याच्या एकूण व्यसनाधीनतेमुळे शारीरिक आरोग्य बिघडवून बसला होता. सर्व बाबतीत अतिरेक. व्यसनात असो का मैत्रीत असो. अशी माणसं पराकोटीचं प्रेम करतात. का? कशासाठी हे त्यांचं त्यांनाच ठाऊक.

मो..९८१९९६२८७६५

*

लेख

# Introspection

⁎ Dr. Ambuja Pradeep Navalkar ⁎

**Books**

People are books...long ones... short ones...hard cover...soft copies... The prologues... The simplest books possible are children... As simple and universal as an A for Apple... they are epitome of curiosity... desperate to learn...fearless... Colourful... Swinging on rainbows and hoops...endlessly pure energy.

As we grow, we evolve the bookshelf of our life...sometimes diversely... sometimes with monotony... Bookshelves change and adapt to fit ...We grow fond of some books and we want them for life...Some do stay... some are just read casually...some just discarded based on their covers...

Some grow systematically. Carved perfectness... glorious... a steady flow of words... consistent...but usual...maybe boring...

Some are worshipped...every word considered with faith... cruelly used as needed by the religion and society ...as per convenience... worshipped or maybe molested?

Some are thrilling... capture the interest. May or may not hold it... escalating... each minute... crests and troughs...

Some melancholy...pensive...not everyone's favourite...but they do thrive...like the moss under a huge tree...tenacious... lugubrious to many...

Some are enigmatic...mysterious... difficult to understand yet impossible to put down... addictive... they make you keep coming back for more...

Some are full of songs ...rain drops of bliss... washing away the lethargy... full of art ...incentivizing...they talk to you...

Some are dark... depressing... real... untouchable... you cannot save them...they are twisted beyond belief... you need them for maintaining the balance of life...

Some are deceptive... seem to be simple lines... but need reading between the lines...to reach them...unpeel them...grasp them...understand them...

Some are blank... fill them as you want... they become a part of you ... full of you...they are yours forever...

Some change you...affect you like never before... some are lost... some you treasure... You learn from all... you need them all...to make your epilogue...

Sometimes you recommend a book...Sometimes you are recommended by a book you have chosen...You are defined by the people around you...

People are books...long ones... short ones...hard cover... soft bound...some are made with a coalescence of each of these shades...

Which ones are you? Do you know yet?

From the heart

# माझे मधूभाऊजी आणि शीलामावशी

* सौ. अनारकली वेलकर *

मधुकर व शीला कोठारे, हे एक आगळं वेगळं जोडपं आणि असं म्हणू शकतो "Made For Each Other". १९६७ ला लंडनला स्थायिक झाले; पण भारताला कधीच विसरले नाहीत. त्यांनी भारतीय मूल्ये आणि परंपरा जपल्या व जोपासल्या आणि तेच संस्कार त्यांनी आपल्या मुलांवरही केले आहेत. दोघांचा स्वभाव अगदी प्रेमळ, लोकांना मदत करण्याची आवड आणि नाती जोडण्याची एक कला. ह्या स्वभावामुळे त्यांनी अनेक लोकांना आपलंसं केलं. लंडनला आलेल्या अनेक नवीन भारतीय कलाकारांना प्रोत्साहित केले, खूप मित्र मंडळी कमावली. कोठाऱ्यांच्या घराला "Mini India" म्हणता आलं असतं. त्या घरात तुम्हाला स्पष्ट मराठीच ऐकू यायचं, भारतातले सगळे सणवार साजरे होत. अगदी झब्बा कुर्ता, नऊवारी साडीत व सगळे पाठारे प्रभू दागिने घालून. आमचे मधूभाऊजी अगदी साधेसुधे शेवटपर्यंत झब्बा कुरत्यात फिरायचे, कधीही मांसाहार नाही केला. कुठचेही व्यसन नव्हते त्यांना आणि शीलामावशीने त्यांना खूप सुंदर साथ दिली. तरतऱ्हेच्या साड्या नेसण्याची, मॅचिंग कानातली व बांगड्या घालायची तिला खूप हौस होती आणि ते तिला खूप शोभूनही दिसायचे.

तबला हा मधुभाऊजींचा ध्यास होता आणि तो त्यांना एका वेगळ्या पातळीवर घेऊन गेला. खूप प्रसिद्धी दिली, मोठ्या कलाकारांबरोबर तबला वाजवण्याची संधी दिली, अनेक कलाकारांना घडवण्याचीदेखील संधी दिली. आपल्याकडे येणारा पाहुणा हा देवासमान मानला जातो. अतिथी देवो भव, हे त्यांनी प्रत्यक्षात साकारले. माझी शीलामावशी पाककलेमध्ये अतिशय सुगरण, घरी आलेल्या प्रत्येक अतिथीचं मन:पूर्व स्वागत करायची, रूचकर जेवणाने त्यांना तृप्त करायची आणि स्वत:च गाडीने लंडन व जवळपासच्या शहरात फिरवायची. तो अतिथी मग कोणी असो. भारतातून आलेला कलाकार असो, नातेवाईक असो, मित्र मैत्रीण असो; कोठारेंच्या घरानी त्याचे प्रेमाने व अगत्याने स्वागत केले. २०१३ जून महिन्यांत मधुभाऊजींना देवाज्ञा झाली आणि त्यानंतर शीलामावशी आपल्या मुलांबरोबर राहते लंडनमध्ये. तर चला आता वाचूया काही सुप्रसिद्ध कलाकार काय म्हणतात ह्या आगळ्यावेगळ्या कोठारे जोडप्याबद्दल. त्यांचा धाकटा मुलगा शशांक ह्याने अगदी मनाला स्पर्श होईल असा लेख लिहिला आहे.

लेख लिहिल्याबद्दल सौ. आशा खाडिलकर, डॉ. विद्याधर ओक, श्री शांती व श्री. टिळकराम जागासिया, सौ. वृंदा वासुदेव जोशी, श्री. निषाद चंद्रचूड वासुदेव आणि शशांकचे मन:पूर्वक आभार. ह्या सगळ्या मंडळींना मी फक्त एक फोन केला आणि लिहिण्याची विनंती केली. त्याचक्षणी त्यांनी लिहायला होकार दिला आणि त्यामुळे त्यांच्या अविस्मरणीय आठवणी आणि अनुभवांचा आपल्यालाा आनंद घ्यायला मिळतोय.

## Flying the cultural flag for over half a century

***- Shashank Madhukar Kothare, London***

Like the iconic Air India 'Maharaja' mascot, Madhukar and Sheela Kothare – my parents – were renowned for preserving and promoting our culture in the UK for over 50 years. Regardless of whether you know them, I hope this article gives

some inspiration to others to do the same.

### A culture preserved

It didn't matter which decade you entered our house, you were instantly shrouded in a culture preserved from the 1960s: 'spashta' Marathi dialogue, traditional Indian music dancing on the airways and two kids that would 'paya pad' anyone that was older than them.

Despite the early racism they encountered (I still remember the bottles through the windows), they were proud of their heritage and went out of their way to preserve it. Aai always wore a sari. Baba's standard response to me was "Parat Marathitune boli. Mala ek shabda samazhlya nahi". When teachers told Aai not to speak Marathi at home in case she confused us, she retorted, "Where I come from, all kids his age speak five languages. Now who's confused?"

### For the love of music

Growing up in Mumbai, Baba was the school, and subsequently college, 'tabalji' – taking him India-wide in his formative years. In his 30s he moved to the UK, and his passion led him across Europe, Africa and the US, where he appeared on TV, radio, stage and in countless concerts. He had the privilege to accompany some amazing artists – such as C Ramchandra, Asha Khadilkar, Upendra Bhat and Yashwant Dev – and a few good bathroom singers too!

An opportunity to showcase his passion followed him everywhere. On a family trip to Pune, the 'tabalji from London' was invited to play at the Geet Ramayan. During a locum job in Riyadh, his colleague asked what he did in the evenings. After replying, "Just cooking and practising the tabla" he appeared on Riyadh TV. When he went 'walkabout' when visiting my wife and I in Australia, we were not surprised to hear his tabla on a Melbourne radio station.

One fact that surprises many people is that he was self-taught up to the age of 22. His first tabla lesson was paid using money from his first job – over a decade after he had first picked up the tabla and started to mimic the sounds made by others.

However, Baba's true passion was encouraging others to share this love of music and, importantly, continue it forward. This was sparked by one of his English work colleagues in 1970, "How do you know you cannot teach? Have you tried? I am taking your tabla and you can buy another".

Since then, he would teach the tabla every weekday evening until 10 pm. Often, the students would be waiting for him before he got home from work, and dinner for him would always be a quick 'ghas' between lessons or late when the last student had departed. But his objective was never to get rich–only to spread the passion. He charged 1960s' prices in the 2020s, he taught one-to-one as he wanted to give each student his undivided attention and no unemployed adult student ever paid a penny.

Even after he suffered a stroke at the age of 79, Baba continued to teach. He could not see, talk clearly or remember everything. Yet, he still gave tabla lessons as if nothing was wrong with him.


### For the love of traditional food, dress and festivals

Every day was a culinary feast at home, with recipes such as bhoojna, khizdi, paplet, pitlha bhat, khiz, masala bhath, to name a few. Aai's reputation for food followed her everywhere. At Baba's office Christmas parties, she would be mobbed as she entered the room so that staff could take "an extra samosa or two for my friends", leaving only crumbs as she placed the dish on the food table.

Surprisingly, Aai only learned to cook a few weeks before she moved to the UK. Without the help of the internet and cookery books, she became a Masterchef of Marathi food through her memories, experimentation and passion.

Maybe fuelled by her MA in Sanskrit, Aai also had a passion for literature and the Arts. She would make us learn Sanskrit 'shloke' on the way to school and I still remember the countless Mahashtra Mandal childrens' dances she choreographed.

Aai was the focal point for religious festivals and traditional dress. When was 'Gudi Padwa'? Call Sheela. Who can help me put on a 'nawari' sari? Call Sheela. When are we coming for "me, me, me" (Pithori) pooja? Call Sheela. During Dasssera, over 150 people usually crammed into 118, Watling Avenue for 'popcorn pooja'– kids upstairs, adults downstairs and a pile of chapal in the driveway. Aai was also the permanent feature




next to the Ganapati Murti at the Maharashtra Mandal hall, tending to everything.

**Continuing the traditions**

I am grateful to Aai and Baba for preserving and encouraging our rich culture and heritage. Whilst I can't emulate Aai's culinary delights (I think I'm missing Aai's 'bot' from my masala dabba) at least Baba's passion for sharing music continues today. Since passing away eight years ago, under his name, we have been providing music scholarships via the Utung Sanskrutik Pariwar Trust for others to continue to preserve our culture.

*

## 'देवमाणसं'

-सौ. आशा खाडिलकर

१९८५ साली मला कै. रामदास गोटीवरेकर ह्यांनी इंग्लंडला माझ्या गाण्याच्या कार्यक्रमासाठी आमंत्रित केले. अर्थात आम्ही प्रथम लंडनला हीथ्रो विमानतळावर उतरलो. आम्हाला उतरवून घेण्यासाठी व आमचे स्वागत करण्यासाठी श्री. मधुभाऊ कोठारे आले होते. प्रथम दर्शनीच शांत, प्रेमळ, आतिथ्यशील अशा मधुभाऊंनी आम्हाला आपलेसे केले. त्याच गाडीतून त्यांच्या राहत्या घरी आम्हाला ते घेऊन गेले. अनेक गोष्टींचा परिचय ते आम्हाला देत होते. घरी पोहचल्यावर शीलाताईंनी घरातच आमची दृष्ट काढून सुहास्यवदनाने आम्हाला घरात घेतले. पाऊल टाकताच आम्हाला त्या आतिथ्यशील व उदार घराने आपलेसे केले.

मधुभाऊंच्या प्रेमळ स्वभावाने व शीलाताईंच्या स्वादिष्ट भोजनाने आमच्या सर्व इंद्रियांना तृप्ती दिली. ते माझे माहेर झाले. मधुभाऊंची साधी राहणी, कष्टाळू स्वभाव, दुसऱ्याला मदत करण्याची वृत्ती, सगळ्यांशी सौहार्दाने वागणे, काम करण्यातली शिस्त, त्यांच्या विद्यार्थीवर्गाला तबला शिकवताना त्यांच्यातला सहज व प्रेमळ गुरू हे सर्व पाहून मी भारावून गेले. दुसऱ्या दिवशीपासूनच आमचे कार्यक्रम सुरू होते. कार्यक्रमाला जातांना माईकसिस्टीम, रेकॉर्डिंग मशीन, कॅसेट्स, तबले डग्गे, माइक लावायचे स्टँड, प्रवासात लागणाऱ्या पाण्याच्या बाटल्या, गाडीत पेट्रोल, हवा चेक करणे हे सर्व मधुभाऊ इतक्या तत्परतेने शिस्तबद्ध करायचे की त्यांच्या आयोजनाचे काम करण्यातला चपळतेच आम्हाला दोघांना फार कौतुक वाटायचे. शिवाय माझ्याबरोबर सुंदर तबल्याची साथ करून ते मैफलीत रंग भरायचे. कार्यक्रम संपवून पहाटे आम्ही घरी यायचो. चक्रधारी असायच्या शीलाताई. त्या म्हणजे झांसीची राणीच

होत्या. आमच्यासाठी त्यांनी शेकडो मैल ड्राइव्हिंग केले. सकाळी मी उठले की मधुभाऊ रात्री झालेल्या कार्यक्रमाच्या रेकॉर्डिंगच्या कॅसेट माझ्या हातात ठेवायचे. मला लाजल्यासारखे व्हायचे व त्यांची तत्परता पाहून मन भरून यायचे.

मला व माझे पती माधव खाडिलकर यांना ते दोघेही मुलगी व जावयाप्रमाणे प्रेम व आदर द्यायचे. १९८५ साली आमचे जुळलेले नाते मधुभाऊंच्या निधनापर्यंत तसेच घट्ट होते व आजही आहे. मधुभाऊंच्यानंतर शीलाताई, अमित, शशांक, त्या दोघांच्या पत्नी व मुले या साऱ्यांशी आमचे आजही जिव्हाळ्याचे संबंध आहेत. मधुभाऊंच्यानंतर आमच्यावर विश्वास ठेऊन शशांकने मधुभाऊंच्या नावाने शिष्यवृत्ती द्यावी व ती आमच्या उत्तुंग ट्रस्टतर्फे द्यावी असे सुचवले. आम्हीही ते आनंदाने मान्य केले. मधुभाऊंनी व शीलाताईंनी किती उत्तम संस्कार मुलांवर घडवले याचेच हे द्योतक आहे. ह्या वर्षी हा शिष्यवृत्ती देण्याचा कार्यक्रम ११ एप्रिलला पुण्याच्या MES कॉलेजच्या सभागृहात सायंकाळी ५ वाजता होणार होता परंतु लॉकडाऊनमुळे झाला नाही. आम्ही शिष्यवृत्तीचे चेक्स विद्यार्थ्यांच्या घरी पाठवले.

कोठारेंच्या घरी शीलाताई म्हणजे चालतं बोलतं चैतन्यच! स्वयंपाक, ड्रायव्हिंग, कपडेलत्ते दागिन्यांची प्रचंड आवड. साधी भाजी आणायलाही मॅचिंग कानातली, बांगड्या, पर्स, स्वेटर अशा नीटनेटकेपणाने रहायला त्यांना आवडायचे. बाहेर जाताना शीलाताई तयार होऊन आल्या की सगळे बघत बसत. मधुभाऊही मिशीतल्या मिशीत हसून शीलाताईला दाद द्यायचे. कै. पं. यशवंत देव तर शीलाताईला गौराबाई म्हणायचे. वर्षानुवर्ष आपल्या घरी शीलाताई साग्रसंगीत नवरात्र साजरा करायच्या. नवरात्रीची आरास, पूजाअर्चा, येणाऱ्या मंडळींची ऊठबस, प्रत्येकाला मिष्टान्न भोजन त्या खाऊ घालायच्या, दिवाळीसारखा थाटमाट! आता शीलाताई थकल्या आहेत पण त्यांच्यातील सकारात्मकता तशीच आहे.

मधुभाऊ व शीलाताईंनी महाराष्ट्रातल्या अनेक गायक वादक कलावंताना त्यांच्या घरी ठेवून घेऊन त्यांना खाऊपिऊ घालून त्यांच्यातल्या कलेला जपण्यासाठी अपार कष्ट घेतले. हे मी तरी विसरू शकणार नाही. मी त्यांची जन्मोजन्मी ऋणी राहीन. शीलाताईंच्या हातचे जेवणे म्हणजे परमसुखाचा आनंदच. या माझ्या मायबापाना माझे त्रिवार वंदन.

*

**श्री. निषाद चंद्रचूड वासुदेव**

'मधू कोठारे' हे शब्द कानावर पडताच, डोळ्यासमोर उभे राहते - रुबाबदार मिशी, काळे कुट्ट केस, चष्मा व स्मित हास्य असलेले एक व्यक्तिमत्त्व.

मधुकाका व माझे बाबा, म्हणजे चंद्रचूड वासुदेव, हे सेंट झेविअर कॉलेजमधे एकत्र शिकत होते व तिथेच त्यांची भेट घडून आली. साधारण १९५०- १९५२ चा हा काळ असावा. मधुकाका तबल्यात पारंगत, तर बाबा संवादिनीत. अशा नैसर्गिक कलागुणांमुळे ते एकमेकांकडे जणू काही आपोआपच आकर्षित झाले. मैत्री एवढी घट्ट होत गेली, की जणू काही दोघे एकमेकांचे डावे व उजवे भागच. दोघेही गिरगावात रहात असल्याने, एकमेकाच्या घरी अगदी हक्कानेच येणे जाणे होते.

आमच्या घरी, कृष्णजन्माचा उत्सव गाण्यांच्या मैफिलीने साजरा होई. मधुकाकांचा त्यात अगदी मनापासून सहभागच नव्हता, तर ते सर्वांचे आदरातिथ्य उत्कृष्टरित्या सांभाळायचे.

मैत्री अशीच वाढत गेली. या जोडीने मिळून अनेक प्रोग्राम्सदेखील केले. परंतु १९६७-६८ च्या दरम्यान मधुकाका लंडनला गेले व - 'मधू इथे अन् चंद्र तिथे' अशी गत झाली. London's gain was in reality Mumbai's loss. परंतु मनाचे नाते एवढे दृढ होते, की सात हजार किलोमीटरच्या अंतरावरही त्यांची मैत्री कायमच टिकून राहिली.

मधुकाका लंडनमध्ये आपले काम संभाळून, तबल्याचे प्रोग्राम करत. लंडनला जणू एक वरदानच लाभले. मुंबईवरून लंडनला जाणाऱ्या संगीत मंडळींसाठी मधुकाका एक आधार स्तंभच होते. आशा खाडिलकर व इतर अनेक गायक त्यांच्याकडे अगदी हक्काने जात व मधुकाका व शीलाकाकी तेवढ्याच प्रेमाने त्यांचे आदरातिथ्य करीत.

वर्षा दोनवर्षांनी मधुकाका मुंबईला सपरिवार भेट



















द्यायचे व आमच्या घरीदेखील यायचेच. अमिताभ, शशांक लहानपणापासूनच अगदी मनमिळाऊ. आल्यावर किचनमध्ये जाणार व आईला मदत करण्याचा खटाटोप करणार. शीलाकाकींनी त्यांना छान शिस्त लावलेली पदोपदी जाणवे.

मधुकाका व बाबांच्या संगीत गोष्टी अतिशय रंगत. आठवणींची जणु मैफिलच.

मधुकाका लहान मुलांशी लहान होऊनच संवाद साधायचे आणि त्यामुळे मलादेखील अगदी जवळचे वाटायचे. त्यांच्या मिश्कील व आनंदी स्वभावामुळे एक नातं लगेचच निर्माण व्हायचे.

बाबा १९८३ ला एका नाटकाच्या ग्रुपबरोबर लंडनला गेले असतांना मधुकाकांची तब्येत थोडी बरी नव्हती. तरीदेखील त्यांनी आपले दुःख विसरून, सर्वांची, आस्थेवाईक सोय करून दिली. मधुकाका अगदी शिस्तप्रिय. लंडनला राहूनदेखील नियमितपणे तबला वाजवणे वा तो इतर विद्यार्थ्यांना शिकवणे त्यांचा छंदच जणू.

वर्षांवर वर्षे अशीच आनंदात उलटली. सन २००० मध्ये बाबा आम्हा सगळ्यांना सोडून दूर गेले. पण

मधुकाका व शीलाकाकींनि आमच्यातले संबंध पूर्वीसारखेच कायम ठेवले. सण २०१४ मध्ये मधुकाकांना देवाज्ञा झाली. एक पर्वच जणू संपले. पण मधुकाकांसारखी माणसं, नसतानादेखील आपल्या बरोबर एक सुखद आठवण म्हणून सदैव रहातात.

नाती तशीच कायम राहिली. शीलाकाकी मुंबईला आल्या व तसेच शशांक देखील आला, की घरी येणारच.

असे हे कोठारे कुटुंब. फारच दुर्मीळ आणि त्यांच्याशी संबंध म्हणजे आमचेच भाग्य.

*

## डॉ. विद्याधर ओक
## (सुप्रसिद्ध हार्मोनियम वादक)

श्री. मधुभाऊ कोठारे आणि शीलाताई कोठारे या इंग्लंडस्थित कलाप्रेमी दाम्पत्याशी माझा संबंध अनेक वर्षांपूर्वी मी इंग्लंडमध्ये माझ्या वैद्यकीय कामासाठी गेलेलो असताना आला. मधुभाऊ अतिशय हुशार आणि तयार तबलावादक होते. मग पेटी व तबलावादक यांची मैत्री होण्यासाठी किती वेळ लागणार? पहिल्या भेटीतच अतिशय जवळचे आहोत अशी भावना निर्माण झाली. त्यातच माझे गुरुजी गोविंदराव पटवर्धन आणि मधुभाऊ यांची मुंबईतील गिरगाव येथील जुनी ओळख निघाली. मग काय? गप्पा संपेनात. अजूनही संपल्या नसत्या. लंडनमध्ये त्यांनी माझ्या हार्मोनियम वादनाचे कार्यक्रम आयोजित केले आणि त्याला चक्क शीलाताईंनी निवेदनाची उत्कृष्ट साथ केली. लंडनच्या महाराष्ट्र मंडळामध्ये लातूर भूकंप-निधीसाठी म्हणून आम्ही 'हार्मोनियम-एक रसास्वाद' या नावाचा विशेष कार्यक्रम दिला. साडेतीन ते चार तास कार्यक्रम चालला. रसिकांनी भरभरून दाद दिली. भूकंपग्रस्तांना थोडीफार मदतही झाली. हे सर्व, कोठारे दांपत्यामुळे शक्य झाले. भारतातून इंग्लंडला जाणारे सर्वच कलाकार त्यांच्या घरी जणू आपलेच घर असल्यासारखे राहत असत. मधुभाऊंची तबल्याची साथ आणि शीलाताईंचे अत्यंत अगत्याचे पाहुणचार व अघळपघळ गप्पा यात वेळ कधीच निघून जात असे. कार्यक्रमाची सर्व रेकॉर्डिंग अत्यंत व्यवस्थितपणे करून नंतर ती सर्व कलाकारांकडे पाठवण्याचा मधुभाऊंचा कटाक्ष होता. त्यांच्याकडे अशा तऱ्हेने जमलेला त्यांचा अत्यंत मौलिक असा सांगीतिक खजिना तयार झाला होता. या दोघांनी अशा विलक्षण रीतीने नुसती कलाकारांची नव्हे तर; भारतीय संगीताची सेवा केली. त्यांच्या घरी रजनीताई जोशी यांचे गाणे आणि माझी हार्मोनियम असा संयुक्तिक कार्यक्रम झाला होता, तो मी कधीही विसरणे शक्य नाही. त्यानंतर बर्मिंगहॅमला डॉक्टर आपटे यांच्याकडे माझे हार्मोनियम वादन झाले, त्याच्या व्हिडीओ क्लिप मी युट्यूबवर टाकल्या आहेत....

....त्यामध्ये मधुभाऊंचे शास्त्रीय व उपशास्त्रीय असे सर्वांगीण वादन आपल्याला ऐकता येईल. मधु भाऊ गेल्यानंतर शीलाताईंचे एकटेपण म्हणजे आयुष्याच्या मैफिलीतून साथीदार निघून गेल्याप्रमाणे त्यांना न सोसणारे होते. त्यांच्या भरभक्कम आध्यात्मिक बैठकीमुळेच अशा काहीशा एकाकी आयुष्याला त्या सामोरे जाऊ शकल्या. असे कलासंपन्न आणि संस्कारक्षम दाम्पत्य अत्यंत विरळा. मी त्या दोघांसाठी अनेक जन्मासाठी शुभेच्छा व्यक्त करतो आणि त्यांचा मैत्रीपूर्ण आणि कलासक्त सहवास मला त्या त्या जन्मात लाभावा, अशी परमेश्वरचरणी प्रार्थना करतो.

*

## Shri Shanti Jagatiya and Shri Tilakram Jagatiya, Students of Madhukar Kothare (London)

I am honoured and privileged to say a few words about a family who in my opinion are one of the most hospitable and kind families I have known in my 70 years.

I first met Madhukar Kothare back in the summer of 1974 at a music concert in London, I was very impressed by this tabla artist who not only was a great performer but was also so pleasant and humble.

I wanted to learn tabla from him and my first lesson was on 8th January 1975. From that day until his demise, we were good friends as he called it, but to me, he was a Guru till the end and proud to say that I served him as best as I could, driving him to most of the concerts that he performed in. In the early 70s he was a residential



tabla player for the BBC amongst other institutes.

Madhukarji's wife, Sheelaji, was like a pillar in supporting an extremely busy life that guruji led socially and professionally, their house was always filled with guests and they were so generous in supporting all artists who were arriving in UK, to name a few; Hemanti Shukla, Shivkumar Sharma, Anup Jalota and many other youngsters who were performing for the first time in England.

Sheelaji was also an amazing cook and an excellent sweet dish maker, but I can also confirm that Guruji was also a great cook too, as I have eaten many times when Sheelaji was visiting India with Amitabh and Shashank. Guruji was an extremely hard-working person, even after working two-day consecutive shifts, he would look fresh as a daisy when I used to pick him up for concerts.

My son Tilakram was also Guruji's tabla student and learnt how to play tabla to a high standard and performed at various locations including Maharasthra Mandal in London. Tilakram was taught how to play tabla with care and attention, but also about the theory and love of music – which can be said to be of the same importance to practical playing!

My son recollects that one of the things that Guruji taught him is that "music does not have any language" – this broadened his appreciation of music to this very day. My son recollects fond memories of learning 1-2-1 tabla sessions with Guruji (which was not the norm in those days as other teachers held group classes) every week and the fact that Guruji never charged us a single penny for his time, he imparted his knowledge with love. The dedication, heart and soul that Guruji put into every lesson, really left an imprint on him, and he is missed dearly.

This is not even tip of iceberg, what can I say about this great couple who were very welcoming and super human beings, and an honour to serve them, I was with Guruji till the end and still miss his love for me and my son.

*

### सौ. वृंदा वासुदेव जोशी

मधू आणि शीला कोठारे यांना आम्ही ७५साली पहिल्यांदा पाहिलं तेव्हा बाबूजी सुधीर फडके ह्यांना तबल्याची साथ करायला स्टेजवर मधुकर आणि आम्ही दूर प्रेक्षकांत होतो. मात्र पुढील थोड्याच वर्षांत हे अंतर कमी होत होत ते दोघे घरचे कधी झाले कळलंच नाही. ह्याला कारण म्हणजे दोघांचा निगर्वी, मनमोकळा स्वभाव, कोणालाही मदत करण्याची वृत्ती आणि लोकसंग्रह आणि आदरातिथ्य करण्याची आवड!

मँचेस्टरमधील कलाप्रेमी मंडळाचे कार्यक्रम यशस्वीरित्या चालु ठेवण्यात येथील गोठीवरेकर, सहस्रबुद्धे, आपटे वगैरे मंडळींप्रमाणे कोठारेंचाही मोठा वाटा आहे

पंडित जितेंद्र अभिषेकी, कारेकरबुवा, बाबूजी, यशवंत देव यांच्यासारख्या दिग्गज कलाकारांप्रमाणे अनेक नवोदित कलाकारांनाही मधुभाऊ तेवढ्याच तन्मयतेने, तत्परतेने साथ करायचे. त्यांना घरी आणण्यापासून कार्यक्रमांच्या ठिकाणी नेणे वगैरे जबाबदारी शीलाताई आनंदाने करायच्या.

१९८४ मध्ये आमच्यातील तीन जोडप्यांच्या लग्नाला २५ वर्षे झाल्याबद्दल गुप्तपणे सोहळा करण्याचे ठरले. शीला आणि मधुही त्यासाठी मुद्दाम लंडनहून आले. विशेष म्हणजे शीलाने कितीतरी नऊवारी लुगडी, दागिने, वेण्या आणल्या होत्या. सगळ्याजणींना छान नटवले. रुखवताप्रमाणे सुबक खाद्यवस्तूही आणल्या. मधुभाऊंनी सगळ्या हौशी कलावंतांना तबल्याची साथ केली. त्यांच्यामुळेच त्या सोहळ्याला अपूर्व रंगत आली. श्री व सौ आठल्ये, श्री व सौ गोठीवरेकर, श्री व सौ करंदीकर यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. आम्ही सर्वांनी एका अविस्मरणीय कार्यक्रमाचा आनंद लुटला

सौ.आशा खाडिलकर या आता एक प्रतिथयश गायिका आहेत. पण १९८५ मध्ये त्या प्रथम इंग्लंडला आल्या तेव्हा तशा नवोदितच होत्या. कोठारेंनी त्यांना मुलीप्रमाणे वागवून त्यांची सोय केली. कार्यक्रम योजिले. त्यानंतर आशाताई इकडे बऱ्याचवेळा आल्या. प्रत्येकवेळी त्यांना कोठारेंच्या अगत्याचा अनुभव आला. आजही आशाताईंच्या मनात कोठारे दाम्पत्याबद्दल नितांत आदर आणि प्रेम आहे.

१९८३ साली रागिणी भक्तीगीत मंडळाच्या सात बायका इंग्लंडला आल्या होत्या कोठारे त्यांना कार्यक्रमासाठी मँचेस्टरलाही घेऊन आले. मधुभाऊंनी निरनिराळी तालवाद्ये वापरून उत्तम साथ केली आणि वातावरण दुमदूमून टाकलं. एक छान, आगळा अनुभव सर्व श्रोत्यांना मिळाला

जयमालाबाई आणि कीर्ती शिलेदार आपल्या साथीदारांबरोबर इकडे आले होते. त्यांना साथ करायची नसूनही दोन गाड्या घेऊन कोठारे त्या सर्वांना आमच्याकडे घेऊन आले होते निव्वळ त्यांचा कार्यक्रम व्हावा म्हणून.

२००३ मध्ये आम्ही काही मंडळींनी स्व. बाबुजींना श्रद्धांजली म्हणून लंडनच्या महाराष्ट्र मंडळात कार्यक्रम करण्याचे ठरवले. १०-१५ हौशी गायकांना मधुभाऊ साथ करणार होते. प्रत्येकाची पट्टी वेगळी! त्यामुळे निरनिराळ्या सुरातले तबले मधुभाऊ मंडळात घेऊन आले. अनेकजण त्यांच्या घरात चहा नाश्त्यासाठी होतेच. कलाकार लहान-मोठा कुणीही असो त्याला प्रामाणिकपणे, तितक्याच उत्साहाने, मनापासून साथ करायची हे आपले ब्रीद त्यांनी कधीच सोडले नाही. त्यांच्या मोठेपणाचा आम्हाला पुन्हा एकदा साक्षात्कार झाला..

संगीतात पूर्ण बुडालेलं हे एक आगळं व्यक्तिमत्व होतं. त्यांना आम्ही कसे विसरणार?



We specialize in : REAL GOLD & SILVER KAZBI BORDERS and ART GOLD & SILVER

Dipti Vijayakar
Fashion Designer & Stylist

Visit us & see our
One-of-a-kind collection of

Kazbee
THE ETHNIC LOUNGE

Shop No. 18, Parekh Mahal , Lady Jamshedji (LJ) Road, Shivaji Park, Mahim, Mumbai-400016.
• kazbee • Email: vijayakardipti@yahoo.com • web.: www.kazbee.com • Mob.: 9819542551


Kazbee
THE ETHNIC LOUNGE
We specialize in : REAL GOLD & SILVER KAZBI BORDERS and ART GOLD & SILVER


Kazbee
THE ETHNIC LOUNGE
Visit us & see our One-of-a-kind collection of
We specialize in : REAL GOLD & SILVER KAZBI BORDERS and ART GOLD & SILVER
We also Repair Kazbi Borders
Dipti Vijayakar
Fashion Designer & Stylist
Shop No. 18, Parekh Mahal, Lady Jamshedji (LJ) Road, Shivaji Park, Mahim, Mumbai - 400016.
• kazbee • Email: vijayakardipti@yahoo.com • web.: www.kazbee.com • Mob.: 9819542551

WITH BEST COMPLIMENTS
FROM

# A WELL WISHER

# सौ. राज मिलींद अजिंक्य

आणि

# डॉ. मिलींद भोलानाथ अजिंक्य

## यांजकडून डॉ. गुरुनाथ कृष्णराव धैर्यवान यांच्या जन्मशताब्दीनिमित्त वर्ष स्मरणार्थ

## Happy Diwali & Best Wishes
## From
## The Pathare Prabhu North America Families

| | |
|---|---|
| Monica Rane Iyer & Ravikant Iyer | $150.00 |
| Megha & Tushar Kothare | $150.00 |
| Dr. Janhavi Rane & Family | $100.00 |
| Dr. Milind Bholanath Ajinkya and Mrs. Raj Milind Ajinkya | $100.00 |
| Avinash & Jaishree Talpade | $100.00 |
| Anonymous | $100.00 |
| Neelima & Pt. Sujan Rane | $75.00 |
| Amogh and Sunija Kothare | $30.00 |
| Mrs.Ratna Vijay (Ratna Narayan Ajinkya) | $25.00 |
| Rohini Kothare Agaskar | $25.00 |
| Shilpa Kothare | $25.00 |
| Snehal Sanjeev Deshmukh | $25.00 |
| Mamata & Sanjay Kirtikar | $25.00 |
| Rupa Narayan Ajinkya Trivedi | $21.00 |
| Abhijeet & Sejal Vijaykar | $20.00 |
| Archana & Jaideep Vijaykar | $10.00 |
| Shoma Kothare Nair | $10.00 |
| Anonymous | $10.00 |
| Poonam Kothare Nair | $5.32 |
| Apeksha Rane | $5.00 |
| Krishnakumar Jaykar | $5.00 |
| Total | $1016.32 |

# Comrade Jaywant Gajanan Kothare

**⁎ MILIND KOTHARE ⁎**



Comrade Jaywant Gajanan Kothare was trade union activist. He dedicated his life for welfare & justice of General Insurance Employees.

Born to Rao Bahadur Gajanan Ramchandra Kothare who founded Mechanical Engineers Association to safeguard Engineer's interest with employers & government, which gave improved status to the qualified engineers then.

Just like his father he fought for standardisation of wages with Government & G I C management against the stellar recommendation of Matharani Committee in 1972. He stationed himself in Delhi for forty-four days to lead dharana & strike to draw Government & G I C management to a discussion table to achieve various rights of employees like Neutralisation of DA, Categorisation, Bonus, Sick leave, Settlement of wage disputes, Industry status etc.

He was JT Secretary of GIEAA & a great strategist gifted with drafting & negotiating skills.

Earlier in life he was victimised by South British Insurance Co in 1964 as he was leading a union there along with GIEUW.Z but strike & agitation by employees forced management to withdraw action against him.

He was a think tank & backbone of GIEUW.Z. & GIEAIA. He worked with devotion & zeal till his last breath for these organisations without aspiring for positions in the organisations.

He was closely associated with various trade union leaders not only in financial sector but in industrial sector like Mumbai Girni Kamgar Union, All India Trade Union Congress (AICTU) & Communist Party of India. He was a close associate of Comrade S A Dange & seeked his guidance on various issues of P F contribution or Computerisation in non-life Industry.

He was on editorial board of VIMASATHI. **He was elected as delegate to the conference of World Federation of Trade Union Congress held in Germany.**

I must express my deep gratitude towards Kaka Samant Ex General Secretary GIEUW.Z. because of whom we could get a glimpse of his professional life. The above-mentioned pointers are extract from memoir titled as 'Brief History Of Union Movement In Non-Life Industry' by Kaka Samant. Honestly, he never spoke about

his union activities with us & kept his professional life & personal life as two different compartments.

Kaka Samat got in touch with me, as he wanted to publish a memoir on Brief History Of Union Movement In Non-Life Insurance Industry. He was a very close associate of Com J G Kothare & had great respect for him. He described Comrade Kothare as very focused in his work & did not revel much about his personal life.

Similarly, he was a very different person in personal life, very loving & a family man. He loved all his nephews & nieces. He was a very favourite uncle for all of us. He would shower lots of love & affection on all of us by inviting & cooking delicious meal with a specially designed Kulfi (milk reduced with barfi.) This was his own invention, no Sanjeev Kapoor those days!


My special connect with him as a kid was because I was chubby & those days Maratha was a daily newspaper we use to get, it was a very vibrant daily edited by Acharya Atre. Our family environment was quite communist & socialist those days as my aunty late Kusum was also an activist, so I use to read Maratha & participate in the debate with elders which was liked by him.

He was very friendly with all of us that we could share our personal issues with him. I requested him to accompany me when I went to see my would-be wife & he gave me hilarious sermon on my nerves while returning home after the event. I was blessed as he performed the parental role in my wedding.

Very unfortunate that God took him away from us in his early sixties. I guess learning to keep professional & personal life as distinct as possible will be true homage to him.

*

## हास्यचित्रे



**WITH BEST COMPLIMENTS**
**FROM**

# Monica Rane Iyer & Ravikant Iyer

**WITH BEST COMPLIMENTS**
**FROM**

**Megha & Tushar Kothare**

# माझ्या आयुष्यातील काही विलक्षण योगायोग


*** मृदुला प्रभुराम जोशी ***

अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने १९६१ सालच्या मे महिन्यात मी माझ्या मावशीबरोबर उत्तर भारतात एका लांबलचक दौऱ्यावर गेले होते. हे संमेलन भरलं होतं आसाममधल्या तिनसुकिया या शहरात, पण तिथे पोहोचेपर्यंत आणि तिथून परत येईपर्यंत आम्ही खूप दीर्घप्रवास केला आणि खूप शहरं, तीर्थक्षेत्रं आणि थंड हवेची ठिकाणं पाहिली. आज विचार केला तर अशक्य वाटेल इतकं काही आम्ही त्या एकाच प्रवासात पाहून घेतलं. मुंबईहून निघाल्यापासून टप्प्याटप्प्याने आम्ही अलाहाबाद (प्रयाग संगमस्नान), वाराणशी (काशीविश्वेश्वर, गंगास्नान), सारनाथ, गया, मोकामा (बौद्ध तीर्थक्षेत्रं), गुवाहाटी ( कामाख्या मंदिर) अशी धार्मिक महत्त्वाची ठिकाणं तर पाहिलीच, पण जोडीनेच दार्जिलिंग, शिलाँग अशी हिल स्टेशन्स, आसाममधले चहाचे मळे व चहाचे कारखाने, नाहरकटियाच्या तेल विहिरी व तेल शुद्धीकरण प्रकल्प, दिब्रूगड, शिवसागर अशी शहरं असं खूप काही पाहिलं. या दरम्यान वेगवेगळ्या ठिकाणी खूप मोठ्या लोकांच्या, विद्वानांच्या भेटीही झाल्या. अलाहाबादमध्ये नेहरूजींचं आनंदभवन पाहिलं, पूज्य पुरुषोत्तमदासजी टंडन यांचं दर्शन घेतलं, वाराणशीमध्ये काशी नागरी प्रचारिणी सभेमध्ये कवी उपेंद्रनाथ अश्क यांना भेटलो, तिनसुकियात हिंदी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष संपूर्णानंद, बाबू जगजीवनराम, हरेकृष्ण मेहताब आणि इतर कितीतरी श्रेष्ठ साहित्यिकांना जवळून पाहिलं आणि धन्य झालो. मात्र या सर्वांहून अगदी वेगळ्याच व्यक्तींना भेटण्याचा एक अपूर्व योग आला. त्याविषयीच आज मला लिहायचं आहे.

दार्जिलिंगमध्ये आमचा चार दिवसांचा मुक्काम होता. तिथे गेल्यावर ज्याप्रमाणे भल्या पहाटे तीन वाजता उठून टायगर हिलवर जाऊन कांचनगंगा शिखरावर होणारा अप्रतिम सुंदर सूर्योदय बघायचा असतो तो तर आम्ही बघितलाच, पण अगदी योगायोगाने दुसऱ्या दोन गोष्टीही बघायला मिळाल्या.

दार्जिलिंगमध्ये 'हिमालयन माउंटेनिअरिंग इन्स्टिटयूट' आहे हे आम्हाला कुणीतरी सांगितलं होतं म्हणून तिथे जायचं ठरवलं. पायी पायी चालत, खूप तंगडतोड करून आम्ही सकाळी नऊच्या सुमारास तिथे पोहोचलो. आमच्या लक्षात आलं

प्रभुरामांच्यामुळे तर मी दुसऱ्यांदा सत्यजित रे यांना प्रत्यक्षच भेटले. दादरच्या हॉटेल प्रीतमच्या बाहेर फूटपाथवर ते सिगरेट ओढत उभे होते. आजूबाजूला कुणी नव्हतं. आम्ही जरासे घाबरतच त्यांच्या जवळ गेलो आणि थोडासा संवाद सुरू केला. तेही दिलखुलासपणे आमच्याशी बोलले आणि मग मी जवळ होता त्या कागदावर त्यांची स्वाक्षरी घेतली.



कविता

# The bird and her nest

A bird tries very Hard to build a nest,
Only when she builds one will she get any rest.

Looking for a spot she builds up pace,
As there are others trying to find one, not just a few, but the whole race!

While some find a spot on their first try,
Others will find one when pigs fly!

Building with leaves and twigs a nest;
Upon laying her eggs, she warms them giving her best.

While the eggs hatch in the city where the baby birds will mingle,
For a better life they'll fly into the jungle.

With the mother bird all alone,
She leaves the nest for nature to own.

**-Vihaan Kothare**

---

नव्हतं पण तो दिवस नेमका २९ मे हा दिवस होता. १९५३ साली याच दिवशी शेर्पा तेनसिंग आणि एडमंड हिलरी यांनी एव्हरेस्ट शिखर सर केलं होतं. आज २९ मे १९६१ रोजी त्या घटनेचा आठवा वर्धापनदिन साजरा होत होता. आम्ही त्या इन्स्टिट्यूटच्या सभागृहात पोहोचलो तर काय, खुद्द शेर्पा तेनसिंग तिथे हजर होते आणि इन्स्टिट्यूटचे संचालक ब्रिगेडियर ग्यान सिंग भाषण करत होते. आम्हाला इन्स्टिट्यूट पाहायची होती म्हणून आम्ही भाषणांचा कार्यक्रम संपेपर्यंत थांबलो आणि कार्यक्रम संपताच पुढे जाऊन शेर्पा तेनसिंग यांना भेटलो, त्यांच्याशी हस्तांदोलन केलं. अत्यंत नम्रपणे ते आमच्याशी दोन वाक्यं बोलले. आमच्या ध्यानीमनी नसताना हा अभूतपूर्व योग जुळून आला होता आणि आमचा आमच्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. ब्रिगेडियर ग्यान सिंग यांनी तर त्यावरही कडी केली. ते स्वत: आमच्याबरोबर आले आणि ती संपूर्ण इन्स्टिट्यूट खालीवर फिरून त्यांनी आम्हाला दाखवली, तिथल्या म्युझियममध्ये ठेवलेल्या एव्हरेस्ट विजयाशी संबंधित वस्तू दाखवल्या. आम्ही फक्त चार जण होतो पण जणू त्यांचे जवळचे पाहुणे होतो अशा पद्धतीने त्यांनी आमचं आगतस्वागत केलं. त्यावेळी माझ्या स्वाक्षरी-वहीत घेतलेली त्यांची स्वाक्षरी मी आजही जपून ठेवली आहे आणि ती बघितली की हा सगळा प्रसंग माझ्या डोळ्यांसमोर उभा राहतो.

त्या इन्स्टिट्यूटमधून बाहेर पडलो आणि तिथून चार पावलांवर पण थोड्या उंचावर असलेल्या हॉटेल कांचनजंगामध्ये श्रमपरिहारासाठी गेलो. तिथे जाऊन बघतो तर काय, अंगणात उघड्यावर ठेवलेली सगळी टेबलं भरलेली, आम्हाला जागाच नाही. थोडी चौकशी केली तर लक्षात आलं की ती बसलेली सगळी माणसं म्हणजे पर्यटक नव्हते तर अभिनेते होते आणि तिथे त्या वेळी सत्यजित रे यांच्या 'कांचनजंगा' या चित्रपटाचं चित्रीकरण चालू होतं. पाचच मिनिटांत स्वत: सत्यजित रे तिथे अवतीर्ण झाले आणि आम्हाला त्यांचं जवळून दर्शन झालं. एकाच सकाळी, एकाच भवतालात शेर्पा तेनसिंग आणि सत्यजित रे या दोन महान व्यक्तींना पाहायला मिळणं हा योगायोग विलक्षणच नाही का?

('मैत्री अनुदिनी' मधून साभार.)

**WITH BEST COMPLIMENTS**
**FROM**

# Dr. Milind Bholanath Ajinkya

# and

# Mrs. Raj Milind Ajinkya

**WITH BEST COMPLIMENTS**
**FROM**



# Dr. Janhavi Rane & Family

व्यक्तीविशेष

# आमची आई

* विनय आणि विद्या त्रिलोकेकर *

सर्वांना दिवाळीच्या शुभेच्छा!

धनत्रयोदशी किंवा धनतेरस आणि वसुबारस ह्याने, अनेकांची दिवाळीची सुरुवात या सणांनी होत असते. म्हणजे हे दिवस घरोघरी साजरे होतात.

तथापि, आमची दिवाळी दरवर्षीप्रमाणेच आठविद्याला सुरू होते. ते असे का?

होय, आमची दिवाळी नेहमी या शुभदिवशी सुरू होते, कारण आठविद्याला असतो आईचा जन्मदिवस- आम्हा सर्वांचा मातृदिन!

मला असे वाटत नाही की एखाद्याला आपल्या प्रियजनांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी एखाद्या खास दिवसाची गरज आहे. आपल्या आईची आठवण काढण्यासाठी कोणाला विशेष प्रसंगाची गरज आहे का? तसे आपल्या माणसांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी खास दिवस लागतो का?

तरीसुद्धा, मला वाटले की माझ्या आईबद्दल, अलककिशोरी बाळाराम त्रिलोकेकर, (तिचे पूर्ण नाव आहे.) हिच्याबद्दल लिहावे ती फक्त एक लहान खंडणी आहे, श्रद्धांजली! मी एक मोठा लेखक, मी एक कादंबरी लिहिली आहे असे असते होय, जर मी एखादा मोठा लेखक असतो तर आईवर मोठी कादंबरीच लिहिली असती. असे तिचे व्यक्तिमत्त्व भव्य होते - उदंड व्यक्तीमत्व!

आमची आई एक महान व्यक्ती होती, खरंच ती होती. तिने तिच्या आयुष्यात खूप काही केले, खूप संघर्ष केला असावा, पण कोणत्याही क्षणी तिची इच्छाशक्ती कमी झाली नाही, तिचा देवावरील विश्वास कमी झाला नाही किंवा तिच्यावर उपचार करणाऱ्या सर्व डॉक्टरांवर तिचा विश्वास कमी झाला नाही. कदाचित, तिच्या संघर्षाची सुरुवात माझ्या वडिलांच्या आजारपणापासून झाली. तिने पतीची चांगली काळजी घेतली, विशेषत: त्याच्या दीर्घ आजारपणादरम्यान. त्यांना कोलन कॅन्सर होता. नवऱ्याचा कॅन्सरसारखा मोठा आजार काढला. तिने त्याला सांभाळले. शस्त्रक्रियेनंतर त्याला खुल्या जखमेत सोडून देण्यात आले होते आणि आमची आई रोज अशा पद्धतीने ड्रेसिंग करायची की रेल्वेतील त्याच्या सहकाऱ्यांना याबद्दल कधीच माहिती नव्हती. ३५ वर्षांच्या वयात ती विधवा झाली आणि तिला पाच मुलांची (चार मुली आणि एक मुलगा) काळजी घ्यावी लागली, मोठी मुलगी सुमारे १३ किंवा १४ आणि सर्वात लहान मुलगा सुमारे ३ ते ४ वर्षांचा होता. ऐन तारुण्यात वैधव्यआले आणि पदरात होती चार मुलं. सर्वांत मोठी मुलगी बारा वर्षांची, आणि सर्वात लहान मुलगा साडेतीन वर्षांचा. ती आम्हा सर्वांची आई आणि वडील दोघेही होती आणि आम्हा सर्वांना खूप चांगल्या पद्धतीने वाढवले. तिने विविध विचित्र कामे केली असतील. पण मला नक्की माहीत आहे की, तिने बाहुली बनवण्याच्या कारखान्यात काम केले होते. कारण ती बाहुल्यांचे चेहऱ्याचे मुखवटे त्यांच्यावर पेंटिंगचे काम करण्यासाठी आणत असे. तिच्या पतीच्या मृत्यूनंतर पाच लहान मुलांना वाढवणे कठीण काम आणि आव्हानात्मक असावे. चांगल्या पद्धतीने वाढवणे नक्कीच आव्हानात्मक होते. तिचे अनेक छोटे-मोठे आजार असूनही, तिने स्वत:च्या आयुष्यातील प्रत्येक क्षण जगला आणि आनंद घेतला आणि आपल्या सर्वांना जीवनाचा आनंदही दिला. तिला आपल्या आजूबाजूच्या लोकांनाही आनंदी करण्याचे मार्ग

**कविता**

## निरांजनातील वात

**-सौ. निकेता प्रशांत राणे**

आई, असशी तू निरांजनातील वात,
तेवून इतरेजना राहिलीस प्रकाश देत.
संसार सुखाचा गोफ विणता,
नाही पडू दिलीस कुणा भ्रांत.
आई, असशी तू निरांजनातील वात

संसाराचा सारीपाट खेळताना राहिलीस तू शांत
स्वत: तेवता, तेवता राहिलीस सर्व प्रकाश देत,
कळले नाही कधी विलीन झालीस पंचतत्त्वात,
आई, असशी तू निरांजनातील वात

आज निघाले मी 'तिकडच्या' घरी,
साश्रू नयनाने निरोप देती मज तात.
होईल का हे तुज देवाघरी ज्ञात,
आई, असशी तू निरांजनातील वात

संस्कार तुझे राहिन नित्य मी आठवत,
सासरी ठेवीन आनंदाने सर्वांना सुखात.
सुखदु:खाचा हा शेला सहज विणता,
होईन का तुज सम मी निरांजनातील वात?

*

---

सापडतील. तिच्या आयुष्यात तिने अनेक शस्त्रक्रिया भोगल्या आणि विविध प्रकारचे उपचार केले; पण प्रत्येकवेळी ती भयंकर कर्करोगासह रोगाचा पराभव करून, केमोथेरपी, शस्त्रक्रिया आणि रेडिएशन या तीनही प्रकारे उपचार करत विजयी झाली.

डॉ. अर्नेस्ट बोर्जेस (डॉ. बोर्जेस, तुम्हाला माहिती असेलच की, टाटा मेमोरियल हॉस्पिटलशी संलग्न आंतरराष्ट्रीय स्तरावरील आदरणीय कर्करोग तज्ज्ञ म्हणून) मला एकदा म्हणाले, 'विनय, तुझी आई माझी बहीण आहे. तिने आमच्यासारख्या शल्य-चिकित्सकांचा क्रूरपणा किती वेळा, कितीतरी वेळा सहन केला आहे. आणि प्रत्येक वेळी ती रोगांना हरवून विजयी झाली आहे. अशा भयंकर आजाराविरुद्ध इतक्या धैर्याने लढण्यासाठी कोणी असेल तर ही महिला नोबेलला पात्र आहे. मी तिच्या इच्छाशक्तीचे आणि जगण्याच्या इच्छेचे कौतुक करतो.'

एकेकाळी ती 'सर्वात जास्त काळ जीवंत असलेली कर्करोग रुग्ण' होती, जसे तिच्या फ्रेम केलेल्या छायाचित्राखाली लिहिले होते, जे हॉस्पिटलमधील इतर रुग्णांना प्रेरित करण्यासाठी दाखवले जाई.

तिने स्वप्न पाहायला शिकवले. इतर कोणत्याही चांगल्या आईप्रमाणे तिने आपल्यामध्ये, माझ्या भावंडांमध्ये आणि माझ्यामध्ये अनेक चांगल्या सवयी (बिंबवल्या) रुजवल्या आहेत आणि आम्ही त्या आपल्या मुलांना दिल्या आहेत आणि त्यांनीही त्यांचे थोडेफार काम केले आहे. तिच्याकडून आम्हाला मिळालेल्या सवयींपैकी एक म्हणजे 'वाचणे' (वाचन करणे). परंतु आम्हाला आमच्या आईकडून मिळालेली सर्वात मौल्यवान भेट म्हणजे स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता. आमची आई धर्माभिमानी आणि धार्मिक स्त्री होती, पण तिने आपल्या कल्पना आमच्यावर कधीच लादल्या नाहीत. धर्माबद्दल आपली स्वत:ची कल्पना आहे.मी, एक तर, असा धार्मिक नाही. पण माझा देवावर विश्वास आहे. माझी पत्नी खूप धार्मिक आहे (सासूने डोक्यावर हात ठेवून ) आणि माझी मुलगीही आहे. हे मला माझ्या बहिणीने लिहिलेल्या पुस्तकाची आठवण करून देते. मला माझ्या बहीण पुष्पाने लिहिलेल्या 'देवांची जन्मकथा' ह्या पुस्तकाची आठवण झाली. त्याचे ढोबळमानाने 'देवांचा जन्म' असे भाषांतर केले आहे.

आज 'ऑनलाइन वाचन' चा जमाना आहे .मला फक्त पुस्तक हातात घेऊन वाचल्यावर उपाय मिळतो. प्रिय व्यक्ती. पुस्तके वाचण्याबद्दल बरेच काही!

हे पुस्तक वाचण्यासाठी तुम्ही दिलेल्या लिंकवर ते खरेदी करू शकता:

Htpp://www.BookGanga.com

एके दिवशी, अठविद्यावर, तंतोतंत असल्याचे एका महिलेने मला व्हॉट्सॲपवर संदेश पाठवला. आज किती दिवसांनी मोबाईल बघितला. वाचून मन भरून आले. गत आठवणींना उजाळा दिला. मी आज

त्याच अलग मावशीचे उदाहरणार्थ सगळ्याना देणार आहे. आईला दिलेल्या स्मृतीशब्दांजलीला मानाचा मुजरा . तिने माझ्या आईला 'वेगळे ' म्हटले आणि कदाचित तसे असेल. 'अलग' म्हणजे वेगळा. आमची आई खरोखर वेगळी होती- अद्वितीय!

माझी आई महान होती. अरे, प्रत्येक मुलाला त्याच्या आईबद्दल असेच वाटते. तुम्ही म्हणाल, प्रत्येक आई आपल्या मुलांची काळजी घेते, तुम्ही म्हणाल आणि बरोबर. पण माझी आई वेगळी आणि खास होती. फक्त आमच्यासाठी नाही, माझ्या चार बहिणी आणि मी. मी तर कदाचित उशीरा उशीरा. प्रमोद नवलकर महाराष्ट्राचे सांस्कृतिक मंत्री यांनी एकदा लक्षात ठेवा (मला खात्री नाही आहे), आमच्या ज्ञाती मॅगझिन 'प्रभू प्रभात मध्ये लिहिले होते '( प्रभू उडालाच) तसेच मी म्हणून भटक्याच्या भटकंतीचा दिवाळी अंक एक 'भटकंती'(भटक्यांची भ्रमंतीच्या एका दिवाळी अंकात) तिच्याबद्दल. त्याचे अशा प्रकारे शीर्षक होते: गावाची अलकमावशी 'Gavachi AlakMavashi' .त्याने तिला बोलावले. गावाची अलकमावशी (शेजारच्या अलक आंटी). त्यांनी अशा प्रकारे लिहिले होते (शब्दशः नाही असू शकते, पण तो फक्त सारांश): ''आमच्या अलकमावशी गावाच्याच आहेत . (तेव्हा ती जिवंत होती). आपल्या पाच लेकरांसोबत चाळीतील मुलांमुलींना घेऊन दिवाळीत मौज मजाकरिता घेऊन जात असत. एवढेच नाहीतर आपल्या लहानशा घरात मुलींच्या मैत्रिणींचे मंगळागौरसारखे कार्यक्रमदेखील साजरे करून चाळीतील klauncher: हा मुलींना माहेरपण दिले... अलकमावशी वाघीण आहेत .त्यांचा चाळीत मोठा दरारा . त्यामुळे त्यांच्या मुलीची चेष्टा सोडा; वाईट नजरेने बघण्याचे कोणही धाडस करीत नव्हते...''

होय, तिने इतरांना मावशीची भूमिका बजावली तसेच आमची आई होतानाही तिने आम्हाला मोठे केले.

तिचा देवावर पूर्ण विश्वास होता. तिचा विश्वास होता की, 'आमची देवता, व्रजेश्वरी (वज्रेश्वरी देवी) मध्ये कोणतीही समस्या सोडवण्याची शक्ती आहे.' तुमच्या मुलाला शाळेत प्रवेश मिळत नाही, तुम्हाला तुमच्या मुलीसाठी योग्य जुळवाजुळव करण्यात अडचण येत आहे किंवा इतर कोणतीही समस्या आणि तिच्याकडे या सर्वांसाठी तयार उपाय होते. 'वज्रेश्वरी मला चल, प्रार्थना आपल्या प्रार्थना मंजूर झाल्यानंतर आपण परत येतात असे तिला वचन. (देवीला साकडं घाल की काम झाल्यावर मी परत येईन) , आणि तुमच्या इच्छा पूर्ण होतील.' त्याचप्रमाणे 'काळभैरव आमचा दुसरा होता देव. लग्न, धागा सोहळा किंवा कोणताही धार्मिकविधी, किंवा कुटुंबात आजारी असताना जसे कोणतेही कार्य होते, अशावेळी काळभैरवाच्या पायावर 'तरण' (संरक्षणासाठी) नारळ ठेवला जात असे. कालभैरव आमचे दुसरे कुलदैवत. घरात काही मोठा समारंभ असो, लग्नकार्य असो किंवा कोण आजारी असो, कालभैरवाच्या देवळात जाऊन 'तारण' म्हणून नारळ ठेवणे एक प्रथाच घालून दिली. ही प्रथा संपूर्ण कुटुंब-माझी पत्नी, मुलगी, माझ्या बहिणी, पुतणे आणि भाची यांनी धार्मिकपद्धतीने पाळली आहे .

मी तिच्याबद्दल अधिक लिहू शकतो. अजून बरेच काही आईबद्दल लिहिण्यासारखे आहे. कदाचित काही इतर वेळी!

जरी आमची दिवाळी आठविड्यापासून सुरू झाली असली तरी , अनेक लोकांसाठी काल, धनत्रयोदशी किंवा धनतेरस आणि वसुपरस दिवाळीच्या प्रारंभाला चिन्हांकित करतात. सर्वांना दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा !

*

## (वात्रटिका)

### अलार्म

बहिऱ्याच्या घड्याळाचा रोज वाजतो अलार्म,<br>
बहिरा झोपतो, बाकी उठून करतात काम.<br>
बहिरा उठतो, जेव्हा पूर्ण होते झोप,<br>
डुलक्या घेणाऱ्यांवर सतत डागतो तोफ.

-डॉ. सुमन नवलकर

**WITH BEST COMPLIMENTS**
**FROM**



# Avinash & Jaishree Talpade

व्यक्तीविशेष

# बाबू भटजी

★ अजित इंद्रसेन नवलकर ★

'काय बाबू भटजी' ललिताबाईंनी मोठ्याने हाक मारली आणि डोक्यावर फडके बांधलेले व कमरेला मळके फडकेवजा उपरणे गुंडाळलेले बाबू भटजी हात जोडून हजर. पालवावर एका पाठारे प्रभू लग्न समारंभातील पन्नास वर्षांपूर्वीची घटना ही.

'काय म्हणता?' बाबू भटजींनी हसत विचारले. ''अहो माझी बहीण किशोरीच्या नातवाची मुंज आहे पुढच्या महिन्यात खारला त्याच्या घरी, तर जेवणासंबंधी बोलणी करायला तुम्ही कधी येता?'' ललिताबाईंनी विचारले.

''येतो ह्या रविवारी. तुमची खारची बहीण म्हणजे जयकर ना?'' बाबू भटजी म्हणाले.

''होय, मग मी सांगते तसं तिला.'' ललिताबाई म्हणाल्या. लग्न समारंभात मळक्या कपड्यात दिसणारे बाबू भटजी स्वच्छ सदरा, धोतर आणि टोपी घालून बोलणी करण्यास हजर होत असत. किती माणसांचे जेवण व जेवणाचे पदार्थ ह्याची चौकशी करून ते यजमानास साहित्याची यादी देत असत. त्यात तांदूळ, डाळ, गव्हाच्या पीठापासून ते अननस, नारळ, काजू, खिसमिस, खारीक, साबुदाणा व इतर मसाले ह्यांची नोंद केली जाई.

साहित्य आणल्यावर घरातील एका व्यक्तीवर ते साहित्य लागेल तसे देण्याची जबाबदारी सोपवली जाई.

त्या काळी बरीच वर्षे लग्न/मुंजी समारंभ म्हणजे, जेवण बाबूभटजींचे हे ठरलेले.

पालवावर असो किंवा खारला, बाबू भटजी आणि त्यांचे सहकारी मुगु भटजी, नागू भटजी व इतर भटजी, समारंभाच्या आदल्या रात्री सर्व साहित्य घेऊन हजर होत असत. पालवावर घराच्या मागील बाजूस असलेल्या नोकरांच्या बेड्यात जेवण शिजवले जात असे. तसेच खारला घराच्या वाड्याच्या मागील अंगणात जेवण शिजवण्याची तयारी केली जात असे.

विटा दगड रचून चुली थाटल्या जात आणि बरोबर आणलेल्या लाकडावर जेवण शिजवले जाई. पाटावरवंट्यावर नारळाची सोय वाटून चटणी, अननसाचे सांभारे तयार केले जाई.

रात्रभर चालू असलेल्या स्वयंपाकाच्या प्रक्रियेने सकाळपर्यंत जेवणाचे बहुतेक सर्व पदार्थ तयार होत असत. त्यात अननस काजुचे सांभारे, गोडे बटाटी, चवळ्याची भाजी, तसेच काजू खिसमिस, खारीक घातलेले पंचामृत, सागूचे दूध, ताजी चटणी, कैरीचे लोणचे असे मुख्य पदार्थ असत.

सकाळ झाल्यावर बाबू भटजींचे बहुतेक सहकारी भटजी निघून जात व दोन/तीन सहकारी भटजी; पुऱ्या, पापड, भाजी हे पदार्थ प्रत्येक पंगतील लागतील तसे तळून देत.

सकाळी समारंभ सुरू होईपर्यंत प्रत्येक पदार्थाला चांगली चव येत असे. ऑफिसला जाणाऱ्या लोकांच्या पहिल्या पंगतीपासून ते यजमानांच्या शेवटच्या पंगतीपर्यंत प्रत्येक पदार्थाची चव कायम असे; नव्हे ती वाढतच जाई. बाबू भटजी ही संस्कृती होती वा तचे चिन्ह.

वर्षानुवर्षे चालत आलेली ही पद्धत गेल्या पन्नास वर्षांपूर्वी हळुहळू बंद होत गेली आणि जेवणाचे

केटरींग कॉन्ट्रॅक्ट देण्याची पद्धत सुरू झाली. ह्याचे मुख्य कारण असे की; बाबू भटजी व त्यांचे सहकारी भटजी, जेवण तयार करीत; पण ते वाढण्याचे काम यजमानांच्या जवळच्या नातेवाईकांना करावे लागत असे. शालू नेसलेल्या बायकांना जेवण वाढावे लागत असे.

मध्यंतरीच्या काळात जेवण फक्त सकाळी लग्नाच्यावेळी आणि रात्री स्वागत समारंभ आटोपल्यावर जवळच्या नातेवाईकांना दिले जाई व स्वागत समारंभात फक्त आईसक्रीम दिले जाई. फक्त आईसक्रीम खाऊन पोट भरत नसे; मग बरेचजण दोन तीन चार किंवा पाच प्लेट आईसक्रीम खात असत. मग आईसक्रीम हा मानाचा मानला जाऊ लागला. जेवणापेक्षा आइसक्रीमचा खर्च बराच जास्त होत असे. पण मानपान मानणारे मुलाकडचे लोक आईसक्रीमचा हट्ट धरत. 'तुमच्या मुलाच्या लग्नात हवे तर जेवण द्या, पण आम्हाला आमच्या मुलाच्या लग्नात आईसक्रीमच हवे' असे ते म्हणत.

काही काळ बाबू भटजींनी शिजवलेले जेवण ते वाढण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिले जाई. हे जेवण वाढणारे प्रभू पद्धतीच्या पदार्थांचे उच्चार त्यांना जमेल तसा करीत.

एका लग्नात घालवावरचे नेहमी धोतर, डगला, टोपी ह्या वेशात वावरणारे वयस्क गृहस्थ जेवत असताना, सांभारे वाढणारा मुलगा; 'सांबार, सांबार' म्हणत पंगतीत वाढत होता. त्या गृहस्थांना ते रुचले नाही, त्यांनी सांभारे असे जोरात म्हटले. असे दोन तीन वेळा झाल्यावर; तो वाढणारा मुलगा सांभारे असे म्हणू लागला! परंतु त्या गृहस्थाकडून पुढे गेल्यावर मात्र परत 'सांबार सांबार' असे म्हणू लागला. तसेच एका लग्नात पापड वाढणारा मुलगा 'पापा पापा' असा उच्चार करत होता. जेवायला बसलेल्या एका वयस्क गृहस्थाने त्याला 'पा प ड' असे म्हणायला लावले आणि 'तुझा कोणाला हवाय पापा?' असे पुटपुटले.

नंतरच्या काळात 'बुफे' म्हणजे जेवण स्वतः वाढून घेण्याची पद्धत सुरू झाली. आणि त्यानंतर आइसक्रीम देखील दिले जाई.

'केटरींग कॉन्ट्रॅक्ट' पद्धत सुरू झाली त्यावेळी असलेले रुपये बावीस ते पंचवीस प्रति प्लेट हे दर वाढत गेले आणि पाचशेचा पल्ला ओलांडून रुपये हजार ते पंधराशेच्या आसपास पोहोचले. निवृत्ती जवळ आलेल्या वा निवृत्त झालेल्या यजमानास हा खर्च नाइलाजास्तव स्वीकारावा लागतो. मुलांची लग्ने लावल्यावर निवृत्तीनंतर उरलेल्या पैशांत आयुष्य काढावे लागते.

एकेकाळी घरातून होणारे लग्न व मुंजी समारंभ आता हॉलमध्ये होऊ लागले. हॉलचे भाडेही बरेच वाढत गेले. त्यात डेकोरेटर्सच्या खर्चाची भर पडली. खुर्च्या टेबलपासून ते स्टेज डेकोरेशन व रोषणाईपर्यंत बराच खर्च होऊ लागला. पण हा सर्व खर्च निमूटपणे सहन करण्याशिवाय यजमानास पर्याय नसतो.

हे सारे असेच चालू रहाणार किंवा ह्यात काही बदल घडू शकतो का; ह्यावर विचार व्हायला हवा.

काही पाठारे प्रभु मंदिरात नैवेद्य व जेवण मंदिरातली पुजारी मंडळी करतात असे ऐकीवात आहे. ह्या मंडळींना जर लग्न समारंभाचे जेवण शिजवण्याची संधी दिली गेली तर जेवणावर होणारा खर्च बराच आटोक्यात येऊ शकतो. असे झाले तर कदाचित नजिकच्या काळात कोणी मोनिकाताई 'अहो अमित भटजी' म्हणून जोराने हाक मारताना दिसतील, आणि स्वच्छ सदरा घातलेले अमित भटजी, कानाला लावलेला मोबाईल बाजूला करत म्हणतील ''काय म्हणता'! आणि मोनिकाताई म्हणतील, 'अहो माझी बहीण सानिका हिच्या मुलीचे लग्न आहे पुढच्या महिन्यात, तेव्हा तुम्ही खारला त्यांच्या घरी कधी येऊ शकता?''

''येतो ह्या शनिवारी'', अमित भटजी म्हणतील.

हे असे झाले तर लग्न, मुंजी समारंभात जेवणावर होणारा खर्च बराच कमी होऊ शकतो; पण बाबू भटजींच्या जेवणाची चव पुन्हा येऊ शकेल का? की 'कालाय तस्मै नमः।' म्हणत बाबू भटजी आठवणीत जगवायचे? त्यांच्या हातचे परभी जेवणही आठवत रहायचे!

**WITH BEST COMPLIMENTS**
**FROM**

# Neelima & Pt. Sujan Rane

## WITH BEST COMPLIMENTS FROM

Anonymous

लेख

# MIND-FULL PARENTING

## Chapter 1: A Curios Mind

⁎ Mihika Navalkar ⁎

***"MILLIONS SAW THE APPLE FALL, BUT NEWTON ASKED WHY"*** is a famous quote by Bernard Baruch. And like most of the modern parents, I said to myself ' I will **answer all the QUESTIONS** my child asks'.

Not so soon, this urge to answer all her questions started seeing diminishing marginal utility! My LO (A millennial term for Little One) who is now 6 years of age, has always been a curious child and continues to be so and I feel proud about it. Also, it's because she makes me feel like ***I am her Google Assist!!***

Apart from the usual questions which children tend to ask, she one day came and asked me – Mom, why are numbers called numbers! And I sneakily asked Google, and all I got was an Oxford dictionary definition of what numbers are. Before I could answer this by making up an answer. I got bombarded with another - Why is teacher called a teacher? How do eyelids work? Why do you work? Why don't I work? Why does the earth work????? The 4G in my phone also couldn't match the speed with which these questions were coming.

And mind you, these questions can come to you firstly, **ANYTIME** (though most of it, is when you tell the LO its sleep time!), secondly, they can come **ANYWHERE** (the most favorite place is when you have switched on the shower and a little teeny voice waiting outside the bathroom asks "Mom can I ask you something?", and you know it's the end of your good times) and thirdly, they are also **WITHOUT ANY FILTERS** (Try taking them to friends/relative's house, and the LO has to ask at least one awkward question) =Øb

What amazes me, is that these questions are ***never directed to the other living being*** in the house who has equal contribution to get the LO in the world. As they say, good or bad the mother is always responsible to answer.

Having said that, I realized, no matter how many questions I get in a day, no matter how silly or even annoying it can be, it's very important to give a **LOGICAL ANSWER.** This logic need not be proven by any scientist in the world, but it should be good enough to make **the LO satisfied and convinced,** and which can gear up the LO up for another round of questions.

In previous generations, children were generally subdued and not encouraged to ask questions, as asking questions was thought be ill-mannered and rude. With changing times and evolving generations, parenting thought processes are also seeing a change. And its so important to be MINDFUL of it. It shouldn't be **"no more questions!** Or" **stop asking so many questions"** or **"just do as I say"** or even saying, **"google it".** It should be more of **"IT'S A VALID QUESTION, LET ME GET BACK TO YOU"** or **"LETS SEARCH FOR THE ANSWER TOGETHER"**

**Every child need not be Newton, but has to be given a fair opportunity, to want to be one.** To ask questions is an ability that all children have, and the responsibility to encourage this ability lies with **BOTH parents.**

Remember **MINDFUL PARENTING HACK 101:** ***Children can grow in to better beings, only if we evolve with them.***

⁎

**WISH YOU A HAPPY DIWALI**
**FROM**

**Mrs. Meenal and Hemant M. Jayakar**

**In memory of late Smt. Krishna Nalini Mhatre/Kirtikar**

**!! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!**

**श्री. गुंजारव विहंग नायक**

कथा

# मी- एक गोंधळेकर

* जयमती तळपदे *

आमच्या सर्व भावंडांत माझ्यासाठी स्पेशल विशेषण आहे, ते म्हणजे गोंधळेकर. कारणही तसेच आहे. माझ्या हातून तऱ्हेतऱ्हेचे गोंधळ होतात, पण मी ते लपवून ठेवत नाही. यांच्या हातून जसे काही घोटाळे होतच नाहीत. पण एकदा कानफाट्या नाव पडले ना, की संपले. हे लोक विसरतात, माझ्यामुळे यांची करमणूक होते. नाहीतर रोज रोज हसणार कुणाला? आणि घोटाळा काय सांगून होतो का? मी माझे काही किस्से सांगते. तुम्ही पण हसा. काही प्रॉब्लेम नाही.

एकदा मी आईकडे गेले होते. गर्मीचे दिवस आणि टळटळीत दुपारची वेळ. घसा अगदी कोरडा पडला होता. मी फ्रिज उघडला आणि पाण्याची बाटली तोंडाला लावली. तोंडात एकदम जळजळ झाली. 'आई गं,' तोंडातून शब्द आले. लगेच आधी साधे पाणी तोंडाला लावले. तेव्हढ्यात माझी आरडाओरड ऐकून वहिनी धावत आली. आणि माझ्या हातातली बाटली पहाताक्षणी ओरडली 'माई, त्यात व्हिनेगर आहे. प्यालात की काय?' आता मला सांगा व्हिनेगर काय कोण फ्रिजमध्ये ठेवतं? आम्ही नाही बाबा ठेवत. आणि आपण नाही का कसल्याकसल्या रिकाम्या बाटल्या दुसरंच काहीतरी भरायला वापरत? वाटलं मला पाणी असेल म्हणून. अर्थात खरं तर मी लेबल पाहिलंच नव्हतं. हसले आपले सगळे मला.

एका शनिवार रविवारी माझी पुतणी माझ्याकडे रहायला आली होती, खूप खोकत होती. मी म्हटलं, 'थांब तुला काढा देते.' आणि मी तिला चमचाभर काढा दिला. तिने तो गट्कन गिळला आणि म्हणाली, 'काकी, साबूसारखा लागतो.' अरे देवा! मला एकदम आठवले, त्या दिवशी मी आईकडे गेले होते. निघतांना मला बाबांनी त्यांनी घरी बनवलेला साबण एका छोट्या बाटलीत भरून दिला. म्हणाले, ''वापरून बघ.'' मला घरी पोहोचायला उशीर झाला म्हणून मी तो तसाच पिशवीतून काढून आमच्या ड्रेसिंग टेबलावर ठेवला आणि नंतर त्याबद्दल सर्व विसरून गेले. आता बघते तर काय, काढ्याच्या बाटलीत बाबांनी साबण दिला होता. पण पुतणी तेव्हढीच ग्रेट. म्हणाली, 'काकी, काही नाही. पोट साफ होईल.' मी आधी वडिलांना फोन केला. ते म्हणाले, 'घाबरू नकोस. त्यात काहीही घोटाला बाधणारे नाही.' हुश्श बाई! माझा जीव भांड्यात पडला. आणि काय चमत्कार, पुतणीचा खोकला एकदम गायब झाला. अर्थात म्हणून हा प्रयोग मी नंतर कुणावर केला नाही हं. आता सांगा हं यात माझा काय दोष? असा घोटाळा कुणाचाही होऊ शकतो की नाही?

माझ्या पुतणीचे लग्न ठरले. मुहूर्त अकरा चाळीसचा होता. पण जाऊ म्हणाली, ''नऊपर्यंत ये हॉलवर.'' मी आणि माझी सून सकाळी नऊ वाजता घाईघाईने नऊवारी साडी नेसून नट्टापट्टा करून निघालो. हे आणि मुलगा आधीच गेले होते. आम्ही जी. ए. कुलकर्णी हॉलवर पोहोचलो तर सामसूम. मी म्हटले, अरे व्वा, आज आपण बरेच लवकर आलो . पण पायऱ्या चढायला गेलो तर वॉचमन आला आणि म्हणाला, 'कुठे जायचे आहे?' म्हटले, 'अरे आमच्याकडचे लग्न आहे आज.' तर म्हणायला लागला, 'आज इथे

संध्याकाळी रिसेप्शन आहे. आता काही नाही.' मग जरा विचार केल्यावर मला आठवले, लग्न ज्ञातीच्या हॉलमध्ये आहे. आदल्या दिवशी हळदमेहूण मुहूर्त आणखी एका वेगळ्याच हॉलमध्ये झाले होते. सारखं एकामागून एका लग्नाला जात असल्यामुळे माझा गोंधळ झाला होता. माझ्या आईने मला लगेच नवीन बिरूद लावलं, 'भंगड आहे नुसती.'

खूप वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. आम्ही तेव्हा मालाडला रहात होतो. तेव्हा मी नोकरी करत होते. त्याकाळी गुरुवारी टी.व्ही.वर छायागीत नावाचा हिंदी चित्रपटगीतांचा कार्यक्रम सादर होत असे. तो नऊ वाजता चालू होई. त्यावेळी आमच्याकडे टीव्ही. नव्हता. त्यामुळे आम्ही लवकर जेवणं

*हास्यचित्र*




आटपून शेजारी 'ह्यां'च्या काकांकडे जात असू. खरंतर तो एकच कार्यक्रम मी आवडीने बघत असे. एकदा आम्ही तो कार्यक्रम बघत असतांना कुणाला तरी मी आमच्या दारात उभं असलेलं पाहिलं आणि माझ्या पायाखालची जमीनच सरकली. झालं होतं काय, माझा आतेभाऊ तेव्हा दर पंधरा दिवसांनी गुरुवारी मालाडला डॉक्टरकडे येत असे. तिथे त्याला रात्री उशीर होत असे. मी एकदा त्याला म्हटले, पुढच्या वेळी गुरुवारी मालाडला डॉक्टरकडे येशील तेव्हा माझ्याकडे जेवायला ये. आता त्यानंतर आमचे काही बोलणेच झाले नव्हते आणि तो येणार हे मी साफ विसरूनच गेले होते. मग काय धावाधाव. पटापट कुकर लावला, चपात्या केल्या आणि दुसऱ्या दिवसासाठी कापलेली भाजी होती ती बनवून वाढली. माझा झालेला गोंधळ भावाच्या लक्षात आला. पण त्याने व वहिनीने समजून घेतले. मनात राग ठेवला नाही. नंतर कधीही मी कुणालाही जेवायला बोलावले की माझी सर्व वात्रट भावंडं, वहिन्या ,भाचरंडं मंडळी तो प्रसंग उगाळतात आणि खोखो हसून घेतात. ही माझ्या गुणदोषांसकट मला आपलं म्हणणारी माणसंच माझ्या आयुष्याची ठेव आहेत. त्यांना माहिती आहे, 'लाख चुका असतील केल्या, करते पण प्रिती'. म्हणून त्यांनी माझी मस्करी केली ना तरी मला राग येत नाही. पण त्यानंतर मात्र मी कुणालाही जेवायला बोलावले की कधीच विसरले नाही. चांगली अद्दल घडली ना!

पण गंमत म्हणजे माझ्या चाळीस वर्षांच्या नोकरीच्या काळात ऑफिसमध्ये माझ्या हातून कुठलाही गोंधळ झाला नाही. उलट गोंधळ निस्तरायला मला पाठवले जायचे. मला वाटतं तो कसर मेंदू घरात भरून काढत असावा. खरंतर असं काहीतरी प्रत्येकाच्या आयुष्यात घडत असणार हं, पण कुणी सांगत नाही आणि मला मात्र हसतात. असो, माझे किस्से वाचून तुमच्या चेहऱ्यावर एखादी जरी स्मितरेषा उमटली असेल तर माझे सर्व गोंधळ स्वत:ला धन्य मानतील. पण सेकंड सर्व्हींग मिळणार नाही बरं!!

*

लेख

# How did I get so lucky?

**⁎ Monica Rane Iyer ⁎**

To be honest, I had not imagined in my wildest dreams that I would be so steeply involved in Prabhu Tarun's activities within this short span of time. My father Pt. Sujan Rane has of course been associated with Prabhu Tarun since the time of its esteemed editor Mr. Suhas Kothare, as they were close friends. I on the other hand was happily going on with life here in the US, keeping myself busy with work, family and local social activities.

Back in 2014, With Soumitra Velkar's encouragement, I got involved in Pathare Prabhu Foodies Facebook group and have been co-managing it for the past 7 years.There started the journey of my Pathare Prabhu lineage rediscovery. What followed was a rich education in Pathare Prabhu history, rituals, traditions, recipes, and much more. Along the way I started making new Pathare Prabhu friends and some of us have gotten very close over the years.

Now read this and see how the fates worked. I have known Sanjana Kothare through friends and relations, but we have never really met personally or spent time together. Then what was it that made her just call me one day last year? Why did she want to explain to me about this PRABHU TARUN digital team, upcoming online events, and the planned website re-launch? She can answer these questions best, but for me it was God sent. That phone call was the beginning of me getting involved, attending planning meetings and getting to know the other active Prabhu Tarun team members. A wonderful new beginning, deep in the middle of a dreadful pandemic and lockdown.

Then came that fateful evening one day before the first online Karaoke event. The lady who was going to anchor the event, sadly lost a family member and was not going to be able to emcee. Our full digital team hit the panic button. An immediate Zoom meeting followed. Seeing so many worried faces, I offered to take her place without really thinking about what I'm getting into.With a few hours left, I went through the notes prepared by the original emcee, went through the performance line up and at 6.00 am in the morning, with makeup on my face and butterflies in my stomach, I went live. What followed later, the tremendous love and response that I received from everyone known and unknown to me, is something I had not imagined in my wildest dreams.To date, memories of that first event, warms my heart and will be something I will cherish forever.

Over the years I have been very active in our local Indian Association here in California. Today, I'm honored to be the President of this association. What Sanjana did however, was open up a new world to me. A world in which within a matter of months, I have found great friends from across the seas.

My friend Sanjana is a mad hatter! Always excited and enthusiastic. Without her, our ship would never sail. Her drive and passion for Prabhu Tarun is very infectious and I salute her for 'never say never' attitude.

My friend Moya is the lady with a sensible head on her shoulders.Her thoughts and words are always crystal clear. Logic is her middle name!

My friends Sunil & Dnyanada are my tremendous support before, during and after each event. I know they always have my back. Their hardwork and dedication is what helps me look good.

कविता

## School throughout the week

The cycle keeps going again and again,
Soon after, for your freedom you'll bargain!

Going to school on Mondays,
In bed you always want to stay.

On Tuesday you'll start to fit.
But on reaching school you won't like it a bit.

Wednesday brings upon a brand new day,
with whole new opportunities on the tray.

On Thursday you will have a normal time,
and go home when the bell starts to chime.

On Saturday somewhere happiness will lurk,
Then again, there's a pile of homework!

Sunday brings a mood at its best,
The next day being the real test.

The cycle keeps going again and again,
Soon after, for your freedom you'll bargain!

**-Vihaan Kothare**

---

My friends Anu and Akshay Kothare are the kind ones. Encouraging me, supporting me, appreciating me at every turn and nothing can beat their sense of humor when we need it most!

My friends Sagar and Shivani Deorukhar are the super talented ones. From them I learnt how music can be used to unite people digitally, no matter where we are. Mimicking their efforts, I have managed to start a Music Club over here too.

My friend Janhavi is the ever helpful one. Quiet but totally dependable. Janu takes on anything we ask her to without any issues.

My friend Mihika is the 'mature beyond her years' one. Kind, helpful, talented and beautiful Sushmita.

I am touched by their love. They included me in the 'team' with open arms. They have trusted me to help make decisions about PT activities, plan events & of course anchor them. They have showered me with their praises. AND amazingly , we have never met each other in person yet! Our friendship and camaraderie has grown while 'Zooming' & 'Whatsapping'.So my dear 'digital' pals, I am eagerly awaiting the opportunity to meet you all and your families someday soon. I must mention that I appreciate the support & trust put in me by the trustees as well. Tumche anek aabhaar.

What did I do to deserve this new and wonderful facet to my life? Whatever is the reason, I am hooked. It has given me a new energy, a new sense of pride, a new drive to do something for our Pathare Prabhu community. Let me not look for reasons.

**Let me just say that - HE works in a mysterious way & I am forever blessed.**

*

लेख

# शंकरपाळी

*** आरती जयेश कोठारे ***

भारतीय सणावारांची एक खास गोष्ट म्हणजे प्रत्येक सणाचं आपापलं असं एक खास वैशिष्ट्य असतं. हे वैशिष्ट्य ते कोणत्या महिन्यात, कोणत्या वातावरणात साजरे होतात त्यावरही अवलंबून असतं! अशीच एक गमतीशीर गोष्ट म्हणजे प्रत्येक सणाशी निगडीत असे काही खास आणि चविष्ट खाद्यप्रकारही असतात. आता हेच बघा ना... गणपती म्हटलं की उकडीचे मोदक हे आलेच! होळी म्हणजे पुरणपोळी आणि थंडाई. संक्रांत म्हणजे तिळगुळ, नारळी पौर्णिमेला नारळी भात किंवा निदान नारळीपाक तरी हवाच! सण आणि त्या सर्वांशी निगडित खाद्यप्रकार अशा या समीकरणात दिवाळी ही नेहमीच इतर सणांपेक्षा वरचढ ठरली आहे! एक नाही, दोन नाही तर अनेक खाद्यपदार्थ हे दिवाळीचे प्रतीक बनले आहेत. या दिवाळीच्या खाद्यपदार्थांपैकी - म्हणजेच फराळापैकी- एक सर्वाधिक लोकप्रिय आणि हमखास बनवला जाणारा, चवीने खाल्ला जाणारा प्रकार म्हणजे आपल्या शंकरपाळ्या.

पण तुम्हाला माहिती आहे का, अनेक वर्षांपूर्वी मराठी भाषेत शंकरपाळी असा कुठला शब्दच मुळी नव्हता! मात्र प्राचीन लिखितांमध्ये 'साखर पारा' असा उल्लेख आढळून येतो असे जाणकारांचे मत आहे. इतर भारतीय भाषांमध्ये शक्कर पारा, शकेर पारा किंवा शकर् पारा हे शब्द आजही मराठीतल्या शंकरपाळीसाठी समानार्थी मानले जातात. या माहितीवरून मराठीतल्या साखर पाऱ्याचा अपभ्रंश होऊन शंकरपाळी असा शब्द पडला असावा असे वाटते. या सर्व शब्दांवरून असेही निदर्शनास येते की शंकरपाळी हा पदार्थ साखरेशी संबंधित असल्यामुळे मूळचा गोड चवीचा असायला हवा. खाऱ्या शंकरपाळ्या, तिखट शंकरपाळ्या, मिरी किंवा जिरे घातलेल्या शंकरपाळ्या या बदलत्या काळाप्रमाणे आणि लोकांच्या चवीप्रमाणे निर्माण झालेले प्रकार आहेत. बऱ्याच लोकांचा असा समज असतो - जो आत्तापर्यंत माझाही होता - की शंकरपाळी या पदार्थाचा संबंध भगवान शंकराशी आहे. परंतु आजवर झालेल्या अभ्यासात वा संशोधनात हा संबंध सिद्ध करणारा ठोस पुरावा अद्याप मिळालेला नाही. आजकाल गव्हाच्या शंकरपाळ्या, चॉकलेट शंकरपाळ्या, चाट शंकरपाळ्या, स्पायरल शंकरपाळ्या, शाही शंकरपाळ्या असे अनेक प्रकार बाजारात उपलब्ध आहेत. साधी गोड शंकरपाळी दूध/पाणी, रवा, मैदा, साखर, तूप/तेल/मस्का वापरून तयार केली जाते. फक्त महाराष्ट्रातच नाही; गुजरात आणि कर्नाटकमध्येही हा पदार्थ आवडीने खाल्ला जातो.

आधी म्हटल्याप्रमाणे हल्ली बऱ्याच वेगवेगळ्या प्रकारच्या शंकरपाळ्या बनवल्या जातात. दिवाळी-निमित्त मला तुम्हा सर्वांशी दोन आगळ्यावेगळ्या शंकरपाळ्यांच्या रेसिपीज शेअर करायला आवडतील. या रेसिपीज नक्की ट्राय करून बघा.

**बीटरूट शंकरपाळी**

साहित्य:

१ कपगव्हाचे पीठ
१ कप मैदा
पाव कप तूप
पाव कप बीटरूट प्युरी
१ छोटा चमचा कलोंजी

पीठ मळण्याकरिता थोडंसं पाणी

चवीनुसार मीठ

तळण्याकरिता तेल

कृती:

सर्वप्रथम एका भांड्यात गव्हाचे पीठ, मैदा, कलोंजी व मीठ घालून एकत्र करावे. त्यात तूप व बीटरूट प्युरी घालावी आणि थोडंसं पाणी घालून हे सर्व मिश्रण छान मळून घ्यावे व १० मिनिटांसाठी बाजूला ठेवून द्यावे. १० मिनिटांनी हे मिश्रण पुन्हा मळून त्यालाच पातीसारखं लाटून घ्यावे. या लाटलेल्या पोळीचे चौकोनी किंवा डायमंड आकाराचे तुकडे सुरीने/कातरण्याने कापून घ्यावेत. हे तुकडे तेलात मंद ते मध्यम आचेवर छानपैकी तळून घ्यावेत. हे तुकडे टिशू पेपर किंवा चाळणीवर काढावेत जेणेकरून त्यातले जास्तीचे तेल निघून जाऊन आपल्या शंकरपाळ्या तेलकट न होता छान खुसखुशीत होतील.

### शेजवान शंकरपाळी

साहित्य:

अर्धा कप मैदा

२ मोठे चमचे गव्हाचे पीठ

१ छोटा चमचा बारीक रवा

पीठ मळण्याकरिता थोडंसं पाणी

चवीनुसार मीठ

१ चिमूट काळी मिरी पूड

२ छोटे चमचे तूप/तेल

३-४ छोटे चमचे शेजवान सॉस

१ छोटा चमचा रेड चिली सॉस

१ छोटा चमचा सोया सॉस

तळण्याकरिता तेल

कृती:


सर्वप्रथम एका भांड्यात मैदा, गव्हाचे पीठ, बारीक रवा, मीठ, काळी मिरी पूड, तीनही प्रकारचे सॉसेस व तूप/ तेल घालून हे मिश्रण एकत्र करून घ्यावे. त्यात थोडंसं पाणी घालून हे मिश्रण छान मळून घ्यावे. हे मिश्रण १० मिनिटांसाठी बाजूला ठेवायची गरज नसते. तरी आपण आपल्या सोयीनुसार ठेवायचे की नाही याचा निर्णय घेऊ शकता. पुढील कृती ही बीटरूट शंकरपाळी प्रमाणेच...

टीप:आपल्या खाण्याच्या सवयीनुसार किंवा चवीनुसार वरील दिलेल्या ३ सॉसेसचे प्रमाण कमी-जास्त करू शकता.

काय? सुटलं की नाही तोंडाला पाणी? हे दोन तर फक्त खायच्या शंकरपाळ्यांचे प्रकार झाले. पण गंमत म्हणजे शंकरपाळ्या आता फक्त पाककलेपुरत्या सीमित न राहता एका वेगळ्या क्षेत्रातही उतरल्याआहेत! कोणत्या? चला जाणून घेऊया...

मराठी साहित्यक्षेत्रात शंकरपाळी (शब्द शंकरपाळी) हा काव्यप्रकार अगदी नवखा आहे. ६ नोव्हेंबर २०२० रोजी कवी भूषण तांबे यांनी दिवाळीनिमित्त या काव्यप्रकाराची निर्मिती करत पुढे या काव्यप्रकाराची अनेक संमेलनंसुद्धा घेतली. हा काव्यप्रकार दिसायला अगदी साधासोपा परंतु नियमात बांधलेला. याचा सर्वात मुख्य नियम म्हणजे नावाप्रमाणेच या कवितेचा आकार हा शंकरपाळीसारखा असावा. खरं सांगायचं तर हिचा आकार काजुकतलीच्या जास्त जवळ जाणारा आहे. परंतु हिला आधीपासूनच शंकरपाळी म्हणून प्रसिद्ध केले गेले आहे. म्हणून ही शंकरपाळी! या कवितेला ११ ओळी असतात. २-३-४, ५-६, ७-८-९ असे ओळींचे गट अर्थपूर्ण असायला हवेत. सहावी ओळ ही कवितेच्या मध्ये असते, तर चौथी, सहावी आणि आठवी ओळ यांचे यमक जुळले पाहिजे! प्रत्येक ओळीनुसार अक्षर संख्या बदलत जाते. पहिल्या ओळीत १ अक्षर, दुसऱ्या ओळीत २...सहाव्या ओळीत ६. मग पुन्हा उतरता क्रम... सातव्या ओळीत ५, आठव्या ओळीत ४.... आणि शेवटी अकराव्या ओळीत पुन्हा १. ही काव्यं बरेचदा हलकीफुलकी किंवा कोड्यासारखी असतात. गमतीशीर अशा या काव्यप्रकारात गेयता साधणं हेही महत्त्वाचं ठरतं.

मी खास दिवाळीची भेट म्हणून तुम्हा रसिकां-साठी पहिल्यांदाच काही शंकरपाळ्या बनवण्याचा प्रयत्न केला आहे. त्या अगदी खुसखुशीत आणि खमंग झाल्या असतीलच असं नाही. परंतु माझी ही छोटीशी भेट तुम्हाला आवडेल अशी आशा आहे. (पुढील पानावर आहेत बरं का त्या.)



ही
सांज
केशरी
मुग्ध सरे
झुळूक एक
मज ही स्पर्शिते
आज मी गाते
वाऱ्याचे हे
मोहक
गाणे
गं

ही
वेळ
अशीच
राहू दे ना
वाऱ्यावरती
हवा बहरू दे ना
नयनी तुझ्या
पाहू दे ना
ते स्वप्न
माझे
रे

ही
आली
दिवाळी
आनंदाची
सजली माळ
ही बघा दिव्यांची
तोरणे आणि
रांगोळीही
सजली
दारी
हो

ती
कोर
चंद्राची
छान कशी
नभीची बघा
महाराणी जशी
उंच शिखरी
बैसे कशी
आसनी
बाई
गं

हा
सण
घेऊन
येतो सारे
चिवडा, बर्फी
नि शंकरपाळे
काजू कतली
लाडू, पेढे
चकली
खाऊ
हो

Happy
Diwali



!! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!

**सौ. नीलन व श्री. दीपक माधव धैर्यवान**

!! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!

**श्री. बन्सीधर सदाशिव धुरंधर**

बालकथा

# चिनूमुंगी

* हेमंत विनायकराव तळपदे *

झुंजूमुंजू झालं अन् चिनूने डोळे उघडले. त्या वारुळात असंख्य मुंग्यांबरोबर चिनू मुंगीही शांत झोपली होती. पण सकाळ होताच तिचा दिनक्रम सुरू झाला. सर्वप्रथम तिने त्या वारुळातच फेरफटका मारला. एका विशाल आंब्याच्या झाडाच्या पायथ्याशी तिचे वारुळ सर्व सवंगड्यांनी भरपूर मेहनत घेऊन बांधले होते. बाहेरच्या जगाशी त्या वारुळाचा प्रत्यक्ष संबंध तसा नव्हता. इतरांना ते वारुळ म्हणजे आंब्याच्या बुंध्याशी पडलेले एक भोकच वाटत होते. पण त्या वारुळाच्या अंतर्भागात एक सुंदर स्थापत्य होते. कामगार मुंग्या रहाण्यासाठी वेगळे चेंबर होते. तर सैनिक मुंग्या रहाण्यासाठी वारुळाच्या प्रवेशद्वाराजवळ वेगळा कप्पा होता. चिनू मुंगीला नेहमीच त्या सैनिक मुंग्यांचा हेवा वाटे. त्यांची भारदस्त देहयष्टी तिला नेहमीच आवडे व त्यांच्या चालण्याचा रुबाब पाहून ती नेहमी हरखून जाई. वारूळाबाहेर जमिनीवर चिनूसारख्या कामगार मुंग्या धावतपळत कामावर निघत तेव्हा त्या सैनिक मुंग्या त्यांच्या त्या रांगेच्या बाजूला फिरत रहात. एखादे संकट त्यांना जाणवले तर नांगी उगारून त्या कामगार मुंग्यांच्या रक्षणासाठी त्या तत्पर असत. तसे पाहता वारुळातला दाणागोटा जमा करण्याची जबाबदारी चिनूसारख्या कामगार मुंग्यांची असे. या सैनिक मुंग्या सहसा दाणागोटा जमविण्याच्या फंदात पडत नसत.

त्या वारुळात आणखीन काही कप्पे होते. एका कप्प्यात तर बऱ्याचशा मुंगी गाई रहात असत. त्या गाईंचा रंग चिनूसारखा काळा नसे. तर त्या थोड्याशा पिंगट रंगाच्या असत. त्यांना छोटेसे पंखही असत. या गाई दिवसभर चरण्याशिवाय काहीही करत नसत. पण या वारुळातल्या मुंगी समुदायाला त्या त्यांच्या पार्श्वभागातून दुधासारखा चिकट पदार्थ पुरवत असत. सर्व वारुळमुंग्या तो पदार्थ चाखत असत व नंतर थोडीफार न्याहरी करून आपापल्या उद्योगाला लागत असत.

आता मात्र चिनू मुंगीने भरपेट नास्ता केला होता. सकाळी सकाळी तुतीच्या पानांवर आलेली बुरशी तिने खाल्ली. नास्त्यामध्ये झुरळ तंगडी व मधमाशीचे थोडे मांसही खाल्ले व नंतर मुंगीगाईचे दूध चाटून ती वारुळाबाहेर आली. पहाते तो काय; वारुळाबाहेर असंख्य मुंग्या एका रांगेत कोठेतरी लगबगीने धावत होत्या. या कामगार मुंग्यांच्या नशिबी विनाकारण फेरफटका मारणे, जंगलातील निसर्ग सौंदर्याचा आस्वाद घेणे इत्यादी मनोरंजनाची ठिकाणे बाध्य होती. दिवसभर काबाडकष्ट करा; जमेल तितक्या खाद्याची साठवण करा, शिपाई मुंग्यांचा दम खा. इतकेच त्यांचे जीवन होते. सर्वसाधारणपणे सकाळी सूर्योदयापासून ते सूर्यास्तापर्यंत या कामकरी मुंग्यांचे काम चाले. कधीकधी एखादा कीटक वा खाण्याचा पदार्थ रात्री सापडला की या कामगार मुंग्या रात्रीच्या अंधारातही काम करत.

चिनू मंगीच्या वारुळाचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांची राणी मुंगी. ही राणी मुंगी या मुंग्यांच्या वारुळाचे मुख्य केंद्र होते. तिचे मुख्य काम म्हणजे प्रजोत्पादन. पण त्यामुळेच की काय; या वारुळात तिची अतिशय

काळजी घेण्यात येई. तिचे वारुळातील चेंबर थोडे मोठेच होते. त्याची साफसफाई करण्यास खास मुंगीसेविका असत. त्या राणीमुंगीला सतत खाद्य पुरवत. इतकेच काय; या राणीमुंगीने अंडी घातली की या मुंगीसेविका ती अंडी काळजीपूर्वक दुसऱ्या चेंबरमध्ये नेत. व त्यावर नीट देखरेख ठेवून त्या अंड्यातून नवीन मुंगीबाळ येईपर्यंत सर्व शुश्रुषाही करत. या मुंगी वारुळाचे वैशिष्ट्य म्हणजे यातील सर्व मुंग्या दिवसभर कोणते ना कोणते काम करण्यात मग्न असत. पण या श्रमिक मुंग्यांच्या वारुळात काही आगंतुक कीटक मात्र आरामात फुकट रहात. ते या वारुळाचे जणूकाही घरजावईच होते. त्यांना कोणतीही मुंगी काम करण्यास सांगत नसे. ते मस्तपैकी या मुंग्यांनी जमविलेल्या खाद्यावर निवांतपणे ताव मारत. चिनू मंगीला या फुकट्या पाहुण्यांचा राग होता पण सरतेशेवटी तिचा नाईलाज होता.

त्या दिवशी सकाळी मात्र चिनूमुंगीला एका कठीण प्रसंगाला सामोरे जावे लागले. तिच्या वारुळातल्या काही मुंग्यांनी एका मोठ्या माशीला जखमी अवस्थेत पकडले होते व त्या चहुबाजूने तिला ठार मारण्यासाठी तिच्यावर आक्रमण करत होत्या. चिनू मुंगीने ते पाहिले व ती देखील त्या माशीच्या दिशेने पुढे सरसावली. पण ती माशी सहजासहजी हार मानण्यास तयार नव्हती. आपल्या जखमी पंखांची फडफड करत तिने अनेक मुंग्यांना जायबंदी केले तर आपल्या सोंडेने तिने काही मुंग्यांना डसले. नियमाप्रमाणे या कामकरी मुंग्यांनी त्या जखमी मुंग्यांना आपल्या सोंडेत उचलले व वारुळातल्या चिकित्सालयात भरती केले. तिथे उपस्थित मुंगी परिचारिकांनी त्यांच्यावर वारुळी उपचार सुरुदेखील केले. पण सरतेशेवटी या सर्व कामकरी मुंग्यांनी त्या माशीवर जय मिळवला. त्यात काही पहारेकरी सैनिक मुंग्या त्या माशीच्या शरीराला जोरात डसल्या. शेवटी तिने अगतिकपणे जीव सोडला. मग या कामकरी मुंग्यांनी चहुबाजूंना त्या माशीच्या देहाचे परीक्षण, निरीक्षण केले व एकमेकींना साथ देऊन त्या माशीचा अजस्त्र देह हळूहळू ढकलत ओढत वारुळास पोहोचवला. या कामात आपली चिनू मुंगीही व्यस्त होती. शेवटी आपण एक मोठे कार्य सफल केले या आनंदात चिनू मुंगी मनोमनी सुखावली.

पण तिचा आनंद फार काळ टिकला नाही. कारण तिच्या वारुळातील काही संदेशवाहक मुंग्यांनी बातमी आणली की वारुळाजवळ असलेल्या दुसऱ्या झाडाच्या बुंध्याशी काही लाल मुंग्यांनी आपल्या काळ्या सवंगड्यांवर जोरदार हल्ला चढवला आहे. या लाल मुंग्या आकाराने लहान असल्या तरी त्यांचा दंश विषारी असे. या काळ्या मुंग्या ह्या लाल मुंग्यापेक्षा अधिक चपळ होत्या. त्यामुळे सहसा या काळ्या मुंग्या त्या मुंग्यांच्या तावडीत सापडत नसत. आता मात्र युद्ध सुरू झाले होते. ताबडतोब राणी मुंगीने आज्ञा केली आणि मोठमोठ्या पहारेकरी मुंग्या या लाल मुंग्यांना पळविण्यासाठी बाहेर पडल्या. सरतेशेवटी काही काळ्या मुंग्या तर; काही लाल मुंग्या यमसदनास गेल्या. तर अनेक मुंग्या या युद्धात जखमी झाल्या. मेलेल्या काळ्या मुंग्यांची कलेवरे कामकरी मुंग्यांनी वारुळात आणली व एका चेंबरमध्ये त्यांच्यावर माती पसरवून दफन करण्यात आली.

या सर्व गदारोळात आपल्या चिनू मुंगीने एक गोष्ट जाणली होती की असल्या या छोट्याशा जीव कालखंडात चांगले जगायचे असेल तर मेहनतीला पर्याय नाही. दिवसभर काम करायचे व अंधार पडल्यावर झोपी जायचे. तसेच एकजुटीचे महत्त्व तिला चांगलेच समजले होते. तसेच या मुंगी वारुळाचे अनुशासन तिने चांगलेच जाणले होते. वडिलधाऱ्यांचा मान कसा राखावा हे राणी मुंगीच्या सेविकांच्या वर्तनाने तिला कळले होते. इतकेच नव्हे तर आजारी व जखमी मुंग्यांची शुश्रुषा मुंगी सेविका कशी करतात यावरून तिला सेवावृत्तीचे ज्ञान उमगले होते.

एकूणच काय; तिच्या या इवल्याशा मुंगी जगतात आमची चिनू मुंगी पूर्णपणे समरस झाली होती. ही देवाची एक अपूर्व किमयाच होती.

मोबाईल : ९८२१६०७५९३

# लहानपण राहू दे देवा...!

* अदिती दिनार अंजली तळपदे *

कधी कधी आयुष्यातील काही लहानसहान क्षण ही आपल्याला खूप काही शिकवून जातात. असाच एक प्रसंग ह्या लेखातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. तर, घडले असे की, एके दिवशी माझ्या मावस बहिणीचा फोन आला होता. कॉलवर गप्पागोष्टी करताना तिने एक गमतीशीर प्रसंग सांगितला, एक अत्यंत 'लहान' तरीही हृदयस्पर्शी प्रसंग, ज्याचा माझ्या मते अत्यंत खोलवर अर्थ आहे. तो प्रसंग असा होता की, त्यांच्या परिसरात असलेला एक वृक्ष, ते म्हणजे सागवानचे झाड. त्या झाडाची, काही अधिकृत व्यक्तींच्या हस्ते झाडे तोडण्याची प्रक्रिया सुरू होती आणि त्याबद्दलची चर्चा माझ्या बहिणीच्या घरी घडत होती. जी माझ्या १० वर्षांच्या भाबड्या भाचीच्या कानावर पडली व तिची त्यात उत्सुकता वाढली आणि तिला ते कोणते झाड तोडत आहेत हे कुतूहलाने जाणून घेण्याची इच्छा झाली.

कापले जाणारे झाड आंब्याचे नसेल ना?, ही चिंता तिला सतावत होती. जेव्हा ते कापले जाणारे झाड सागवानचे असल्याचे तिला कळले, तेव्हा ती निवांत झाली आणि तिच्या अभ्यासाला लागली .या संपूर्ण घटनेने नकळत एक महत्त्वाचा पैलू माझ्या समोर आणला. तो म्हणजे, माणूस म्हणून आपल्या आयुष्यात असलेल्या महत्त्वाच्या गोष्टींची व्याख्या वयोमानाप्रमाणे बदलत कशी जाते. माझ्या भाचीसाठी, येथे 'आंब्याचे' झाड, 'सागवान' च्या झाडापेक्षा अधिक मौल्यवान होते. आपल्याला माहीतच आहे की सागवानाच्या झाडाला फर्निचर उद्योगात, व्यावसायिकरित्या भरपूर किंमत व मागणी आहे. मुलांचे मन, प्रकृतीशी निघडीत असलेल्या अशा भौतिक लाभांपासून अनभिज्ञ असते. लहानपणी, अगदी छोट्याछोट्या गोष्टींमधून मिळणारा आनंद त्यांना जास्त मौल्यवान असतो.

आंबा हा अगदी मनसोक्तपणे आस्वाद घेत आणि अत्यंत तृप्त होईपर्यंत खाताना जो आनंद मिळतो, आणि त्यातून जे समाधान मिळते, ते अगदी सहजपणे एखाद्या लहान मुलाच्या चेहऱ्यावर द्विगुणीत हास्य देऊन जातं. लहान मुलांचे लक्ष त्या विशिष्ट झाड, फळ किंवा वनस्पतीचे व्यावसायिक मूल्य काय असू शकते याकडे नसून अगदी नैसर्गिकरित्या मिळणाऱ्या त्या वस्तूचा आस्वाद घेण्यात असते .

मुलांना, ह्या प्रकृतीने दिलेल्या गोष्टींची व्यावसायिकरित्या जी किंमत असते, ह्या भौतिक मूल्यांकनात नक्कीच रस नसतो. ते फक्त सध्याच्या क्षणाबद्दल विचार करत असतात आणि तो क्षण अगदी मनसोक्त कसा जगता येईल ह्या धुंदीत असतात. प्रकृतीने देऊ केलेली फळे, फुले इत्यादी सर्वांचा लाभ घेत असताना, त्यांना हानी पोहोचवण्याची नेहमीच गरज नसते की हो. उलट त्यांचे पालनपोषण करून, आणखी वृक्षावरोपण करून प्रकृतीला आपण आणखी देऊ शकणार नाही का..?

पण 'मनुष्य'रुपी प्राणी मात्र या देण्याबद्दल जागरूकता बाळगण्यात नेहमीच कमी पडतो. तो त्याचा मूळ उपयोग करण्याचा निर्णय घेतो. कागद, लाकूड इत्यादीसाठी, प्रकृतीतील घटक अगदी ओरबाडून घेतल्यागत शोषण करतो. हे अगदीच खरं आहे की काही प्रमाणात मानवाला ह्या संसाधनांची आवश्यकता आहे परंतु वापर कमी प्रमाणात केला

पाहिजे किंबहुना आणखी वृक्षावरोपण किंवा इतर प्रकल्पातून, प्रकृतीस परतफेड ही केली पाहिजे.

मुद्दा येथे असा आहे, की ह्यामागे असणारे मूळ कारण म्हणजे वाढती भूक आणि वाढत्या गरजा. समाधानी राहणं जर मनुष्य शिकला तर खूप गोष्टी अगदी सहज सोप्या होतात. आणि हे समाधान स्वत:मध्ये कसं जिवंत ठेवायचं हे एखाद्या लहान मुलाकडून नक्कीच शिकता येतं व आपल्यातील लहान मुलालाही जपता येतं. जर मनुष्याने आपल्यातील मुलाला जिवंत ठेवले तर या भौतिक लोभाला थांबवण्याची पातळ रेषा चिन्हांकित केली जाऊ शकते. होय आपल्या आतील मूल समाधान व सहानुभूतीचे स्रोत आहे आणि जीवनातील अगदी छोट्या क्षणांचा म्हणजे म्हणतात ना "simple joys of life" ह्यांचा आनंद घ्यायलाही तेच मूल आपल्याला शिकवतं.

ही वरील घटना, अगदी लहान असू शकते परंतु जर आपण मोठे झालो आणि आपल्यातील मुलाला स्वत:मध्ये जिवंत ठेवण्याचा सर्वांनी प्रयत्न केला तर आपल्यातील माणुसकीही जिवंत ठेऊ शकू. ही निरागस भावना जर सर्वांनी जपली तर ती आपल्याला अगदी प्रत्येक दैनंदिन दिनचर्येत आनंदाचा आस्वाद घ्यायला शिकवते व समाधानी राहायला प्रेरीत करते व आपल्या वर्तमानासाठी कृतज्ञ रहायला शिकवते. त्याबरोबरच आपल्या आजूबाजूला असलेल्या प्रकृतीचेही शक्य तितक्या रीतीने संगोपन करायची जाणीव जीवंत ठेवते आणि शेवटचे पण महत्त्वाचे, आपले लहानपण अगदी आयुष्यभर जगायला मिळते.

'जया अंगी मोठेपण, तया यातना कठीण, तुका म्हणे बरवे जाण, व्हावे लहानाहून लहान'!

संत तुकारामांच्या भजनातील ह्या ओळी खरंच किती योग्य आहेत, म्हणूनच देवाला एकच प्रार्थना 'लहानपण राहूदे देवा..!'

*


!!प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा!!



**प्रतिमा व विनोद प्रधान**

**आणि**

**ऐशाना, आलोक व आतिष प्रधान**

# How to Fail??!!

∗ Ashish Kirtikar ∗

Somewhere back in 2011-12 I worked with my team on a huge Request for Proposal (RFP). This RFP had 4 to 5 of us working for weeks together compiling lots of data sheets in a nice presentable format and the end product seemed so promising that I had thought we were going to definitely win that contract. But, unfortunately, a week post submission of the RFP response I got to know from my boss that we had lost the deal as we had been undercut on the pricing with some unrealistic pricing by another company. Me being new to this process and having the impatience of youth was very saddened and frustrated to have lost the contract after all the effort we had put in. That is when my boss, a visionary himself, Mr. Suresh Dadlani taught me a thing which may seem very trivial but holds a lot of value, he said "Ashish, we win some, we lose some. It's part of the game".

Since our childhood we are always taught "Failures are steppingstones to success". As kids, we accept it at face value but we never really try to understand the "Why" behind it; "Why is failure the stepping stone to success?". As management students, leaders etc. we are always taught to only look for success and always think about winning. But the hard reality is that failures are as much a part of the leadership journey as successes. They may be personal/ individual failures or failures of your teams and projects.

In my eyes, a leader who knows how to pick himself/herself up after getting a bloody nose, dust off the dirt and lead a fight back, is a true leader. So in this article I intend to focus on failing, trying to share my knowledge, based on my experiences and also the things I learnt during my ControlCase-sponsored 3-month management course at the Indian School of Business and talk a little bit about handling failure or as I call it "How to Fail??!!"

Don't be in denial...

The most common reaction of any individual to failure is that of denial. It's just too hard to digest that one could fail. Then it is followed by a blame game and this starts a vicious cycle of trying to reallocate the cause of the failure instead of assessing it.

So, the first step in handling failure is to accept the failure. A leader needs to be upfront and accept the failure as a person, as a team or as a project. Also, it is important that the leader takes the heat of the failure; the team, whatever they have done or have not done, should never be "fed to the wolves" – figuratively speaking. It is the leader's responsibility to own up to the failure and shield the team from any negative backlash in public or in the organization.

**Introspect......don't brood**

Leaders do not have the luxury to sulk or brood after a failure. The first reaction post-acceptance of failure should be damage control and introspection. Identify the root cause of the failure, what went wrong: people, process, technology. Get that on the table as soon as possible.

Introspection also helps in one more aspect, it helps us come up with a corrective action plan,

which is what normally any management would want to hear after a failure.

**Be Alone, Not Lonely**

We have always heard a phrase – "It's very lonely at the top", this holds true in all sense. The more you rise, the more you are on your own and more accountable as an individual than ever. That is where the real quality of leadership comes into play – managing human resources. You can be alone at the top but as long as you have maintained excellent working relations with your team-members, peers and seniors, you are rarely lonely when it comes to handling failures.

Respect others and they will respect you. Help others in their time of need and in all probability, they will stand by you in your times of crisis. This does ease handling or facing any failures.

**Regroup and reassess**

Post introspection, it is imperative to regroup and reassess with your team to discuss what was identified in the analysis of the failure. Then the leader needs to decide whether any salvaging can be done for the current situation or whether it is wise to let it go and take lessons learnt for the next project.

**No shame in surrender**

I believe that "Live to fight another day" is the most preferred approach when you have no other option. It is wise to let go of the things we cannot change, accept the failure and move on to the next challenge. The important thing for a leader is to learn from these mistakes and ensure that they are never repeated in projects or tasks to come.

So now to answer the question which I asked before "Why failures are steppingstones to success?" Because failures teach us lessons, as long as we learn from these lessons to improve in future, then failure cease to be as disheartening as they seem.

WITH BEST COMPLIMENTS FROM:

# SWIFT ENGG. CO.

**MANUFACTURERS OF PRESSURE DIE-CAST COMPONENTS IN ALUMINIUM / ZINC ALLOYS**

**PRODUCT RANGE : COOKWARE ITEMS, MIXER COMPONENTS, LIGHTING FIXTURES ETC.**

MR. NEEL J. KIRTIKAR
4 GANGA, TUNGARESHWAR INDL. COMPLEX,
SATIVALI, VASAI (E.). PIN CODE 401208
TEL NO. 02502481043
EMAIL : nee1kirtikar21@gmai1.com

कथा

# चॅटरूम (कालाय तस्मै नम:)

*** कै. उज्ज्वला र. ब्रह्मांडकर ***

चैतन्य खरेनं हातातले कागद एकत्र केले. त्या कागदांवर पुन्हा एकदा नजर फिरवली. नंतर त्यानं ते कागद हवे होते तसे क्रमवार लावले... इतक्यात रचना त्याच्या खोलीत आली. हातातलं बाड त्याच्या टेबलावर ठेवत तिनं विचारलं - ''चैतन्य, काय करताय?''

''रचना, मी तुला बोलावणारच होतो. पण माझं थोडंसं काम राहिलं होतं. म्हणून मघाशी हाक मारली नाही तुला - ''

''चैतन्य, मी तुम्हाला सांगितलेल्या कामाचं काय झालं?''

''त्याचीच तर ही तयारी आहे'' हातातले कागद एकत्र उंचावून दाखवीत चैतन्य म्हणाला.

''माझी 'आकृती क्रिएशन्स' तुमच्या नव्या कोऱ्या कादंबरीची वाट बघतेय-''

''वाचकसुद्धा आतुरतेनं वाट बघतायत माझ्या नव्या कादंबरीची. वाचकांना पुन्हा एकदा आपण दुहेरी मेजवानी देणार आहोत. एक माझी कादंबरी आणि दुसरी 'आकृती क्रिएशन्स'ची त्या कादंबरीवरची सिनेमाची आविष्कृती..

''चैतन्य, मला तुम्हाला काहीतरी दाखवायचंय'' असं म्हणून तिनं टेबलवर ठेवलेलं बाड उचललं आणि त्याच्या पुढ्यात ठेवलं. तिकडे नजर टाकीत चैतन्यनं विचारलं - ''हे काय आहे?''

''ह्या मला जाणवलेल्या काही गोष्टी मी शब्दांकित केल्यायत.''

''बऱ्याच दिसतायत''

''अं हं... त्या गोष्टी थोड्याच आहेत - बाकी माझी त्यावरची टीका टिप्पणी आणि मतंमतांतरं'' रचना उत्तरली.

''मतं म्हणजे तुझी मतं ते कळलं. पण ही 'मतांतरं'? ती कुणाची?''

''इतरांची''

''ह्या सगळ्याची काय जरूरी होती? उगीच तुला मेहनत घ्यावी लागली.''

''तुमच्यामागे धोशा लावून मी थकले. कितीतरी वेळा सांगितलं की नवीन कादंबरी लिहा - मला नवीन सिनेमा काढायचाय.''

''अगं, काही सुचतच नव्हतं.''

''थापा मारताय हं चैतन्य. एवढ्या काळात तुमच्या दोन नव्या कोऱ्या कादंबऱ्या आल्यायतसुद्धा... पण...''

''पण त्यावर सिनेमा बेतता येत नाहीय... हो नं?''

''अं... हो.''

''मला त्याची जाणीव आहे रचना. योग्य त्या विषयाच्या शोधात होतो मी.''

''मिळाला का एकदम नवा विषय?''

''हो. हे बघा काही मुद्दे सुचले ते टिपून ठेवलेयत. हे घे वाच''

''तुम्हीसुद्धा मी लिहिलेलं वाचून बघा. तुमच्या कादंबरीसाठी एकदम नवा विषय सुचवतेय तुम्हाला.

''असं करूया प्रथम मी लिहिलंय ते तू वाच. नंतर तुझे मुद्दे वाचेन. म्हणजे तुला दोन कादंबऱ्या एकदम मिळतील.''

रचनानं त्याचे कागद पुढे ओढले आणि ती वाचू लागली. वाचता वाचता रचना मध्येच त्याच्याकडे आश्चर्याने बघत होती. तर कधी कधी काहीतरी शोध लागल्यासारखी भुवया उंचावून त्याला खुणेनंच ''असं काय'' म्हणून विचारत होती.

रचनाचे ते सारे विभ्रम चैतन्यला खूपच विलोभनीय

वाटत होते. तिच्या चेहऱ्यावरच्या सगळ्या रेषा जणू बोलक्या झाल्या होत्या... त्या रेषांमधून एक आकृती तयार होत होती. चैतन्य त्या प्रतिक्रियांवरून अंदाज बांधत होता. ती कधी आश्चर्यचकित होत होती तर कधी ''बरोबर'' ह्या अर्थानेही मान होकारार्थी हलवत वाचत होती. वाचून झाल्यावर ती म्हणाली - ''चैतन्य, हे सगळं तुम्ही...'' पण तिला अर्ध्यावरच थांबवत तो म्हणाला - ''थांब रचना नंतरच बोलू..'' असं म्हणून तो तिचं बाड वाचू लागला... आता रचना त्याच्याकडे बघत बसली होती. मघाशी रचनानं दिलेल्या प्रतिक्रियांच्याच जातीच्या पण जबरदस्त तीव्रतेच्या प्रतिक्रिया तो देऊ लागला. सरतेशेवटी त्याचं वाचन पूर्ण झाल्यावर ते दोघेही काही क्षण एकमेकांकडे बघत बसले आणि दोघांनी एकमेकांना एकाच वेळी हसत विचारलं 'सृजन ऽऽऽतूऽऽऽ?''

''तू निर्मिती ऽऽऽ?

दोघांचा जबरदस्त हसण्याचा भर ओसरल्यानंतर चैतन्य म्हणाला, ''वा वा! काय नामी कल्पना होती तुझी!.. प्रबंध लिहितेय म्हणालीस.''

''आणि तुम्ही सुद्धा सृजन बनून काय छान गप्पा मारत होतात चॅटिंगमध्ये!''

''खरं सांगू? कॉफी कॅफेमध्ये त्या दिवशी तुला बघितलं नं, त्याचवेळी एकच क्षण माझ्या मनात जोरदार विचार चमकला की तूच निर्मिती असावीस. म्हणून मी नंतर त्या दिवशी चॅटिंगमध्ये म्हणालासुद्धा की तूच माझी बायको कशावरून नाहीस?''

''पण मी ते सगळं हसण्यावारी घालवलं खरं तर मी सुद्धा तुम्हाला बघितलं होतं.''

''काय म्हणतेस? कधी?''

''तुम्ही बराचवेळ गेटजवळ उभे राहून वाट बघितलीत आणि नंतर आत येण्यासाठी वळलात ना, तेव्हा... पण सुरुवातीला तुम्ही म्हणजे सृजन असं नव्हतं वाटलं मला. फक्त मी तिथं आहे हे तुम्हाला कळू नये यासाठी आटोकाट प्रयत्न करीत होते.'

''का? कसली भिती वाटली तुला?''

''भिती नाही.. पण वाटलं तुम्हाला वाईट वाटेल की तुम्हाला न सांगता एकटीच कॉफी शॉपमध्ये गेले म्हणून?''

चैतन्य हसून म्हणाला - ''तरीच मला निर्मितीची

## (वात्रटिका)

### ध्यास

तिने घेतला गाण्याचा ध्यास,
पंडित-बुवांचा लावला क्लास.
रात्रं-दिन तोंडात ठेवली खडीसाखर,
शेजार-पाजार म्हणतो,'आवर ग आवर.'

-डॉ. सुमन नवलकर

सारी मतं तुझीच आहेत असं सारखं वाटायचं.''

''माझी तर तेव्हा पूर्ण खात्रीच झाली होती की तुम्हीच सृजन आहात म्हणून.

चैतन्य तिच्या डोळ्यांत बघत गंभीरपणे म्हणाला - ''रचना, समज, सृजन म्हणून कुणी वेगळाच असता तर तिकडे काय केलं असतंस?''

''अर्थातच निर्मिती बनूनच गप्पा मारल्या असत्या... अं... पण तुम्ही हे एवढ्या गंभीरपणे का विचारताय? विश्वास नाही का माझ्यावर?''

''छे छे! तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे माझा. पण 'सृजन' वर नाही ना! समजा तो कुणी वेगळाच असता आणि त्यानं तुझा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला असता तर?''

''मी असं कसं होऊ दिलं असतं? ते जाऊ दे. पण आता मनात विचार येतायत की... राणी, परी, संकल्प, चतुर हे सगळे नक्की कोण आहेत?''

''राणी आणि परीला मी भेटोलय. माझ्या टिपणांमध्ये वाचलंस ना तू?''

''हो... वाचलं नं! पण तुम्हांला कॉफीशॉपमध्ये बघून मला नाही भिती वाटली की तुम्ही ज्या कुणाला भेटायला आलायत ती जर बाई असेल तर तुम्हाला तिची भुरळ पडेल.''

''थँक्स रचना. तुझा हा माझ्यावरचा अतूट विश्वासच मला असं सृजन बनून निर्मितीची भेट घेऊ पाहणारे अनुभव गोळा करणं शक्य करतो. अगं राणी आणि परी भेटल्या नं तेव्हा गंमतच वाटली. राणी चक्क प्रौढा आहे आणि परी एक तरुणी..''

''वाचलं मी ते परीचं लग्न ठरलंय हल्लीच. चॅटिंग

**कविता**

# Ants

What beauty are simple ants,
Even though sometimes they get into your pants!

Beautiful hills they make,
But from our food little pieces they take.

When for diseases we didnt have a cure,
Thriving were these creatures so pure.

To comprehend these creatures is very esoteric,
Could they teach us one or two a trick?

**-Vihaan Kothare**

---

करतानाच...''

''अरे वा! हा एक नवीन मुद्दा छान आहे.''

''अं.. तुम्ही त्या दोघींना त्या तरुणी असतील म्हणून भेटायला गेला होतात?''

''हे तू निर्मिती म्हणून विचारतेयस की रचना माझी बायको म्हणून?''

''झाला तुमच्यातला नवरा जागा? प्रश्नाचं उत्तर छान टाळताय.''

''तेच तर मीही शोधतोय. रचना, तू मला मघाशी विचारलंस त्या प्रश्नात तू खरी कोण होतीस ह्यावरच ह्या प्रश्नाचं उत्तर अवलंबून आहे. बायकोला वेगळं उत्तर आणि निर्मितीला वेगळं. कारण परीला, निर्मितीला, राणीला भेटायला गेलेला सृजन होता - चैतन्य नव्हता.''

''हो नं? मग सृजनला भेटायला गेलेली निर्मिती होती, रचना नाही आणि परीला भेटायला जाताना तुमची भूमिका काय होती हे विचारणारी बायको होती.''

''आपण उगीचच आपल्या व्यक्तिमत्वाचं रोपण सृजन आणि निर्मितीवर करतोय रचना. ते जाऊ दे.. आपल्या फ्रेंड्स लिस्टमधले संकल्प, चतुर कोण आहेत? निपुण खरा कोण होता? स्वत:च्या आत्महत्येची सुपारी देऊ करणारा आणि मारला गेलेला निपुण होता की दुसराच कुणीतरी? आणि खरा निपुण, अजूनही वेगळ्याच नात्यानं अशा सुपारी घेणाऱ्याचा शोध घेतोच आहे?'' चैतन्यनं मनातले प्रश्न रचनाला विचारले.

''चैतन्य, मी सुद्धा ह्याच प्रश्नांची उत्तरं अजून शोधतेय. पण ही उत्तरं आपल्याला मिळणं अशक्य आहे. पोलीसच ते शोधून काढतील. पण आपल्याला ती माणसं खरी कोण हे कधी कळणारच नाही'' रचना खंतावली.

''त्याची काही जरुरीसुद्धा नाही रचना. समज, त्यांची खरी नावं, गावं कळली तरी त्याचा काय उपयोग आहे? जसे आपण खऱ्या आयुष्यात पती-पत्नी आहोत तसे या सगळ्यांपैकी कोणी असतील? ही कादंबरी वाचून आणि तुझा त्यावरचा सिनेमा बघून त्यांना कळेलच की मीच तो सृजन आणि तूच ती निर्मिती.''

''कोण जाणे! पण कळलं तरी मजाच वाटेल त्यांना'' रचना म्हणाली.

''त्यांना कळलंय की नाही हे आपल्याला कधीच कळणार नाही. कारण मी पुन्हा कधीही सृजन ह्या नावानं चॅटिंग करणार नाहीय. कदाचित तेसुद्धा त्यांची नाव बदलतील... खोट्याचं खरं आणि खऱ्याच खोटं बेमालूमपणे मिसळवते ही चॅटरूम. चल बराच वेळ बोललो. आता कामाला लागू या. मजा आहे नाही - इतका वेळ एकाच खोलीत बसून एकाच घरातले दोन जवळचे जीव एकमेकांशी चॅटिंग करतात तेही एकमेकांना कळू न देता...''

चैतन्यनं कोऱ्या कागदांची चळत पुढे ओढली आणि त्यानं कादंबरीचं शीर्षक लिहिलं - ''चॅटरूम''

*

कविता

# रत्न

साहित्याच्या खाणीत दडलीत
शब्दरुपी अनमोल रत्नं
आपण निवडक वेचावी
म्हणूनच हा प्रयत्न
रत्न ह्या शब्दातच
तेज तेजस्वी चमकदार
खऱ्या रत्नांची किरणे
करती संकटांना हद्पार
सप्तरंग इंद्रधनुष्याचे
सात राशी आणि सात रत्नं,
समीकरण जुळते त्यांचे
तेव्हाच बनते आयुष्य प्रसन्न.
रत्नांत खरंच आहे का शक्ती?
त्याचे उत्तर देतो इतिहास.
शंकेपेक्षा अधिक
करावा ज्योतिषाचा अभ्यास.
राशींच्या अंगी किरणांची
पडते कमतरता.
रत्नांची किरणे
सांभाळतात. देतात स्थिरता
सात रत्नांची किंमत, किमया,
सांगते शब्दरुपी रत्नात.
आपण करुया त्यांचे स्वागत
आपल्या जीवनात.
पहिले रत्न पुष्कराज.
त्यावर गुरुचे अधिष्ठान.
विशिष्ठ पिवळ्या रंगाचे
त्याचे आज तर्जनीतच स्थान.
दुसरे हिरवे रत्न पाचु, बुधाचे
लाभते व्यवसायिकांना
ठिसूळ, नाजुक रत्न संभाळते,
शृंगारिक जीवन, दूर ठेवते गुप्तशत्रुंना.
तिसरे रत्न मौलिक, महाग हिरा.
खरा हिरा मिळणेच कठीण.
लाभलाच तर करतो फायदा.
पैलू नीट नसले, प्रश्न होतो जटील.
चौथे रत्न माणिक, रवीचे लाडके
अप्रतिम लाल रंगाची झाक
देते प्रसिद्धी, पैसा, राजसुख
आणि राखते वैभवाचा थाट.
पाचवे रत्न मोती, चंद्रासमान शीतल,
खरा मोती मिळणे क्वचितच
शरीर व्याधी सावरतो,
वेळीच करतो सूचित.
सहावे रत्न पोवळे, नारिंगी
मंगळ ग्रहाला ते लाभते.
लष्करात, पोलिसांना वेळीच
राशीस्थानाच्या अभ्यासाने सावरते.
सातवे रत्न नीलम, शनीचे
वापरणे पडते महाग,
शनी देतो कलाटणी झटपट
करोडपतींनाही करतो कंगाल.
सात रत्नांची आहे गम्मत
जन्मकुंडलीशी ही सहमत
रत्नपारखींचे घेऊन मत
निश्चिंतपणे व्हा सहमत

**-सौ. गीता आंबवणे.**
(९८२३७३८३६०)

**कविता**

## तृप्ती

आभाळाचा रंग निळा
अन् विस्तार त्याचा केवढा
परी रोखूनी त्यास पाहता
मावतो तो ह्याची डोळा.
नदीचे जल प्रवाही
वेगे वाहे केवढे
परी बोटीने प्रवास करता
आनंद मिळे सोवळा.
हे डोंगर असती प्रविशाल
दगडधोंड्यांनी सजलेले
परी मानवाच्या छोट्या पावलांनी
जिद्दीने पार केलेले.
आयुष्याचा संभार केवढा
शतकापर्यंत पोहोचलेला
परी प्रत्येक क्षण सुखे जगता
जीवनतृप्ती लाभलेला.

**-श्री हेमंत विनायकराव तळपदे**
९८२१६०७५९३

**कविता**

## कोव्हिड काळात

खूप दिवस झाले नं
आपलं भांडण, बिंडण होऊन?
हल्ली मेसेजेसवरच भागतं
संभाषण तितकंच असतं.
खूप दिवस झाले नं
आवाज, बिवाज ऐकून?
जाहिरातीत दिसावं खाणं
खाता येऊ नये काहीच,
तसं काहिसं वाटतं
व्हिडिओ कॉलवर तुला पाहून;
स्पर्शाविनाच सारं घडतं
जाहिरातीत बाळ दिसतं
बाळाचं मऊमऊ जावळ,
आठवणीतच रुळतं फक्त!
खूप दिवस झाले नं?
भेटायचं, मनातच अडतं
काटला जावा पतंग
तसं सगळंच बेटं हरवतं!

**- कल्पना सुभाष कोठारे**

***हास्यचित्र***



लेख

नवलCURRY

# दार उघड बये, दार उघड

* सौ. मुकुला प्रदीप नवलकर *

आपल्या संस्कृतीत शाक्तपंथ आहे. शक्ती उपासना आहे. शक्तीची उग्र साधनाही आहे. मंत्र यंत्र आणि तंत्र माध्यमातून देवीची स्थापना आणि अर्चना, प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. सृष्टीची निर्मिती रचना करणारी,जननी म्हणजे स्त्रैण शक्तीच आहे. द्वापारयुगात, महामाया महाविद्या, करोली, सांचोली आदि शक्तिपीठं कार्यान्वित होती. श्रीकृष्णाची जेष्ठ भगिनीरुपातील योगमाया इथे रक्षणकर्ती म्हणून पुजली जाते. शाक्तपंथ,सत्यधर्म अनुसरून स्वतंत्र आणि निर्भय बनण्याची दीक्षा देतो. आदिमायेची दोन प्रगट आणि दोन गुप्त नवरात्र आपण आजही श्रध्दापूर्वक साजरी करतो.

वसंत आणि शरद ऋतूंचा आरंभ व त्यावेळेस जल, वायू आणि सौर ऊर्जेचा अनोखा संगम, आदिशक्तीच्या उपासनेसाठी पवित्र मानला जातो. या नऊ रात्रींच्या उत्सवात प्रकट नवरात्रीत नवदुर्गासह, गुप्त नवरात्रीत दहामहाविद्यांची आराधना केली जाते.

या पार्श्वभूमीवर व्यवहारी जगात हृदयी अमृत,नयनी पाणी येथून सुरु झालेली स्त्रीजन्माची कहाणी आताच्या,आधुनिक काळात Sky is the lower limit, येथपर्यंत पोहोचली आहे. एके ठिकाणी अस्तित्वाची लढाई आहे, तर कुठे स्पर्धात्मक चढाओढ. कुठे भावनिक कोंडमारा तर कुठे वैचारिक गोंधळ. यातून मार्ग काढण्यातच स्त्रीत्वाची खरी कसोटी लागते.उगवणाऱ्या सूर्याच्या साक्षीने, पुढच्या पिढीला घडविणारी स्त्री, कुटुंबासह प्रगल्भ समाजही घडवते, हे निर्विवाद.

स्त्रीजन्माचे सनातन सत्य, आद्य शंकराचार्यांनी अधोरेखित केले आहे ते असे..

कुपुत्रो जायते, क्वचिदपि कुमाता न भवति। ।

स्त्री तिच्या जीवनात कन्या, भगिनी, पत्नी ह्या भूमिका निभावते. तरी सृजनाचा वसा लाभलेली स्त्री, ही अनंत काळाची माताच असते, हे अलिखित सत्य, आपल्या संस्कृतीत पूर्वापार रुजले आहे.

घर संकल्पनेतील, सांकेतिक ओटी, ओसरी, सोपा, माजघर, शेजघर, देवघर, चूलखोली, माडी, छपरातला पोटमाळा, मागची पडवी, परसू इतकंच नव्हे तर, बाळंतीणीची अंधारी आणि लाल आलवणातली अडगळीची खोली, ही सारी, त्याकाळातील, स्त्रियांच्या संदर्भातील, सामाजिक विचारसरणी, रितीभाती अन घटितांची साक्षीदार आहेत.

अंगणात, भावंडासह अल्लडपणे बागडणारी, सोप्यात, वहिनीकडून माथा उकलून घेणारी, माजघरात आणखी एका लाडवासाठी आज्जीकडे हट्ट करणारी, तुळशीला पाणी घालणाऱ्या थोरल्या काकीच्या, मागे मागे फिरणारी, धाकट्या आत्यासोबत परसातल्या प्राजक्ताची फुले वेचणारी, दिवेलागणीला आजोबांच्या पुढ्यात परवचा आणि रामरक्षा म्हणणारी, आणि वडिलांच्या येण्याची चाहूल लागताच आईच्या पदराआड लपणारी ती...

ती जेव्हा, अशाच एका दुसऱ्या घरातील, उंबरठ्यावरील माप ओलांडून नवीन आयुष्यात प्रवेश करते, तेव्हा तिच्या जाणिवा संस्कारित असतात. विवाहित मुलीला दोन्ही घरातील आदरभाव आणि मानसन्मान राखायचे असतात. मध्यदीपन्यायाने ती

दोन्हीकडे सारखाच प्रकाश देते. आजच्या Quantum Physics मधली ही Energy आपल्या घराघरांत, वेगवेगळ्या रुपात, नांदते आहे. कधी अन्नपूर्णा शाकंभरी, कधी शारदा, वागीश्वरी. कधी सवितृ गायत्री. कधी कनकधारा, वैभवलक्ष्मी. तर कधी दुर्गा, चण्डिका.

अहिल्या, द्रौपदी, तारा, कुंती, मंदोदरी या पंचकन्या प्रात:स्मरणीय आणि लोपामुद्रा, मैत्रेयी, गार्गी, याज्ञवल्की, वंदनीय ठरल्या तरी स्वत्व, जपणाऱ्या कित्येकजणी अनाम आणि अनुल्लेखित राहिल्या आहेत. वाल्याकोळ्याचा वाल्मिकी घडवणारी त्याची पत्नी, अशीच अनाम स्त्रीशक्ती. यज्ञकुंडातून जन्मलेली, स्त्रीत्वाची जाज्वल्यज्योती शिखंडीनीही शक्तीरुपिणीच. रामायण आणि महाभारतात, प्रत्यक्ष चैतन्य अवतारातही, अविभक्त स्त्रैण्यशक्तीची विटंबनाच झाली होती. त्यावेळीही तिने तिच्या तेजशलाका स्वरुपांचा प्रत्यंतर दिला आहे.

अशा शक्तीचा विचार करताना शिवाचं स्मरण अनिवार्य आहे. शिवाची ही अर्धांगिनी, जिच्या वाचून शिवही निष्क्रीय आहे. कारण शक्ती शिवाचे मर्मस्थान आहे.

शिवपार्वती ही सनातन दम्पती आहे. पार्वती ही खरी आद्य, अस्मितावादी आहे. पित्याच्या प्रती सद्भावना, आदर व्यक्त करतानाच पतीचा सन्मान सांभाळणारी सती आहे. पार्वती आग्रही असली तरी समर्पित आहे. खलनिर्दालक, रणरागिणी चण्डिका आहे, तशीच ममतास्वरूप, वात्सल्यमूर्ती अन्नपूर्णाही आहे. म्हणून तर संसारात प्रवेश करणारी वधू, गौरीहर पूजते आणि तिच्या सासरी, देवी अन्नपूर्णा पाठराखीण म्हणून सोबतीला असते. पार्वतीचे हे कुटुंबवत्सला रूप, संस्कृतीने नेमके हेरले आहे. त्याच नेमकेपणे, या ब्रह्मांडातील आदिशक्तीचे व्यक्त स्वरुप ओळखले आहे. पंचतत्वात पृथ्वीचे स्थान पाचवे आहे. सोशीकता, सर्वसमावेशकता आणि क्षमाशीलता हे तिचे स्थायीभाव आहेत. याच मुशीतून स्त्रीत्वाचे बीज रुजते, अंकुरते आणि फुलते फळते. त्याची निगराणी आणि जोपासना ही स्त्रीजन्माची



इतिकर्तव्यता आहे.

विधीच्या विधानाने सोपवलेली ही जबाबदारी आणि अंत:करणात पाझरणारी ऋजुता हीच, तिचे खरे स्त्रीधन आहे. ही लाखमोलाची जोखीम, प्रारब्धापाशी गहाण पडणार नाही याची दक्षता तिने घ्यावी.

कुणी एका कवीने किती सार्थ म्हटलं आहे.....

तूच मंथरा तूच कैकयी
दुई विकल्प,एके ठाई
विचार, मग हतबुद्ध दशरथ
विवेक-वृत्ती,वनवासी होई

प्रत्येक सबलेत असलेला धगधगता, आदिशक्तीचा स्त्रोत, तिने आपल्या स्वयंसिद्ध सामर्थ्याने जपला तर, स्वत:सह तिच्या घरीदारी आणि समाजातही सुखशांती आणि समाधान नांदेल. काळपुरुषाच्या प्रभावी हस्तक्षेपाची किंमत बदलत्या परिस्थितीत चुकवावी तर लागणारच आहे.अहंकार ऐश्वर्याशी आणि सुखासीनता या आणि अशा भ्रमापायी आत्मक्लेश तर अटळच असतो आणि त्याचवेळी, अनिष्टतेलाही आमंत्रण मिळते. त्याकारणाने, अधोदिशेने होणारा मनुवंशाचा प्रवास रोखण्यासाठी बये दार उघड.....

याहून अधिक, स्त्रीत्वाची थोरवी ती काय वर्णावी?

म्हणूनच,आपल्या आजवरच्या वाटचालीचा लेखाजोखा, महिलादिनानिमित्त जरूर मांडावा. त्रुटी भरून काढाव्यात. त्यामुळे बाह्यजगात वावरण्याचे धारिष्ट्य येईल. पण त्याजोडीने, अंत:करणाची कवाडे उघडून शुभंकरा आणि अशुभनाशिनी मूळमायेची प्राणप्रतिष्ठा करावी. तेव्हाच स्त्रीत्वाचा खरा जागर घुमेल. आणि म्हणून तिची ही विनवणी.....

नमो आदिमाया भगवती।
अनादि सिद्ध मूळ प्रवृत्ती।
महालक्ष्मी त्रिजगती ।
बये दार उघड।
दार उघड बये, दार उघड.

*


!! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!





संजना आणि दीपक कोठारे

In Loving Memory of
Late Shri Shivanandan & Late Smt Neela Rao



There are no words t describe what you meant to us

Nothing can repay what you have done for us

No one can ever replace you both

We grew up cocooned in your love, comforted by your hugs and motivated by your life.

Thank you for everything

We are sorry if we have ever saddened or disappointed you

A promise from us that we'll make you proud someday

Blessed to be your daughters

Aparna Sanyog Pendharkar & Anarkali Sandeep Velkar

लेख

# माझा संगीत अनुभव

* दीपक माधव धैर्यवान *

संगीत ही अशी एक चीज आहे की कोणत्याही प्रकारच्या संगीताचा आस्वाद घेण्यासाठी आपल्याला संगीतातले ज्ञान असणे गरजेचे आहे असे नाही. संगीतातल्या ज्ञानापेक्षा संगीताचा कान असणे महत्त्वाचे. संगीत कोणत्याही प्रकारचे असो. शास्त्रीय संगीत, उपशास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, भावगीत, सुगम संगीत, लोकसंगीत इत्यादी विविध प्रकारच्या संगीताचा आस्वाद आपण अतिशय आनंदाने घेऊ शकतो. आता हिंदी मराठी चित्रपट संगीताचंच बघा ना. एखादं गाणं ऐकताना आपल्याला कुठे ठाऊक असते की ते गाणे कोणत्या रागावर आधारलेले आहे ते. तरीपण आपण ह्या गीतांचा आनंद अनेक वर्षे घेत आलो आहोत ना!

मी स्वत: संगीत शिकलेलो नाही. मला गाताही येत नाही. शास्त्रीय संगीतातलं मला काही विशेष कळले असेही नाही. एवढंच की वर्षानुवर्षे शास्त्रीय संगीताच्या असंख्य मैफिली ऐकत आल्याकारणाने व माझ्या काही संगीत जाणणाऱ्या मित्रपरिवारामुळे मला यमन, बिहाग, मारूबिहाग, भीमपलास, तोडी इतक्या काही रागांची जुजबी माहिती आहे; पण ह्या पलिकडे विशेष काहीही नाही. पण आपल्याला संगीतातील विशेष ज्ञान नाही ही वस्तुस्थिती माझ्या संगीताच्या आनंदात आणि एका वेगळ्याच अनुभूतीत कधीही बाधा आणू शकलेली नाही.

मी आजवर ऐकलेल्या शास्त्रीय संगीताच्या असंख्य मैफिलीपैकी काही मोजकीच उदाहरणे मी येथे नमूद करु इच्छितो.

१९७० साली गिरगावातील सुप्रसिद्ध लक्ष्मीबाग सभागृहात एक तबला महोत्सव झाला होता. मला तेथे जाण्याचा योग आला अनेक दिग्गज तबलानवाझ आपली कला तेथे पेश करत होते. नंतर आयोजकांनी घोषणा केली की आता उस्ताद अल्लारखासाहेबांचे सुपुत्र झाकिर हुसेन तबला सोलो (एकल वादन) पेश करतील. झाकीर व्यासपीठावर स्थानापन्न झाला. १५-१६ वर्षांच्या झाकिरची तेव्हा ओळख म्हणजे उस्ताद अल्लारखांसाहेबांचा सुपुत्र एवढीच मर्यादित होती. नंतर ते आंतरराष्ट्रीय किर्तीचे जगन्मान्य तबला नवाझ झाले ही वस्तुस्थिती. झाकिरने तबलावादनास सुरुवात केली. सभागृहात हजर असलेले बडे बडे तबलानवाझ त्याला असे काही उत्तेजन देत होते की आम्ही सर्व श्रोते त्याच्या तबलावादनाचा आस्वाद आणि आनंद घेत होतो. काही वेळानंतर झाकिरने तबलावादन संपविले आणि संपूर्ण लक्ष्मीबाग सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने दणाणून गेले. आमची आणि उस्ताद झाकिर हुसेनची ती पहिली ओळख. पुढे अनेक वर्षे मी त्यांचे अनेक साथसंगत, तबला सोलो एकत आलो आहे. यशाची अनेक शिखरे पादाक्रांत करत आज उस्ताद झाकिर हुसेन एका आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ख्यातनाम तबलानवाझ झाले पण माझ्या मनात त्या मैफिलींची जादू कायमची घर करून राहिली.

माझ्या शास्त्रीय संगीताच्या ओढीमुळे मी अनेक वर्षे शास्त्रीय संगीताची संमेलने अनुभवत आलो आहे. पंडित सी. आर. व्यास त्यांचे गुरु पं. जगन्नाथबुवा

पुरोहित ह्यांच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी गुणिदास संगीत संमेलन भरवत असत. आजही ही परंपरा पंडीत सी. आर. व्यासांच्या सुपुत्रांनी सुरु ठेवली आहे. ही गुणिदास संगीत सम्मेलन मी माझ्या काही मित्र मंडळींसह १४-१५ वर्षे ऐकत आलो आहे. या सम्मेलनात अनेक नामवंत गायक व वादक आपली सेवा मनोभावे अर्पण करीत असतात. ह्या सम्मेलनामुळे अनेक एकाहून एक अत्यंत दर्जेदार कलाकार मी ऐकू व अनुभवू शकलो. ह्या सर्व कलाकारांनी ह्या मैफिलीद्वारे दिलेली एक विलक्षण अनुभूति शब्दांत वर्णन करणे शक्यच नाही. पण ह्या सर्व मैफिलींचा आनंद माझ्या आयुष्यातील एक अनमोल ठेवा.

ह्याच सम्मेलनात एकदा गानसरस्वती किशोरीताई अमोणकर ह्यांचे गाणे ऐकण्याचा योग आला. एका रविवारी सकाळी दहा वाजता रवींद्र नाट्यमंदिरात ही मैफिल होती. रवींद्र नाट्यमंदिर श्रोत्यांनी तुडुंब भरलेले, व्यासपीठावर किशोरीताई आणि त्यांचे साथसंगत करणारे कलाकार आणि त्यांचा शिष्यगण आसनस्थ झालेला. तीन तानपुरे एका सुरात जुळलेले आणि किशोरीताईंनी राग 'अल्हेय्या बिलावल' गायला सुरुवात केली. हळुवारपणे राग विस्तार करीत रागाचे मर्म उलगडत त्यांनी मैफिलीचा असा काही ताबा घेतला की श्रोते मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते. नि:शब्द किंवा नीरव शांतात म्हणजे काय त्याचा अनुभव मी त्यादिवशी एका वेगळ्याच तऱ्हेने घेतला. सर्व श्रोत्यांची ब्रम्हानंदी टाळी लागलेली होती. पिन ड्रॉप सायलेन्स म्हणजे काय हे मी प्रत्यक्ष अनुभवले. साधारण ५० मिनिटे राग अल्हैय्या बिलावल गाऊन किशोरीताईंनी मैफल संपविली.

काही क्षण नि:शब्द शांततेतच गेले आणि मग श्रोते त्या मंत्रमुग्ध वातावरणातून भानावर आले आणि रवींद्र नाट्य मंदिराचे सभागृह टाळ्यांच्या गजराने निनादले. एक अविस्मरणीय मैफल!

ह्या पंडित गुणिदास संगीत सम्मेलनात प्रतिवर्षी आठ ते दहा कलाकार आपली कला सादर करायचे. त्यात पं. भीमसेन जोशी, पं. कुमार गंधर्व, पं. गोकुलोत्सव महाराज, पं. जितेंद्र अभिषेकी, पं. उल्हास कशाळकर, पं. राजन साजन मिश्र, पं. फिरोझ दस्तुर असे नामवंत गायक; गानसरस्वती किशोरीताई आमोणकर, गंगुबाई हनगल, मालिनी राजुरकर, विदुषी वीणा सहस्रबुद्धे, बेगम परवीन सुल्ताना अशा दिग्गज गायिका; तसेच उस्ताद अल्लारखांसारखे तबलानवाझ, उस्ताद अमजद अलिखान यांचे सरोदवादन, उस्ताद शहीद परवेज, निलाद्रीकुमार, कार्तिक कुमार ह्यांचे सतारवादन ह्यांचा समावेश असायचा. ह्या आणि इतरही कलावंतांच्या अत्यंत उच्च दर्जाच्या गायन वादनाचा आनंद ह्या गुणिदास सम्मेलनाद्वारे आम्ही अनेक वर्षे अनुभवू शकलो.

संमेलनाची सांगता भारतरत्न पंडित भीमसेन जोशी ह्यांच्या शास्त्रीय संगीताने ठरलेली असायची. त्यामुळे पंडितजींच्या अनेक अविस्मरणीय मैफिलींचा आम्हाला लाभ झाला. एके वर्षी पंडितजींनी राग बिहाग गायला सुरुवात केली. बिहाग रागातील सुप्रसिद्ध बंदिश 'लट उलझे सुलझा जा बालम' गायला घेतली. ह्या बंदिशीचा अर्थ असा की एक नर्तिका नृत्य करत असताना तिच्या कपाळावरचा भांगटिळा किंचित बाजूला सरकतो. तेव्हा ही नर्तिका आपल्या बालमाला ती नीट सारखी करायला विनवणी करते कारण तिच्या दोन्ही हाताला मेंदी लावलेली असल्याने तिला ते शक्य नसते. 'माथे कि बिंदिया बिसर गयी है, अपना हाथ लगादे बालम, हाथोंमे मेरे मेहंदी लगी है. सांगायचा मुद्दा म्हणजे हे सर्व दृष्य पंडितजींनी त्यांच्या सुरांद्वारे इतके अप्रतिम उभे केले की जणू ती नर्तिका आपल्या नजरेसमोर नृत्य करीत आहे. अंगावर रोमांच आणणारा तो अनुभव माझ्या कानांत आणि मनात कायमचा कोरला गेला. धुंद ती मैफिल!

ह्या सम्मेलनाव्यतिरिक्त शास्त्रीय संगीताचे असे अनेक एकाहून एक दर्जेदार कार्यक्रम आम्ही अनुभवले. ह्या कार्यक्रमांनी आम्हाला दिलेली एका वेगळ्याच आनंदाची अनुभूती शब्दांत वर्णन करणे केवळ अशक्य.

## वर्धापनदिनानिमित्त झालेल्या ऑनलाईन सोहळ्याबद्दल श्री सुजन राणे यांची प्रतिक्रिया आतील पानात आहेच. या आणखी काही प्रतिक्रिया

अप्रतिम आनंद सोहळा! शतकोत्तर सोहळा नक्कीच कल्पनेपलीकडील होणार! सर्व कलाकारांचे व आयोजकांचे हार्दिक अभिनंदन

**- प्रणिता प्रभाकर**

सुरेख सोहळा. संपादक असलेल्या सुहासिनीबाईंचे उत्स्फूर्त वाटणारे भाषण, त्यांचे उच्चार आणि नेमके मुद्दे वाखाणण्याजोगे. सर्वांनीच कार्यक्रमात प्राण फुंकर मारली.

**- मिलींद वैद्य**

माननीय संपादिका,
प्रा. श्रीमती सुहासिनी कीर्तिकर
प्रभुतरूण यांस

नारळीपौर्णिमेच्या शुभदिनी आपल्या प्रभुतरुणाचा ९८ वा वाढदिवस प्रभुतरुण परिवाराने डिजिटली दणक्यात साजरा केला. मी सर्वप्रथम या वाढदिवसाच्या निमित्ताने प्रभुतरुण परिवाराचे हार्दिक अभिनंदन करतो. खरोखरच हा कार्यक्रम एक विविधांगी, आटोपशीर व नवीन तंत्रज्ञानाची उचित सांगड घातलेला ठरला. संपादिका सुहासिनी कीर्तिकरांचे छोटेसे भाषण समयोचित आणि प्रभुतरुणाच्या युवा पिढीला प्रेरणा देणारे ठरले. तसेच विश्वस्त श्री. बन्सी धुरंधरांनी व्यक्त केलेले मनोगत खरोखरच स्पृहणीय होते. त्यांची वर्तुळ व शून्य यांची सांगड घालणारी उपमा फारच छान वाटली. मयुरा नायक, संजना कोठारे, मिहिका नवलकर, निष्का कोठारे यांनी 'राधा ही बावरी' या गाण्यावर सादर केलेले नृत्य अभिजात उच्चभ्रू पाठारे प्रभू संस्कृतीचा खास नमुना होता. तसेच काही बंधू-भगिनींनी अनेक वाद्यांचा मेळ जमवून आम्हा रसिकांना आनंदाच्या वेगळ्याच उंचीवर नेले. याबद्दल या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन. हा सोहळा तीन एक तास चालला तरी मन भरले नाही; असेच म्हणावे लागेल. प्रभुतरुण परिवार असाच वृद्धिंगत होवो ही ईश्वरचरणी प्रार्थना

आपला
**श्री हेमंत विनायकराव तळपदे**
९८२१६०७५९३

---

शास्त्रीय संगीताव्यतिरिक्त नाट्यसंगीत, सुगम संगीत, चित्रपट संगीत आदींचे कार्यक्रमही आम्ही नेहमीच अनुभवत असतो.

श्री. मनोहर अय्यर म्हणजे हिंदी चित्रपट संगीताचा चालता बोलता इतिहास. त्यांचा 'कीप अलाइव्ह' हा १९४०, १९५०, १९६० सालातल्या हिंदी चित्रपटसंगीतावर आधारलेला कार्यक्रम असतो. चार तासांचा एक असे वर्षातून ३ ते ४ कार्यक्रम ते सादर करतात. मी व माझी पत्नी सौ. नीलन आम्ही ह्या ग्रुपचे सभासद असल्याने गेली दहा ते बारा वर्षे जुन्या चित्रपटसंगीताचा आस्वाद आम्ही घेत आहोत. तीन ते चार तासांच्या ह्या कार्यक्रमात हातात कोणताही कागद किंवा टिपण न ठेवता हिंदी सिनेसृष्टीतील अनेक किस्से मनोहरजी इतके सुरेख सांगतात की ऐकतच रहावे. एक मनस्वी कलाकार!

तेव्हा मित्रहो, हा माझा छोटासा संगीतोनुभव. संगीतातलं विशेष काही ठाऊक नसताना केवळ कानांद्वारे मनाला मोहवून टाकणारा एक विलक्षण अनुभव!

*

# CANOPUS EYE CENTRE

COMPREHENSIVE EYE CARE

# DR. SOHAIL NRUPAL KOTHARE

**M.B.B.S. , D.O.M.S. , D.N.B ., F.C.R.S**

EYE SURGEON, CATARACT AND REFRACTIVE SURGERY SPECIALIST

***"OUR VISION***
**IS TO HELP YOURS"**

## OUR SERVICES

Comprehensive eye exams

Treatment and management of ocular disease

**Refractive error correction**
**Cataract surgery**
**Dry eye management**
**Cornea and external disease**
**Glaucoma treatments**
**Diabetic eye exams**

***To see better come see us*** :

**CANOPUS EYE CENTRE**
**UNIT NO. 2 , GROUND FLOOR , MANISH TOWER J.P.ROAD , MANISH NAGAR ,**
**ANDHERI (W), MUMBAI – 400053**
**PHONE : 022-26301005 , 7639819699 , 9920061549**
**E MAIL : sohailkothare@gmail.com**

**TIMINGS : MORNING : BY APPOINTMENTS EVENING : 4 – 9 P.M.**

## !! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!

# सौ. अंजली

# व

# श्री. सुधीर मोरेश्वर कोठारे

लेख

# `Red-violets'

## ∗ Armaan Kothare ∗

"Red-violets" by Armaan Kothare

"Not everyone is as lucky as me", I thought to myself, switching off my phone and setting it on the table. Maria, my sister, had called just seconds ago, and all she did was complain about her new neighbours. However, Maria has never *not* had a problem with them before, so coming from her this was no surprise at all.

But its almost a stereotype these days.... "*neighbours are obnoxious and interfering freaks*". I however, have never understood this.

My neighbours are this young couple that go by the names Michelle Jackson and Anthony Jackson. I have had absolutely no issues with them. They have always seemed like a busy, happy and peaceful couple.

They're the most non-interfering people I've known.

Alright I'll stop with the praising....they seem so... *perfect* at times...I envy them. Like they seem to have the best lives ever. Peace, happiness...they have it all. Whereas me? God seems to hate me. As if these perfect neighbours weren't enough, he even took-.....he even took my husband from me.

Mark, my husband has been missing for two months...he was just never found. And that was around the same time these neighbours showed up, give or take a few days.

Let me stress more on why I despise this woman. She has everything I've ever wished for. A nice job, a loving husband, and a great life. Her husband accompanies her to work too....they leave in the morning and come back late in the night, looking happy and refreshed. On the weekends, they even go out for a drive into the city, and didn't arrive till after three hours. I wish I had her life.

After a long time of staring into their houses, I had finally had enough.

Mrs. Jackson's most prized possession was her flower garden in her backyard. She and her husband dig and plant flowerbeds each week! Ugh, she's so lucky. She is especially fond of her little violets, which had unique red marks in their petals; mind you, she never let anyone close to them, let alone touching them. She would lock her backyard using a key which she would later hide. However, being the person I am, I knew exactly where she kept it.

This Saturday morning, I decided that I'd had enough. Enough of her perfect life. Enough of her always being happy.

I decided to ruin her violet flowerbed, and I'd do it tonight.

∗

As if on cue, the Jacksons left their house at 11pm, after which I quickly dropped the fence and walked through. This wasn't the first time I'd done this. Once I'd tripped onto the fence, causing it to fall onto their garden. However, I hadn't done anything fishy and so they didn't fix it entirely. It has been weak ever since, and I was about to use that to my advantage.

My mind barely stable and my heart pounding out of excitement, I walked over to the porcelain pot set out on their porch, and pulled out

the backyard key. Quickly unlocking it, I hurriedly ran into the shed to get a shovel.

I was surprised at how excited I was feeling. A little part of me was saying "you're not this person, Anna", but I ignored it. Today was going to be a wonderful day, and nothing could ruin it. I could already visualize the shock on Michelle's face when she'd notice her wrecked flowerbed, with mud and uprooted flowers fallen everywhere. I would finally see her frown, with a wide smile on *my* face. Haha! Look how the tables would turn!

After a short search, I grabbed the shovel and shuffled to the violets flowerbed. There they were, Michelle's prized violets with strange red spots. Red as if sprayed with blood, but from the inside. I was about to wreck it. I was about to wreck them all.

So I took one deep breath, and tried to remember each time I felt like hitting Michelle. Then I held the shovel as if it were a spear, and visualizing Michelle laying down below, I took the shovel and stabbed it into the flowerbed.

But just two seconds following that, I heard a loud "clank" sound from below the shovel. It had hit something. Has she kept something precious down here? That would explain why she's so protective of it, I thought. I mercilessly started digging a small area of the bed to find what appeared to be the shimmering lid of some kind of metal case.

It was a large and rectangular case, made of pure steel. However, the case had a small opening in the middle, from which a violet with red spots grew above. There was a weird smell coming from the case, but it didn't matter. If it was precious to her, I'd make sure to ruin it. But what could it be?

Curious, I lifted the lid about two feet high, just for the moonlight to reveal my husband Mark's lifeless body.

-Armaan Kothare Blog link- armaankothare.blogspot.com

*


!! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!



श्री. मिथिल चंद्रकिरण नवलकर

!! प्रभुतरुणास दीपावली शुभेच्छा !!



श्री. गौरांग श्रीकृष्ण कीर्तिकर

With Best Copliments from

**Dr Amit Dhairyawan**
MBBS DORTHO Pediatric ortho
2010/04/1216
Mobile: 7045391995

# OM Clinic

BMO IDBI Bank Pant Nagar 7.30 am - 9.30 am
Dhani app (Teleconsultation)

(Appointments by WhatsApp message : 9969057610)

5 pm - 7 pm Varun Tower, 1st floor, Opp. Polytechnic School,
Pant Nagar, Ghatkopar (East), Mumbai - 400 075


प्रवेश सुरु
सुलेखा तळवलकर
अस्मिता चित्र ACTING अकॅडमी
मालिका आणि चित्रपट सृष्टित" पदार्पण करण्याचा राजमार्ग...
"सुलेखा तळवलकर" यांच्या मार्गदर्शना खाली
"अस्मिता चित्र ACTING अकॅडमी" चे
अभिनय प्रशिक्षण आणि
शॉर्ट फिल्म मेकिंग वर्ग
वयोगट ४ ते १५ आणि १५ वर्षावरील
आमचे यशस्वी विद्यार्थी
पुढचा फोटो तुमचा असु शकतो
आम्ही विद्यार्थ्यांकडुन मालिका, चित्रपट, जाहिराती यांच्या ऑडिशन्सची तयारी करून घेतो आणि त्यांना ऑडिशनला पाठवतो...
रवींद्र नाट्य मंदिर, पु.ल.देशपांडे कला अकॅडमी,
संपर्क : 98706 84816 / 98901 80743
www.asmitachitraacademy.com

लेख

# My Foodie Corner

## ⁎ Soumitra Velkar ⁎

I was and still am a very fussy eater! नवरात्र आला की vegetarian जेवणाच्या विचाराने धडकी भरायची. But as a kid, my mother pampered me with interesting food all of those 9 days to make meal times easier for the carnivore that I am. Given that she was a working woman, it couldn't have been easy on her. But, like they say, karma is a b!t¢#... My son gives me the same kind of grief I gave my mom as a child on each occasion I try to feed him a vegetarian meal. I'm sure the story is more or less the same in all Parbhu households!

An occasional treat I make for my son are these Bengali style puris with a green vatana stuffing, popularly known as Koraishuti'r Kochuri ( koraishuti = vatana).

Recipe for 10 Koraishuti'r kochuris

A] DOUGH

2 vaatis maida

2 tbsp rawa

1 tsp salt

1 tbsp sugar

3 tbsp oil

Warm water as required

Mix oil into the rawa + maida mixture. Add all the other ingredients and knead the above into a slightly stiff dough (like puris).

B] FILLING

2 vaatis green peas (shelled)

3 nos green chillies

Salt to taste

1 tsp Sugar

2 tbsp oil

¼ tsp kalonji (or jeera if you don't have kalonji)

½ tsp Hing

1 tsp Ginger paste

½ tsp Cumin powder

¼ tsp Coriander powder

Oil for frying

Blanch the peas in boiling water and drain. Blend to a smooth puree in a mixer. In a non-stick pan, heat oil, add kalonji and hing, followed by the pea puree. Add the masalas along with the balance ingredients. (Tip – a pinch of PP sambhar added at this stage won't hurt ). Cook this mixture on a medium to high flame till the pea puree comes together like a ball. Cool completely.

**Kochuri recipe**

Make 10 equal portions of the filling mixture as well as the dough. Stuff the pea filling into the dough (like a puranpoli) and roll into thin discs of about 5". Fry each disc in hot oil like a puri. Take care to seal the filling into the dough without leaving any open edges and watch each of the puris puff up perfectly.

Traditionally, these are served with a saucy dum aloo and cholar (chana) dal – but these taste as nice accompanied by a tangy tamarind chutney and pickle. Do try out this recipe and let me know if your family enjoyed it as much as mine did.

⁕

---

### प्रतिक्रिया

प्रभुतरुणच्या सप्टेंबर अंकातील श्री दिपक धैर्यवान यांचा गणपतीबद्दलचा लेख आवडला. मला पुन:प्रत्ययाचा आनंद मिळाला, कारण माझे बालपणही दिपकबरोबर आजोबा व विष्णुकाका यांचे गणपती मूर्ती बनवणे बघण्यातच गेले.

-सौ. प्रमिता धराधर

Read your article Sonyacha Ganapati in Prabhutarun. Ranjanbhaoji had told me about it but your description in detail gave an insight into the real making of the Ganapati. Many thanks.

-Jayant Kirtikar

What a tribute to the departed soul!Had tears in my eyes while reading about dear dr.Sunanda

-Achala Desai

**WISH YOU A HAPPY & SAFE DIWALI**
**FROM**

# M/s. Reva Chem - Fab (India)

Plot No. 262, GIDC,
Bhadakmora,
Near Daman Ganga Paper Mill,
Vapi - 396 195

# NEXGEN SMILES

**DENTAL CARE**

# DR. SNEHA SUNIL KOTHARE

**BDS, MDS (PAEDIATRIC & PREVENTIVE DENTISTRY)**

***We Specialise in:***

Children's dentistry (age 0-18 years)
Sedation dentistry
Orthodontic treatment (Invisalign, Ceramic, etc)
Minimally invasive restorations
Preventive dentistry
Dental implants
Aesthetic procedures

***Address:***
Shop no.7, Ground floor, Ketayun mansion, Near Thakkar bakery, Shahji Raje Road, Vile Parle East, Mumbai-400057

Clinic timings: Mon- Sat 9am- 1pm ; 5.30 pm- 9pm
Sun 10am- 2pm

For appointments, contact: +91-9833750115

*With blessings from:*

**(Late) Sudhakar Vinayak Kothare & (Late) Seena Sudhakar Kothare**

**(Late) Madhuchandra Shripad Talpade**

**(Late) Sampada Sunil Kothare**

**Smt. Shubhada Madhuchandra Talpade**

**Shri Sunil Sudhakar Kothare**

## प्रभुतरुणाची डायरी

### बाळा जो जो रे

०९-०९-२१ सौ. नेहा (जयकर) आणि श्री. राजस निंबार्ते, कन्या, फ्लोरिडा, युएसए

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| २४-०८-२१ | श्रीमती कल्पना सुरेश कोठारे, | वय ८५, | खार |
| ०४-०९-२१ | कु. सरोज बसंतराव सेंजित | वय ७७, | तळेगाव |
| ०५-०९-२१ | प्रमिला हिरामण वाझकर, | वय ८३, | माहीम |
| ०३-०९-२१ | विठ्ठलसेन सुंदरराव वैद्य | वय -९५, | भाईजीवनजी लेन |
| २३-०९-२१ | श्री जयपाल कृष्णाराव जयकर | वय ८१, | कांदिवली |

## प्रभुतरुणास देणगी

* कै. श्री. नीलेश भालचंद्र कोठारे यांच्या २०-९-२१ रोजी येणाऱ्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या पत्नी नेहा (इर्षा) कोठारे आणि कन्या देवश्री कोठारे यांजकडून रु. १००१/

* प्रभुतरुण दिवाळी अंकासाठी सौ. शील आणि प्रफुल्ल श्रीपाद राणे यांजकडून रु. १०००/-

* सौ रोहिणी अजित नवलकर, सौ. रश्मी निखील वागळे आणि सौ. पूनम माधव कुर्डेकर यांजकडून त्यांचे वडील श्री जयंत आत्माराम देसाई यांच्या २५/९/२१रोजी झालेल्या जन्मशताब्दी स्मरणार्थ प्रत्येकी १०००/- --एकूण ३०००/-

* सौ. रजनी आणि श्री. नितीन जयपाल कोठारे यांजकडून त्यांची कन्या सौ. मृगा पुष्कर कोठारे यांना 'लँडर फीट्स' या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये डिझाईन डायरेक्टर म्हणून बढती मिळाल्याबद्दल रु. ५०१/- तसेच अपूर्वाकडून रु. ५०१/-

इतरत्रही प्रसिद्ध झालेल्या सर्व देणगीदारांचे, जाहिरातदारांचे मन:पूर्वक आभार.

## अभिनंदन

* नवयुग साहित्य व शैक्षणिक मंडळ, पुणे तर्फे श्रावणी काव्य स्पर्धेत श्री. नंदकुमार विजयकर यांचा सहभाग होता. त्याबद्दल त्यांना सन्मानपत्र देण्यात आले.

* १) प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांची ना. सी. फडके यांच्या संदर्भात तासभर मुलाखत पूर्वा कर्वे यांनी घेतली. ती आकाशवाणीच्या 'अमृतकलश' कार्यक्रमात दोन भागात प्रसारित झाली. २) शरच्चंद्र मुक्तिबोध शताब्दी निमित्ताने प्रसिद्ध झालेल्या पुस्तकात (संपादक श्रीपाद भालचंद्र जोशी) त्यांचा 'मुक्तिबोधांचा काव्यविचार हा लेख समाविष्ट आहे. ३) ५ सप्टेंबर - शिक्षक दिनी मुलुंड कॉलेजच्या माजी सहकाऱ्यांचे 'शिक्षण' संदर्भात लेखन असलेले 'कॅलिडोस्कोप' पुस्तक प्रकाशित झाले. त्यात त्यांचा लेख, क्षणिका आणि कविता आहेत. मराठी विभागाचे संपादनही त्यांचेच आहे. या प्रसंगी पी. टी. व्ही. ए. चे. विश्वस्त या नात्याने श्री. बन्सी धुरंधर उपस्थित होते. सुहासिनी कीर्तिकर आणि बन्सी धुरंधर यांची यासंगी भाषणे झाली. ४) 'ललित' मासिकात त्यांचे 'लक्षवेधी' सदर प्रसिद्ध झाले. ५) 'खेळ मांडियेला' या पुस्तकात त्यांचा लेख आहे. या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते झाले.

* पाठारे प्रभु सोशल समाजाचे उपाध्यक्ष श्री. तुषार अनंत कीर्तिकर यांच्या वयाला दिनांक १५-९-२१ रोजी साठ वर्षे पूर्ण झाली. हा षष्ठ्यब्दीपूर्ती सोहळा त्यांच्या घरी निवडक मंडळी उपस्थित राहून 'ऑनलाईन' साजरा झाला.

* सॉलि. राजन जयकर यांनी रेखलेला तांदळाचा पारंपारिक गणपती, त्याची आरास इ.ची माहिती सॉलि. राजन यांच्या छायाचित्रासह 'मिड डे' मध्ये प्रसिद्ध झाली.

२३ ते २५ सप्टेंबरला आकाशवाणीवर डॉ सुमन नवलकर यांचे ऐसी अक्षरे रसिके मध्ये ललितबंध सादर झाले.

### परीक्षेतील सुयश

**एम एस सी इन ॲनथ्रोपालॉजी**

कु किंजल सुधांशु व्यवहारकर ९.१२/१० पॉईंटस्

**एस् एस् सी**

श्री नीतिश राजशेखर राणे, ८४%

**एम् सी ए (मास्टर इनकॉम्पुटर ॲप्लिकेशन) एस एनडीटी विद्यापीठ**

कु नमिता महेन्द्र कीर्तिकर, जीपीए ८.१७ गुणवत्तेसह प्रथम वर्ग

### चुकीची दुरुस्ती

ऑगस्ट अंकात कु. आश्वि धराधर हिची कविता प्रसिद्ध झाली होती. मात्र ती सहावी इयत्तेत नसून आठव्या इयत्तेत आहे; असे वाचावे.

**बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुणाच्या मालकीचे हे पत्र**
स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ शाह अँड नाहर इंड. इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथून प्रसिद्ध केले. कार्यालय दूरध्वनी : २६७८००४४

**WITH BEST COMPLIMENTS**
**FROM**

M.P. Engineering
Constructions(India)Pvt. Ltd.

*Pipeline, Vapour Recovery System*
*& EPC Company*

1003/1004, Lodha Supremus III, I Think Techno Campus, Off. JVLR,
Kanjurmarg (E), Mumbai - 400 042
Tel. : 022 25750000 Web : www.mpengg.com
Email : info@mpengg.com / sales@mpengg.com

Regd. No. MNW/254/2019-2021 RNI NO. 14613/67
Prabhutarun/October-November (Diwali) 2021





